# जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव

**सभा क्र.:- ११ // महासभा बैठकीचे कार्यवृत्त // दि.०६/०६/२०१९**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.०६/०६/२०१९ गुरुवार रोजी सकाळी ११.०० वाजता सरदार वल्लभभाई पटेल टॉवर इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात मा.पिठासीन अधिकारी तथा महापौर, सौ.सिमा सुरेश भोळे यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या विशेष महासभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्ट्रमध्ये स्वाक्षरी करुन खालील मा.सभासद सभेस उपस्थित होते.

**मा. सौ.सिमा सुरेश भोळे, महापौर, तथा पिठासिन अधिकारी**

| | | |
|---|---|---|
| **सोनवणे अश्विन शांताराम मा.उपमहापौर** | पाटील विजय पुडलिक | सोनार रंजना विजय |
| नेरकर सरिता अनंत | सोनवणे सुरेश माणिक | खडके सुनिल वामनराव |
| पोकळे दिलीप बबनराव | बारी शोभा दिनकर | खडके विश्वनाथ सुरेश |
| खान रुकसानाबी गबलु | शेख हसीनाबी शरीफ | तायडे ज्योती शरद |
| सोनवणे कांचन विकास | पाटील कुलभुषण विरभान | लढढा नितीन बालमुकुंद |
| दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | भिल पार्वताबाई दामु | चौधरी मनोज सुरेश |
| शिंदे गायत्री उत्तम | पाटील उषा संतोष | बरडे नितीन मनोहर |
| बाविस्कर किशोर रमेश | कोल्हे सिंधु विजय | जोशी अनंत हरिश्चंद्र |
| सपकाळे मिना धुडकु | कोल्हे ललीत विजय | महाजन सुनिल सुपडू |
| कोळी दत्तात्रय देवराम | बेंडाळे उज्वला मोहन | महाजन जयश्री सुनिल |
| सपकाळे रंजना भरत | राणे गायत्री इंद्रजित | शेख शबानाबी सादीक |
| कोल्हे प्रविण रामदास | तायडे सुरेखा नितीन | नाईक प्रशांत सुरेश |
| सनकत चेतन गणेश | चव्हाण ज्योती बाळासाहेब | पटेल इब्राहिम मुसा |
| सोनवणे भारती कैलास | मराठे जितेंद्र भगवान | सोनवणे विक्रम किसन |
| सोनवणे मुकुंदा भागवत | सोनवणे अंजनाबाई प्रभाकर | भापसे जिजाबाई आण्णासाहेब |
| काळे अमित पांडुरंग | पाटील रेखा चुडामण | बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम |
| चौधरी मंगला संजय | सोनवणे सुरेखा सुदाम | देशमुख सुन्नाबी राजु |
| अड.हाडा शुचिता अतुलसिंह | ढेकळे सदाशिव गणपत | शेख सैईदा युसुफ |
| सोनवणे धिरज मुरलीधर | पाटील राजेंद्र झिपरु | **स्विकृत सदस्य** |
| भोईटे लताबाई रणजीत | बालाणी भगतराम रावलमल | सोनवणे कैलास नारायण |
| पाटील चंद्रशेखर शिवाजी | अत्तरदे रजनी प्रकाश | त्रिपाठी विशाल राधेशाम |
| कापसे मयुर चंद्रकांत | काळे रेश्मा कुंदन | मराठे राजेंद्र नारायण |
| कापसे प्रतिभा चंद्रकांत | आहुजा मनोज नारायणदास | चौधरी महेश रतन |
| देशमुख प्रतिभा गजानन | पाटील मिनाक्षी गोकुळ | जैन भागचंद मोतीलाल |

सदर सभेस मा.आयुक्त, श्री.उदय टेकाळे, मा.उपायुक्त,श्री.चंद्रकांत खोसे, श्री.अनंत धामणे, सहा.संचालक, नगररचना, श्री.संतोष वाहुळे, मुख्यलेखा परिक्षक, नगरसचिव श्री.सुनिल गोराणे तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**(वंदेमातरमने सभेची सुरुवात झाली.)**

सभेस गणपूर्ती असल्याने मा.पिठासिन अधिकारी यांनी सभा सुरु करण्याचे निर्देश दिले.

श्रध्दांजलीबाबत सन्मा.सदस्यांनी दिलेल्या प्रस्तावाचे नगरसचिव यांनी वाचन केले.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १४५ पारित करण्यात आला.**

सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे श्रध्दाजंलीचे प्रस्ताव मांडले.

| अ.क्र. | सन्मा.सदस्यांचे नांव | श्रध्दांजलीचे प्रस्ताव |
|---|---|---|
| १. | सौ.सिमा सुरेश भोळे, महापौर | सन्मा.नगरसेवक श्री.प्रविण रामदास कोल्हे यांच्या मातोश्री स्व.कमलबाई रामदास कोल्हे, स्व.सौ.विजयाताई धांडे, जळगांव व स्व.डॉ.निलेश शिंपी यांचे दुखद निधन झाल्याने यांना श्रध्दांजली. |
| २. | श्री.ललित विजयराव कोल्हे | सन्मा.नगरसेवक श्री.प्रविण रामदास कोल्हे यांच्या मातोश्री स्व.कमलबाई रामदास कोल्हे, शहरातील स्व.अर्जुनदास मेनुमल कुकरेजा व भुषण कॉलनी परिसरातील स्व.सुनिल पाटील, स्व.सुमित बोरसे, स्व.सुहास मोहिते यांचे नुकतेच दुखद निधन झाल्याने यांना श्रध्दांजली. |
| ३. | श्री.भागचंद मोतीलाल जैन | स्व.पोपट चतरु पाटील माजी पोलिस पाटील यांचे बंधु, पिंप्राळा, माजी नगरसेविका स्व.जैवंताबाई गणपत पाटील, पिंप्राळा ग्रामपंचायत सदस्य स्व.शेख मुस्तफा शेख हुसेन, व दाणाबाजार व्यापारी संजीव रेदासनी यांचे वडील स्व.रमेशचंद्र बन्सीलाल रेदासनी, यांचे दुखद निधन झाल्याने यांना श्रध्दांजली. |
| ४. | श्री.प्रविण रामदास कोल्हे | खेडी जळगांव येथिल रहिवासी स्व.राजेंद्र दिलीप पाटील, विठोबा नगर, जळगांव येथिल स्व.गुलाब पंडीत शिरसाळे, शंकरराव नगर, जळगांव येथिल स्व.उषाबाई जनार्दन नारखेडे, व दिनकर नगर, जळगांव येथिल स्व.सुमनबाई लोटन बिढे, यांचे दुखद निधन झाल्याने यांना श्रध्दांजली. |
| ५. | डॉ.श्री.चंद्रशेखर शिवाजीराव पाटील | जेष्ठ नेत्ररोग तज्ञ, जे.जे. हॉस्पीटल, मुंबई येथील आरोग्य संचालक डॉ.तात्याराव लहाने यांचे वडील श्री.पुंडलिक रावजी लहाने, आरोग्यदुत रक्तदाता मुक्ती फाऊंडेशनचे अध्यक्ष श्री.मुकुंद गोसावी यांच्या आई स्व.सौ.सुरेखा देवपुरी गोसावी व नायर हॉस्पीटलच्या डॉ.पायल तडवी यांचे दुखद निधन झाल्याने यांना श्रध्दांजली. |
| ६. | सौ.ज्योती बाळासाहेब चव्हाण | प्रभाग क्रं.२९ब येथिल रहिवासी श्री.एकनाथ चौधरी यांचे पत्नी स्व.सौ.रत्नप्रभा एकनाथ चौधरी यांचे दुखद निधन झाल्याने यांना श्रध्दांजली. |
| ७. | सौ.सरीता अनंत नेरकर | महावीर नगर(शिवाजी नगर) येथील रहिवाशी स्व.अमेय बळीराम पाटील यांचे दुखद निधन झाल्याने यांना श्रध्दांजली. |
| ८. | श्री.विष्णु रामदास भंगाळे | श्री. स्वामी समर्थ केंद्राचे प्रमुख भाऊसाहेब शिंपी यांचे चिरंजीव स्व.डॉ.निलेश शिंपी, गांधी नगर येथिल रहिवासी स्व.बळवंत गजानन चौधरी, जानकीनगरातील माजी नगरसेविका माजी आरोग्य सभापती तथा जानकीनगर श्री. स्वामी समर्थ केंद्राचे प्रतिनिधी देविदास धांडे यांच्या पत्नी स्व.विजया देविदास धांडे व श्री.शिशुपाल अप्पा कुकरेजा यांचे वडील स्व.अर्जुनदास कुकरेजा यांचे दुखद निधन झाल्याने यांना श्रध्दांजली. |

श्रध्दांजली बाबत आलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने उपरोक्त दु:खद घटनेबाबत सभागृहाला अत्यंत दु:ख होत आहे. परमेश्वर इहलोक सोडून गेलेल्या मृतात्म्यास चिरशांती प्रदान करो, त्यांच्या समस्त कुटूंबियांचे दु:खात सभागृह सहभागी असून त्यांचे कुटूंबियांना, मित्र परिवारास दु:ख सहन करण्याची शक्ती प्रदान करो या भावनेसह सभागृहाने दोन मिनीटे शांत उभे राहून दिवगंत आत्म्यांना श्रध्दांजली अर्पण केली.

**सन्मा.सदस्यांनी मांडलेल्या अभिनंदन प्रस्तावाचे अनुषंगाने सभागृहाने ठराव क्र. १४६ अन्वये खालील नमूद केलेप्रमाणे ठराव पारित केला.**

सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे अभिनंदनाचे प्रस्ताव मांडले.

| अ.क्र. | सन्मा.सदस्यांचे नांव | अभिनंदनाचे प्रस्ताव |
|---|---|---|
| १ | डॉ.श्री.अश्विन शांताराम सोनवणे मा.उपमहापौर | लोकसभा निवडणुकीत उत्तर महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीत यश संपादन केल्याबद्दल मा.श्री.गिरीषजी महाजन यांचे हार्दीक अभिनंदन. तसेच मा.सौ.रक्षाताई खडसे व मा.श्री.उन्मेशजी पाटील यांचा लोकसभा निवडणुकीत विक्रमी मतधिक्क्याने विजयी होवुन यश संपादन केल्याबद्दल हार्दीक अभिनंदन. |
| २ | श्री.राजेंद्र नारायण मराठे | मा.पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांची दुसऱ्यांदा पंतप्रधानपदी निवड झाल्याबद्दल हार्दीक अभिनंदन. |
| ३ | अड.सौ.शुचिता अतुलसिंह हाडा | लोकसभा निवडणुकीत भा.ज.पा.व मित्रपक्षास भरघोस यश मिळाल्याबद्दल भा.ज.पा.चे राष्ट्रीय अध्यक्ष श्री.अमितभाई शाह व मा.पंतप्रधान नरेंद्रजी मोदी साहेबांचे अभिनंदन, राज्यात लोकसभा निवडणुकीत सेना भा.ज.पा.ने भरघोस यश संपादीत केल्याबद्दल शिवसेना पक्षप्रमुख मा.श्री.उध्दवजी ठाकरे व मुख्यमंत्री मा.श्री.देवेंद्रजी फडणविस यांचे अभिनंदन, उत्तर महाराष्ट्राच्या आठ ही जागा युतीने जिंकल्याचे श्रेय ज्यांना जाते असे नेते राज्याचे जलसंपदा तथा वैदयकीय शिक्षण मंत्री मा.ना.श्री.गिरीषभाऊ महाजन, तसेच मा.सौ.रक्षाताई खडसे यांचा रावेर लोकसभा व मा.श्री.उन्मेशजी पाटील यांचा जळगांव लोकसभा निवडणुकीत विक्रमी मतधिक्क्याने विजयी होवुन यश संपादन केल्याबद्दल हार्दीक अभिनंदन. सन्मा.सदस्या सौ.दिपमाला मनोज काळे यांचे चिरंजीव निरज काळे यास १०वी सी.बी.एस.सी.मध्ये ९२% ने उत्तीर्ण झाल्याबंदल त्याचे व पालकांचे हार्दीक अभिनंदन. |
| ४ | सौ.रंजना विजय वानखेडे (सोनार) | आपल्या देशाचे मा.पंतप्रधान श्री.नरेंद्रभाई मोदी यांनी दुसऱ्यांदा लोकसभेत घवघवीत यश प्राप्त करुन पुन्हा पंतप्रधानपदी निवड झाल्याबद्दल व जळगांव लोकसभेत मा.श्री.उन्मेशभैया पाटील यांची खासदार पदी निवड झाल्याबद्दल तसेच आपल्या महाराष्ट्राचे जलसंपदामंत्री व वैदयकीयमंत्री मा.श्री.गिरीषजी महाजन यांनी उत्तर महाराष्ट्रातील लोकसभेच्या आठ जागा निवडुण आणल्याबद्दल हार्दीक अभिनंदन. |
| ५ | श्री.ललित विजयराव कोल्हे | लोकसभा निवडणुकीत देशाचे पंतप्रधान मा.श्री.नरेंद्रजी मोदी यांनी घवघवीत यश संपादन केल्याबद्दल तसेच उत्तर महाराष्ट्राच्या आठ ही जागा युतीने जिंकल्याचे श्रेय ज्यांना जाते असे नेते राज्याचे जलसंपदा तथा वैदयकीय शिक्षण मंत्री मा.ना.श्री.गिरीषभाऊ महाजन, तसेच मा.सौ.रक्षाताई खडसे यांचा रावेर लोकसभा व मा.श्री.उन्मेशजी पाटील यांचा जळगांव लोकसभा निवडणुकीत विक्रमी मतधिक्क्याने विजयी होवुन यश संपादन केल्याबद्दल हार्दीक अभिनंदन. |

| | | |
|---|---|---|
| ६ | श्री.प्रविण रामदास कोल्हे | उत्तर महाराष्ट्राच्या आठ ही जागा युतीने जिंकल्याचे श्रेय ज्यांना जाते असे नेते राज्याचे जलसंपदा तथा वैदयकीय शिक्षण मंत्री मा.ना.श्री.गिरीषभाऊ महाजन, तसेच मा.सौ.रक्षाताई खडसे यांचा रावेर लोकसभा व मा.श्री.उन्मेशजी पाटील यांचा जळगांव लोकसभा निवडणुकीत विक्रमी मतधिक्क्याने विजयी होवुन यश संपादन केल्याबद्दल हार्दीक अभिनंदन. तसेच शहरातील सर्व मुस्लीम बांधवांना रमजान ईद निमित्त हार्दीक शुभेच्छा. |
| ७ | श्री.सुनिल वामनराव खडके | आपल्या भारत देशामध्ये मा.श्री.नरेंद्रजी मोदी साहेबांचे सरकार पुनश्च स्थापन झाल्याबद्दल त्यांचे व जनतेचे हार्दीक अभिनंदन तसेच मा.सौ.रक्षाताई खडसे यांचा रावेर लोकसभा निवडणुकीत विजय झाल्याबद्दल त्यांचे व मा.श्री.एकनाथरावजी खडसे यांचे हार्दीक अभिनंदन व मा.श्री.उन्मेशजी पाटील यांचा जळगांव लोकसभा निवडणुकीत विक्रमी मतधिक्क्याने विजयी होवुन यश संपादन केल्याबद्दल तसेच उत्तर महाराष्ट्राच्या आठ ही जागा युतीने जिंकल्याचे श्रेय ज्यांना जाते असे नेते राज्याचे जलसंपदा तथा वैदयकीय शिक्षण मंत्री मा.ना.श्री.गिरीषभाऊ महाजन, हार्दीक अभिनंदन. |
| ८ | श्री.नवनाथ विश्वनाथ दारकुंडे | मा.पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांची दुसऱ्यांदा पंतप्रधानपदी निवड झाल्याबद्दल तसेच उत्तर महाराष्ट्रातील सर्व युतीच्या खासदारांना निवडुण आणण्यासाठी घेतलेले परीश्रम सर्व मा.नामदार श्री.गिरीषभाऊ महाजन व माजी मंत्री मा.श्री.एकनाथरावजी खडसे व सर्व युतीचे पदाधिकारी यांचे व निवडुन आलेल्या सर्व युतीचे खासदारांचे हार्दीक अभिनंदन. |
| ९ | डॉ.श्री.चंद्रशेखर शिवाजीराव पाटील | लोकसभा निवडणुकीत देशाचे पंतप्रधान मा.श्री.नरेंद्रजी मोदी यांनी घवघवीत यश संपादन केल्याबद्दल तसेच उत्तर महाराष्ट्राच्या आठ ही जागा युतीने जिंकल्याचे श्रेय ज्यांना जाते असे नेते राज्याचे जलसंपदा तथा वैदयकीय शिक्षण मंत्री मा.ना.श्री.गिरीषभाऊ महाजन, तसेच मा.श्री.उन्मेशजी पाटील यांचा जळगांव लोकसभा निवडणुकीत विक्रमी मतधिक्क्याने विजयी होवुन यश संपादन केल्याबद्दल तसेच प्रभाग अधिकारी श्री.विलास सोनवणे यांची कन्या कु.प्रांजल विलास सोनवणे हि १२ वी परीक्षेत ९६% मार्कांनी नाशिक विभागातून प्रथम आल्याबदल कु.प्रांजल व तिच्या कुटुंबियांचे हार्दीक अभिनंदन. तसेच भारतीय जनता पार्टी चे जेष्ठ कार्यकर्ते श्री.नागेंद्र भिमराव मगदुम यांना महाराष्ट्र सरकार व के.बी.एक्स फौंडेशन तर्फे उत्कृष्ट कामगार पुरस्कार मिळाल्याबद्दल हार्दीक अभिनंदन. |
| १० | श्री.विष्णु रामदास भंगाळे | समर्थपणे महाराष्ट्रात शिवसेनेचे पक्षप्रमुख मा.श्री.उध्दवजी ठाकरे साहेब यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून तमाम महाराष्ट्रात शिवसेनेच्या १८ जागी विजय झाल्याबद्दल मा.ना.श्री.उध्दवजी ठाकरे पक्षप्रमुख शिवसेना यांचे त्रिवार हार्दीक अभिनंदन. तसेच भारतीय इतिहासात सलग दुसऱ्यांदा पुर्ण बहुमताचे कॉग्रेसेइतर सरकारचे पंतप्रधान झाल्याबद्दल मा.ना.श्री.नरेंद्रजी मोदी साहेब यांचे हार्दीक अभिनंदन. तसेच ताईसो रक्षाताई निखिल खडसे यांनी रावेर लोकसभा मतदार संघात सलग दुसऱ्या वेळी मागील पाच वर्षापासून केलेल्या कामांमुळे एकतर्फी खासदार म्हणुन विजयी झाल्याबद्दल तसेच मा.श्री.उन्मेष दादा पाटील यांनी जळगांव लोकसभा मतदार संघातून राज्यात सर्वाधिक आघाडीने विजयी झालेबद्दल हार्दीक अभिनंदन. |

| | | |
|---|---|---|
| ११ | हसीना बी शरीफ शेख | दि.०५/०६/२०१९ रोजी रमजान ईद निमित्त जळगांव शहर महानगरपालिका पदाधिकारी / अधिकारी, मा.महापौर, मा.उपमहापौर, सर्व सभापती, सर्व सन्मा.सदस्य यांना हार्दीक शुभेच्छा. |

उपरोक्त प्रस्तावाचे अनुषंगाने वरील सर्व पदाधिकारी, सन्मा.नगरसेवक, सामाजिक कार्यकर्ते व सामाजिक संस्था यांचे हे सभागृह अभिनंदन करीत असुन उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देत आहे. तसेच

| | | |
|---|---|---|
| १२ | श्री.कैलास नारायण सोनवणे | आयुश्री पायघन ९९.८२% ने उत्तीर्ण झालेबद्दल तसेच श्री.व्ही.ओ.सोनवणी यांची मुलगी कु.प्रांजल सोनवणी ही ९६% गुण प्राप्त करुन प्रथम आलेबद्दल तसेच श्री.प्रसाद पुराणीक यांचे चिरंजीव अभिषेक पुराणिक हा कॉमर्समध्ये उत्तीर्ण झालेबद्दल हार्दीक अभिनंदन. |

**नगरसचिव :-** आजच्या सभेकरिता सन्मा.सदस्य, चौधरी चेतना किशोर, भंगाळे विष्णु रामदास , सोनवणे राखी शामकांत, काळे दिपमाला मनोज, सोनवणे लताबाई चंद्रकांत यांचे रजेचे अर्ज आलेले आहेत ते मा.पिठासिन अधिकारी यांनी मंजूर केलेले आहेत. तसेच आजच्या सभेत सन्मा.सदस्या,सौ.हाडा शुचिता अतुलसिंह यांनी लक्षवेधी सूचना दिलेली असून सदर लक्षवेधी सूचना घेणेस मा.पिठासिन अधिकारी यांनी मान्यता दिलेली असुन सन्मा.सदस्या हाडा शुचिता अतुलसिंह यांनी दिलेली लक्षवेधी खालील प्रमाणे आहे.

श्री.नितीन लढ्ढा :- अभिनंदन सगळे एकच आह तरी अभिनंदन ठरावात तर येईलच ते सर्व एकत्रीत घ्यावे.

श्री.कैलास सोनवणे :- आमचे उन्मेशदादा आलेले आहे. तर किती नगरसेवकांनी अभिनंदन केले ते सर्व एकत्र टाकुन द्या.

नगरसचिव :- मा.महापौर यांच्या आदेशान्वये जी लक्षवेधी प्राप्त झालेली आहे. त्यांचे आदेश आहे त्यानुसार मी लक्षवेधीचे वाचन करतो.

श्री.नितीन लढ्ढा :- मा.आयुक्त साहेबांचे मनापासुन अभिनंदन करतो की त्यांनी या महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती पाहता या महानगरपालिकेचा आयुक्त पद स्विकारणेची जी हिम्मत दाखवलेली आहे म्हणुन त्यांचे मनापासुन अभिनंदन करतो व स्वागत करतो. त्याच प्रमाणे महापालिकेला प्रत्यक्षीत असलेलं कॅफो जे पद होतं आणि त्या पदावर सुध्दा त्या ठिकाणी श्री.संतोषजी वाहुळे यांची नियुक्ती झालेली आहे. त्यांच्या बद्दलची कार्यशैली, भेट झाली नाही परंतु त्यांचे कार्यशैली बद्दल चर्चा आहे की अत्यंत अभ्यासु व्यक्तीमत्व या महानगरपालिकेला प्राप्त झालेले आहे. टेकाळे साहेबांचा जरी कार्यकाळ अल्पअवधीचा आहे परंतु त्यांचा अनुभव खुप मोठा आहे. आणि निश्चितपणे या सभागृहाला मी विनंती करेल की असे आंदोलनी व्यक्तीमत्वाचा या महानगरपालिकेला जितका जास्तीत जास्ती योग्य पध्दतीने फायदा कसा करुन घेता येईल तो करण्याचा प्रयत्न करावा. त्यांच्या प्रत्येक सकारात्मक कृतीला आमच्या पक्षातर्फे सुध्दा त्यांना सहकार्य अपेक्षीत राहील तशी आमच्या पक्षाच्या वतीने ग्वाही देतो आणि पुनश: या दोघांचे अभिनंदन करतो.

श्री.कैलास सोनवणे :- **आयुश्री पायघन ही विद्यार्थीनी ९९.८२% ने उत्तीर्ण झालेली आहे. फार मोठा विषय आहे. मला वाटत जितके मार्काची परिक्षा असेल त्यात दोन चारच मार्कस कमी झालेले आहे आणि मागच्या वर्षी सुध्दा ही बोर्डामध्ये प्रथम आली होती. तर याचं या ठिकाणी विशेष अभिनंदन करतो मी. त्याच प्रमाणे महानगरपालिका नगरसेवक, अधिकारी, पदाधिकारी हा** एक आपला परिवार आहे आणि आपल्या परिवारामधुन **व्ही.ओ.सोनवणी साहेब यांची मुलगी प्रांजल सोनवणी ही सुध्दा ९६% विशेष गुण प्राप्त करुन प्रथम आली**. तीचे ही या ठिकाणी विशेष अभिनंदन व्हायला पाहिजे. विशेष यासाठी की माझ्या मते सायन्सचे विद्यार्थी आता पर्यंत पहिले आलेले आहे जवळ जवळ तीन चार वर्षे ही कॉमर्सची विद्यार्थीनी पहिल्यांदा फरक सायन्सची विद्यार्थीनी हुशारच असतात परंतु सायन्सला प्रॅक्टीकलचे मार्कस जास्त असतात. २० मार्क ३० मार्क, ईलेक्ट्रानिक मध्ये २०० पैकी १०० मार्क असतांत. जवळ जवळ सायन्सचे विद्यार्थीना ३३% मार्क कॉलेजकडुन दिले जात असतांत. कॉमर्स वाल्यांना फक्त २० मार्कस. तर हे विशेष ठराव मी मांडतो या ठिकाणी सर्वांनी टाळया वाजवुन या ठिकाणी तिचं अभिनंदन करावं. त्याचप्रमाणे आपले परिवारातील **अभिषेक पुराणिक आपले पुराणिक साहेबांचे चिरंजीव तो ही कॉमर्स मध्ये उत्तीर्ण झालेला आहे या सर्वांचे अभिनंदन करतो.**

श्री.अनंत जोशी :- एक विशेष अभिनंदनाचा प्रस्ताव मांडायचा आहे. सर्व ठिकाणी आणि महाराष्ट्रात पाणी टंचाई असतांना आपल्या अवतीभवती गांवात आणि जळगांव तालुक्याच्या ठिकाणी वाघुर धरण आपल्याकडे उपलब्ध असतांना पाणी सप्लायर्स, पाणी पुरवठा टिम, म्हणजेच नागरीकांना जी पाणी पुरवठा आपण करतो ती पाईप लाईन तिच असतांना अधिकारी तेच असतांना कर्मचारी तेच असतांना आणि वाघुरचा धरण तेच असतांना पाण्याचा साठा उपलब्ध असतांना

ज्यात नियोजन शुन्य, नियंत्रण शुन्य अश्या पध्दतीने सत्ताधाऱ्यांनी गेल्या चार महिन्यांचा पाणी पुरवठा केलेला आहे ढिसाळ आणि ढिम्म प्रशासनाने जळगांवकरांना वेठीस धरलेले आहे. अतिशय घान नियोजन केलेलं आहे. आणि लोकांना पाण्यासाठी वनवन फिरावं लागत आहे. या साठी सत्ताधाऱ्यांचं आणि प्रशासनाचे विशेष अभिनंदन.

मा.उपमहापौर:- अभिनंदनाचा प्रस्ताव असा मांडतात का ?

श्री.अनंत जोशी :- याचेसाठी टाळया वाजवायला पाहिजे. नियोजन आणि नियंत्रण शुन्य प्रशासन आणि सत्ताधाऱ्यांमुळे लोकांना पाण्यासाठी वनवन फिरावं लागत आहे. जळगांवच्या लोकांना अनेक वर्षापासुन जो त्रास भोगावा लागला नाही या सत्ताधाऱ्यांच्या राज्यात भोगावा लागत आहे.

मा.उपमहापौर:- हा नंतर विषय मांडायला पाहिजे होता तुम्ही.

* **सन्मा.सदस्या हाडा शुचिता अतुलसिंह** यांनी **लक्षवेधी** प्रस्ताव **सभागृहाने ठराव क्र. १४७ अन्वये खालील नमूद केलेप्रमाणे ठराव पारित केला.**

**मा.महापौर महोदया,**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

जळगांव शहर महानगरपालिकेने शहरासाठी एल.ई.डी लाईट लावणेकामी ईईएसएल या सेंट्रल गव्हर्मेंट आणि राज्य शासनाच्या joint venture अंतर्गत कंपनीला काम दिले होते/आहे.

सदर ईईएसएल कंपनीचे मनपास विस्तृत डि.पी.आर दिलेला नव्हता नेमके किती रुपये बचत होतील किती युनिट वाचतील याचे ढोबळमानाने आकडे दिले जे कि अंतिम नाही. लाईट लावण्याचा कालावधी मार्च महिन्यात संपलेला असतांना अजुनही ५० टक्के काम बाकी आहे. ज्या ठिकाणी लाईट लावले त्यांची फिटींग निकृष्ट दर्जाची आहे. रोज साधारणत: ५ ते ६ लाईट बंद पडतात. बंद पडलेले लाईट पुन्हा लागत नाही. **करारनामा** जिवंत आहे पण काम बंद आहे. अशा परिस्थितीत उर्वरीत लाईट लावेल कोण ? बंद लाईट लावेल कोण ?

अदयाप पावेतो लावलेल्या लाईट चे बिल व मागील लाईट चे बिल तुलना करुन किती युनिट वाचले याची आकडेमोडच नाही हे सर्व संशयास्पद नाही कां ? कोणत्याच नगरसेवकाच्या प्रभागात १००% लाईट लागलेले नाहीत. शहराच्या वाढीव भागातील लाईटाची जबाबदारी कोणाची ? या कामामध्ये तो भाग समाविष्ट नाही.

एल.ई.डी जर आपण C.S.R (currant schedule rate)नुसार लाईट लावले असते तर अंदाजे खर्च खालील प्रमाणे आला असता,

| CSR Code | Vat | Per light | Bracket | Total |
|---|---|---|---|---|
| No: २-५-६ | ७० ते ७५ | ५८२२/- | ६७८ = | ६५००/- |
| | | | Total light | <u>७००० अंदाजे</u> |
| | | | (४ कोटी ५५ लक्ष) | रू. ४,५५,००,००० |
| No:-२-५-४ | ४० ते ४८ | ३४५७ | ८४३ | ४३००/- |
| | | | Total light | <u>४०००/-</u> |
| | | | (१ कोटी ७२ लक्ष) | रू.१,७२,००,०००/- |
| No:-२-५-३ | २६ ते ३६ | २६०५ | ७९५ | ३४००/- |
| | | | Total light | <u>५०००/-</u> |
| | | | (१ कोटी ७० लक्ष) | रू.१,७०,००,०००/- |

Total light १६००० (सोळा हजार)

Total खर्च रू.७,९५,००,०००/- (सात कोटी पंच्यानव्व लक्ष) + २०% = अंदाजे १० कोटी पूर्ण खर्च ५ वर्ष मेंटनेस Free

२०% energy saving equipments म्हणजे रात्री ११.३० ते सकाळी ६ पर्यंत ५०% विज बचत उदाहरणार्थ ८० Vat चा लाईट ४० Vat प्रकाश देईल कारण मध्य रात्री वाहतूक तुरळक असते व इतका प्रकाश पुरेसा असतो.

याचा दुसरा फायदा असा कि आज आपण १००/- बिल देतो तर ईईएसएल मुळे ८०/- येईल पण जर हेच पावर सेव्हिंग लावले तर ८०/- चे ६०/- बिल येणार मग इतकं सगळं जर आम्ही Non Technical नगरसेवक हे **मांडु** शकतो तर प्रशासनाने हे सभागृहापुढे का मांडले नाही ?

माझी महापौर मा.आयुक्त यांना विनंती आहे कि आपण पुढील महासभेत या विषयाची श्वेतपत्र सादर करावी. धन्यवाद.

ॲड .सौ.शुचिता हाडा :- मा.महापौर सोा मी सभागृहापुढे लक्षवेधी मांडण्यापुर्वी आपले जे नविन आयुक्त आलेले आहे डॉ.उदय टेकाळे साहेब यांचे मी स्वागत करु इच्छीते. जस नितीन भाऊंनी म्हटलं की यांनी जळगांव महानगरपालिकेचे आयुक्त पद घेण्याची हिम्मत दाखवली. तर ते खरं खरं कौतुकास्पदच आहे. आज जशी आमची परिस्थिती झालेली आहे. पण ती परिस्थिती आपल्यामुळे निश्चितच बदलेल या बदलासाठी आपण सहाय्य कराल याबददल आम्हालां विश्वास आहे. माझ्या माहिती प्रमाणे आपण गिरीष भाऊंच्या सांगण्यावरुन आपण येथे आलेले आहात. आणि गिरीष भाऊंनी वजनदार आयुक्त आम्हाला दिलेला आहे. ज्यांच्याकडे खुप मोठा अनुभव आहे. आपला कार्यकाळ आता संपुष्टात येत आहे आणि फारच कमी काळासाठी आपण आम्हाला लाभले आहे. आणि तेवढा कार्यकाळ सुध्दा जळगांवासाठी रिमार्केबल आहे आणि कामं जळगांवात होतील असा विश्वास आम्हाला आहे आणि त्या मागचा कारण पण आपणांस असलेला अनुभवच आहे. त्यामुळे मी अजुन एकदा स्वागत करते. आणि त्यानंतर माझी लक्षवेधी सभागृहापुढ मांडु इच्छिते. मा.महापौर महोदया आणि आयुक्त साहेब आजच्या लक्षवेधीचा विषय आहे जळगांव शहरातील केलेली लाईटस जळगांव शहर मनपाने eecl या कंपनीने सेंट्रल गव्हर्नमेंट आणि राज्य शासनाच्या जॉईन असलेल्या जळगांव शहरात लाईटस लावण्याचे काम दिलेले होते आणि आहे. या कंपनीने मनपाला कोणताही विस्तृत डि .पी.आर दिलेला नव्हता व नेमकी किती विजेची बचत होणार आहे , किती युनिट वाचतील हि सगळी जी आकडेवारी येथे मेनशन केलेली आहे हि सगळी ढोबल मानाने दिलेली आहे अंतिम नाही या मध्ये कमी जास्त बदल होऊ शकतो , होणार आहे या कंपनीचा करार माझ्या माहितीप्रमाणे मार्च महिन्यात संपणार होता , पण अजुन सुध्दा ५० टक्के काम बाकी आहे ज्या ठिकाणी लाईट लागलेले आहेत त्या ठिकाणी प्रत्येक लाईटची क्वालीटी अत्यंत निकृष्ट दर्जाची आहे साधारणत: दोन ते पाच लाईट बंद असते माझ्या मते एस.एस.पाटील साहेब याच्याबददल सांगु शकतील मीपण जे सांगतेय याच्यात जर काही चुकत असले तर त्यांनी याच्यात ते मेनशन करावे , रोज साधारणत ५ ते ६ लाईटस बंद पडतात बंद पडलेले लाईट पुन्हा लागत नाहीत , करारनामा अजुनही जिवंत आहे पण काम बंद आहे. म्हणजे याचा उपयोग काहीच नाहीये हया परिस्थितीत उर्वरीत लाईट लावणेचे काय काम झालेले आहे , आहे का असे कुणी की ज्यांच्या प्रभागात अजुन पर्यंत एकही लाईट लागला नाही.बरेचशे नगरसेवक आहे की ज्यांच्या प्रभागामध्ये २० ते २५ टक्के काम झाले आणि काहींच्या प्रभागामध्ये १० ते १२ टक्के काम झालेले आहे पण कोणीही या कामामुळे समाधानी नाही निश्चित सभागृहाला सुध्दा विचारेल की कोणी नगरसेवक आहे की या कामामुळे समाधानी आहे मला वाटत माझ्या मताशी सगळे सहमत असतील की कोणीच नाही की या कामाच समाधान मिळाले आहे , उलट तक्रारी पुर्वीच्या होत्या त्याच प्रमाण वाढलय आपण नागरीकांचा रोष जास्त पत्करून घेतोय या प्रकरणामुळे कारण लाईटस लागले लाईटस लावायची सुरूवात झाली आणि त्यानंतर काय झाले की ते लाईट लागलेच नाहीत फक्त जे त्या पोलवर उभे राहीले किंवा त्याना दोन तीन दिवस लागले आणि ते २ -३ दिवसांनी बंद पडले त्याचा काहीच उपयोग झालेला नाही अद्याप पावेतो जे लाईटस लागलेले आहे मी एस.एस.पाटील साहेबांना येथे बोलवु ईच्छिते पाटील साहेबांना काही प्रश्न विचारायचे आहेत याबाबतीत खोटे आहे की खरे की तीच परिस्थितीत आहे हे आपल्याला विभाग प्रमुखच सांगु शकतील पाटील सोहब मला हे जाणुन घ्यायचे आहे तुमच्या कडुन कि आतापर्यंत मीजे सांगीतल एलईडी लाईट काही ठिकाणी लागलेले आणि ते सुरूच झालेले नाही किंवा काही काळाने २/३ दिवसांनी बंद पडले ही गोष्ट खरी आहे की खोटी ?

एस.एस.पाटील :- खरी आहे.

ॲड .सौ.शुचिता हाडा :- बर आता आपण हे लाईटस जे आपण लावतोय की आपण विज बिलामध्ये कपात होणार आहे म्हणजे बेसीक आपल परपज च हे होत की विजबिलात कपात करणे यासाठीच आपण हे सर्व स्विकारले आहे , तर मग आता तुमच्याजवळ एक्झॅक्ट आकडेमोड आहे का की आपण जे लाईटस लावले आणि जे आपल्याला नविन बिल आहे आहे लाईटस लावल्यानंतरचे त्यामध्ये काही कपात दिसुन येते आहे का ? आम्हाला सांगू शकतात की ती आकडेवारी आम्हाला देवू शकतात का ?

एस.एस.पाटील :- आजपर्यंत शहरात एकूण १५४६७ लाईटस चा आपला प्रस्ताव आहे आज यापैकी कंपनीने ८१८२ लाईटस लावलेले आहेत त्यापैकी अशी माहिती कंपनीने दिलेली आहे आणि आज कंपनीने ज्या पध्दतीने लाईटस लावलेले आहेत त्यांनी लावतांना २४ वॅटस ३५ वॅटस ४५ , ७० वॅटस आणि त्यामध्ये ११० वॅटस लाईटस लावलेले आहेत शहरात यापुर्वी जे लाईटस होते त्यांच्या लाईट बिलात आणि हया लाईट बिलात म्हणजे पोलवर २८ वॅटस असेल

किंवा ४० वॅट चा लाईट असेल आणि त्यांची संख्या आणि आताच्या लाईटस ची संख्या आणि त्यांचे वॅटस याचा जर आपण विचार केला तर विज बचतीच प्रयोजन होते ते प्रयोजन आज आपल्याला दिसुन येत नाही

ॲड .सौ.शुचिता हाडा :- दिसुन येत नाही , बर या नंतर मला विचारयाच की तुम्ही दिलेल्या खुलाश्यांनी या विषयी गांभीर्य सभागृहाच्या लक्षात येणार आहे . आता हे जे लाईटचे बिल आहे पाटील साहेबांनी सांगीतल्यानुसार की यांच्यात तुलनात्मक तक्ता ते देवु शकत नाहीत , विज बचत झाली का हे आपल्याला सांगता येत नाही झाली नाही असच जवळपास दिसत आहे अजुनही काम पुर्णत्वास गेलेले नाही तसेच शहराच्या वाढीव भागाची जबाबदारी कोणाची आहे कारण ज्या शहरात आपण राहतोय त्याचा मी पुर्ण अभ्यास केलेला आहे वाढीव भाग याच्यात Include केलेला नाही म्हणजे वाढीव भागामध्ये आता जे काही होणार आहे ते काम यामध्ये समाविष्ट केलेले नाही ते लाईटस लागले नाहीत ते फक्त पोलवर चढवले गेले काही लागले त्यातील काही बंद पडले किंवा काही २ ते ४ दिवसांत बंद पडले आणि आजच्या स्थितीत बंदच आहेत ५० टक्केच लाईटस लागलेले आहेत किंवा आपण म्हणूया की जवळपास ५० टक्केच काम झालेले आहे , कंपनीची काम करण्याची जी मुदत होती मार्च एन्ड मार्च एन्ड पर्यंत काम पुर्ण व्हायला हवे होते पण ते काम झालेले नाही , याउलट माझ्या माहिती प्रमाणे.

श्री.नितीन लढढा:- ताई ३१ मे पावेतो मुदत होती .

ॲड .सौ.शुचिता हाडा :- बर ३१ मे पावेतो सुध्दा ५० टक्केपण काम पुर्ण झालेले नाही आणि यापुढेही काम पुर्ण होणार नाही कारण मी जी माहिती काढली त्याप्रमाणे कंपनी कंपनीला पार्टली मिळणारे कंम्प्लींशन सर्टिफीकेट ची मागणी करता आहेत. आपण कामाबददल समाधानी नाही त्यामुळे प्रशासन पार्टली कंम्प्लींशन सर्टिफीकेट देवु शकत नाही जर प्रशासनाने ते दिल तर त्यामुळे काय होत की जेवढे काम झालेले आहे त्याबददल आम्ही समाधानी आहे आणि कामे करीत आहोत म्हणून तुम्ही ते कंम्प्लींशन सर्टिफीकेट दिले पाटील साहेब बरोबर आहे का मी जे म्हणतेय ते ?

एस.एस.पाटील :- होय .

ॲड .सौ.शुचिता हाडा :- मग पार्टली कंम्प्लींशन सर्टिफीकेट आपण देवु शकला नाही म्हणजे कॉन्ट्रक्टर म्हणतात की ते मिळाल्याशिवाय यापुढचे काम कारणार नाही , एक अजुन विचारू ईच्छिते सर्वे रिपार्ट आणि डिपीआर करण्याच्या आधी लाईट लावण्याची घाई करण्यात आली ही घाई का करण्यात आली ? हयाच उत्तर देणेसुध्दा आवश्यक आहे. त्यानुसार सर्वे रिपोर्ट व डिपीआर तयार करणे आवश्यक होते त्यानुसार दोघे कॉज अजुनही टेंटेटिवच आहे हा दुसरा महत्वाचा मुद्या आहे काम पुर्ण झाल्यावर पार्टली कंम्प्लींशन आपण देत नसल्यामुळे मक्तेदार काम करणारच नाही , पाटील साहेबांनी हे सुध्दा मान्य केलेले आहे की टेक्नीकल पैरामीटर नुसार काम झालेले नाहीत , आजच्या तारखेस ६२८ किंवा त्या पेक्षा जास्त लाईटस बंद आहेत मॅग्झीमम लाईटने दोन चार दिवस काढले आहेत किंवा त्या पेक्षा जास्त काढलेले नाहीत .कनेक्टर मध्ये वायरींग नाही त्यामुळे लाईटस बंद पडलेले आहेत आणि कंपनीचे जे म्हणणे आहे ते म्हणजे सर्जन कॉस आहे म्हणजे जेव्हा काही प्रॉब्लेम येतील बंद आहे कंम्पलेंट त्याच्याकडे आल्यानंतर त्यांचा माणुस येईल तो ते चेक करेल ते डिफेक्टीव आहे किंवा त्याला दुरूस्त करायचे आहे याबददलचा रिपोर्ट तो कंपनीकडे पाठवेल आणि त्यानंतर हे सगळ चेन्ज करून मिळेल म्हणजे तेवढा कालावधी जाणार आणि आजच्या घडीला त्यांचा माणुस येणारच नाही कारण आपला आता वाद उदभवला आहे माझ्या माहितीप्रमाणे आता दुरूस्तीचे काम सुध्दा येथे होणार नाही याच्या दुरूस्त्या जळगांवच्या बाहेर होणार आहेत त्यामुळे आता ही सगळी कॉम्प्लीकेटेट परिस्थिती निर्माण झालेली आहे या परिसिथतीला कोण जबाबदार आहे याचा आपल्याला शोध घ्यावा लागणार आहे त्यानंतर पार्टली कंम्प्लींशन जोपावेतो देणार नाही तोपावेतो तो काहीही करणार नाही डिसेंबर पासुन आपण लाईट लावणे सुरू केलेले होते तरीही लाईट लागलेले नाहीत तरी आपण ७० टक्के जे लाईट आपण लावले सुरुवातीला तर त्या लाईटची संपुर्ण बॅचच डिफेक्टीव्ह निघाली. आणि हे ठेकेदाराने सुध्दा मान्य केलेले आहे. ती सर्वी जे लाईट लागलेली आहे ती डिफेक्टीव्हच आहे आणि ते सुरुच होणार नाही. ते रिप्लेस होणार आहे का आजच्या तारखेत होणारच नाही. ते रिपेअर होणार आहे का होणारच नाही. कारण त्या ठेकेदाराने काम बंद करुन टाकलेलं आहे. याच्यात अजुन एक महत्वाचा मुद्दा लक्षात आणुन देऊ इच्छिते. हे जे रेट घेतलेले होते आणि सी.एस.आर.चे रेट क्लर्कीक शेड्युल रेट हे आपण कम्पेअर केले होते का ?

एस.एस.पाटील :- EESL जी कंपनी आहे ती सेंट्रल गव्हर्नमेंटच्या एका विभागाची ब्लु ॲण्ड युनिवर्सल जी कंपनी आहे याची ही जोईंट व्हेंचर एजन्सी आहे. आणि या एजन्सीची गव्हर्नमेंटच्या इलेक्ट्रीक डिपार्टमेंट त्यांनी यांच्याशी ॲग्रीमेंट केलेलं आहे. ॲग्रीमेंट केल्यानंतर शासनाचा एक निर्णय पारीत केला. शासनाच्या निर्णयानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांना शासनाच्या कोणत्याही निधीतुन अथवा स्वय: निधीतुन एल.ई.डी. लावण्याला प्रतिबंध लावण्यात आला. आणि इ.एस.एस.च्या माध्यमातुन एल.ई.डी.पध्दतीने पथदिवे लावण्यात आल्या. आणि यात प्रत्येक महानगरपालिका असेल नगरपालिका असेल. त्यांच्याशी ॲग्रीमेंट करण्या संदर्भात निर्देश देण्यात आलेले होते. आणि त्यानुसार ई.एस.एस. ने प्रत्येक महानगरपालिकेला जी माहिती मागीतली होती. इन्वेंटरी माहिती मागीतली होती आणि विज बिलाचा खर्च याची

माहिती मागीतली होती. त्या माहितीनुसार त्यांनी आपल्याला EESL ने आपल्याला प्रस्ताव दिला. प्रस्तावामध्ये त्यांनी आपल्याला जे रेट दिलेले होते ते सर्व म्हणजे महानगरपालिकेला असेल किंवा ईतर कोणतीही संस्था असेल हे रेट सारखेच होते त्याच विषयामध्ये EESL वाल्यांनी प्रत्येक संस्थेशी ऐग्रीमेंट केलेले आहे.

ॲड .सौ.शुचिता हाडा :- तरी सुध्दा हे अस होत हा एक मुददा मी सभेपुढे मांडू ईच्छिते की csr चे शेड्युल जे आहे हे सुध्दा महाराष्ट शासनाने दिलेले आहे तर त्यानुसार आपण जे रेट लावले असते तर त्याचा जो अंदाजे खर्च आला असता तर तो ७० ते ७५ वॅट चा जो लाईट असतो त्याचा csr आहे त्याचा कोड आहे २/५/६ per watt त्याचा रेट आहे ५८२२/- रू आता तो जातो ५६२२/- रू ठिक आहे मी टेक्नीकल नाही टेक्नीकल व्यक्ती आपल्या मनपामध्ये उपस्थित होते असे अधिकारी की ज्यांना या कामासाठी खास नियुक्त केलेले आहे आणि त्यांनी हा फरक आपल्या लक्षात आणुन देणे आवश्यक होते तर हा ६५००/- रू ७० ते ७५ watt चा खर्च होता साधारण आपण ७००० लाईटस ७० ते ७५ watt चे लावतो तर त्याचा खर्च csr नुसार गेला असता ४ कोटी ५५ लक्ष त्यानंतर ४० ते ४८ watt चे जे लाईटस आहेत त्याची पर लाईट कॉस्ट csr नुसार ३४५७/- वीथ मटेरीअल ते साधारण रु.४३००/- चा पकडु. टोटल त्यात साधारण आपण ४००० लाईटस जळगांव शहरात लागणार आहे. म्हणजेच १ कोटी ७२ लाख त्याची कॉस्टींग होणार आहे. तसेच २६ ते ३६ watt चे रु.२६०५/- कॉस्ट येते सी.एस.आर.नुसार वीथ मटेरीअल आपण त्याची रु.३४००/- कॉस्ट पकडु. टोटल लाईटस लागणार होते ५००० एकुण १ कोटी ७० लाख त्याची कॉस्टींग जाते. तरी १६००० लाईटस आपण अंदाजीत लावणार होतो. हे अंदाजीत सांगत आहे मी. तसा त्याचा सी.एस.आर.नुसार टोटल खर्च येतो ६० कोटी ९५ लाख आणि याच्या सोबत एनर्जी सेवींगची इक्वीपमेंटची कॉस्ट पकडु सर्व १० कोटीचा खर्च झाला समजा. आता एनर्जी सेवींग इक्वीपमेंट काय असते. मी सर्व सभागृहास सांगु इच्छिते की एनर्जी सेवींग इक्वीपमेंट साधारणंता रात्री ११.३० ते सकाळी ६.०० वाजेपर्यंत ५०% विज बचत करतो. तर जे ८० watt चा जे लाईट आहे ते ४०watt चा प्रकाश देतो. हे इक्वीपमेंट लावल्यानंतर जेव्हा जास्त ट्रॅफिक नसतं. मध्यरात्रची वेळ असते वाहतुक जास्त नसतं. रात्री ११.३० ते सकाळी ६.०० वाजेपर्यंत लाईटसची गरज तितकी नसते. लाईटच्या Efficiency ची गरज तितकी नसते. त्याच्यामुळे एनर्जी सेवींग इक्वीपमेंट जर आपण लावलं. तर तो तेवढा प्रकाश कमी करतो आणि तेवढी आपली ईलेक्ट्रीसिटी सेव होते. याच्यानुसार दुसरा फायदा असा झाला असता. की अंदाजे आपण १०० रू दिले ते एल ई डी लाईट लावल्यामुळे आपल्या ते बिल ८० रू येणार होते EESL मुळे २० टक्के एनर्जी सेविंग मीटर लावले असते तर ते बिल आपल्याला ६० रू आले असते शेवटी काय असते बदलाव विषय काढणार माणूस फीजीक्स चा असतो मी सायन्स ची विदयार्थीनी आहे हा फरक जर मला कळू शकतो तर मनपाच्या सेवे मध्ये मोठे मोठे इंजिनियर्स आहेत की ज्यांनी ही बाब प्रशासनाच्या लक्षात का आणुन दिले नाही आणि प्रशासन हे सभागृहापुढे का मांडत नाही ही जर आपली एवढी सेविंग होऊ शकत होती तर आज आपल्याला याची टेंटेटीव कॉस्ट याची साधारण १३ कोटींची आहे जी १० कोटी पर्यंत पोहचत होती जवळजवळ ३ कोटी आपले सेव होऊ शकले असते १३ कोटी सुध्दा एक्झॅट फीगर नाही ती अजुनही वाढु शकते किंवा थोडीफार कमीही होऊ शकते अशा परिस्थितीमध्ये मी जर सांगु शकते तर प्रशासकीय सेवेत असलेल्या अधिकाऱ्यांनी आपल्याला का लक्षात आणुन दिले नाही . हे सभागृहासमोर आणणे यांचे काम नव्हते का ? आणि या सगळयासाठी कोण जबाबदार आहे जे आजच्या घडीला कॉन्ट्रक्ट पुर्ण होऊ शकत नाही कंपनीने काम बंद करून टाकले आहे अकाऊट मुळे आपण खर्चही करून शकत नाहीये लिगल मॅटर असेल तर मग आज जी जळगावची अवस्था होत आहे तर जी जळगांवकरांना अवस्थेबददल उत्तरे आम्ही बांधील असतो आम्हाला द्यायची आहे. हा कॉन्ट्रक्ट इमप्लीमेंट करण्याची इतकी घाई का केली. सर्व्हे रिपोर्ट नव्हता. डि.पी.आर. नव्हता. हे इमप्लीमेंट होऊन सर्व काही किचकट होऊन बसलेला आहे. जे हॅडरॅलीक आहे ते आपल्याच वापरल्या जातात. भुसावळ मध्ये ठेकेदाराच्या तीन गाडया आहे त्याचे माणसं आहेत. येथे आपल्याच गाडया वापरल्या जातात. बरेच पोल आणि ब्रॅकेट आपलेच आहे आणि त्यांच्यावरच लाईट चढवलेले आहे. बऱ्याच ठिकाणी त्यांनी नविन मटेरीअल वापरलं आणि जे जुने मटेरीअल काढले त्याचं काही खुलासा नाही आहे. ते कुठे आहे कोणाच्या कस्टडीत आहे त्याचा पुढे काय ? हा सुध्दा खुलासा काहीच नाही आहे. तर हे सगळं इतकं Complicated होऊन बसलेला आहे हा विषय यात आपण काहीच करु शकत नाही. बहुमतांनी आपण हे मक्ता कॅन्सल ही करुन टाकु ठराव करुन पण याचे काही उपयोग नाही. पण पुन्हा तो कायद्याने स्टॅन्डबाय होऊ शकणार नाही आणि त्या ठरावाचा काही उपयोग होणार नाही. तर या ठिकाणी मी आयुक्त साहेबांना आणि महापौर ताईंना ही विनंती करते की, याच्याबद्दल श्वेतपत्र पुढच्या महासभेपर्यंत सादर करणेबाबत संबंधीत विभागप्रमुख यांना आदेश द्यावे. आता श्वेतपत्र म्हणजे काय याचा डिटेल रिपोर्ट, नेमका हे काय आहे ? ह्या कॉन्ट्रक्ट मध्ये काय आहे ? कॉन्ट्रक्ट मध्ये काय काय होतं. काय काय चुकलं.काय नेमकं करायला हव आहे. आणि महानगरपालिकेचे हित कोणत्या गोष्टीने जोपासले जाणार आहे. याचा क्लियरकट रिपोर्ट यांनी देणे खुप गरजेचे आहे. संबंधीत विभाग प्रमुखांना आदेश आजच्या आज व्हायला पाहिजे. श्वेतपत्र लवकरात लवकर महासभेपुढे आणावा. आणि या विषयाबद्दल काय करता येऊ शकतं आणि आपले जळगांव पुन्हा आंधारातच राहणार

आहे. मुख्य मार्ग सर्व अंधारात भकास अवस्थेतच राहणार आहे. हीच परिस्थिती आपल्याला परत लाजीरवाणी स्थिती परत फेस करायची आहे. याच्यावर काही उपाय तेव्हाच करु शकतो जेव्हा श्वेतपत्र येईल तेव्हाच आपण पुढची कार्यवाही ठरवु त्याची दिशा ठरवु शकतो. तरी ते लवकरात लवकर व्हावं.

सौ.ज्याती चव्हाण :- मा. महापौरताई, आयुक्त साहेब या एल.ई.डी.बद्दल आपली जी चर्चा झाली. आता यासाठी जबाबदार कोण ? आता पुर्ण जळगांव शहराने आंधारात राहायचं का ? प्रभाग १३ मध्ये १ ही एल.ई.डी. बसविण्यात आलेला नाही आहे. एकही सुरूवात नाही आणि काही प्रभागात १० ते २० टक्के झाले हे काम सुरू करतांना प्रत्येक प्रभाग निहाय नियोजन करणे अपेक्षित होते प्रत्येक वॉर्डात थोडयाफार प्रमाणात केलेले आहे नियोजन करतांना एस.एस.पाटील यांनी जी जबाबदारी होती ती त्यांनी पुर्ण केलेली नाही याला जबाबदार कोण यावर तुम्ही सक्त कारवाई करा आणि त्याची आणि महापौर ताई आणि आयुक्त साहेब प्रशासनाने या ३ महिन्यामध्ये शासनाला कोणकोणता पत्रव्यवहार केला याबाबत आम्हाला माहिती द्या आणि तसेच शासनाने महापालिकेला कोणकोणता पत्रव्यवहार केला याची माहिती द्या.

श्री.कैलास सोनवणे :- परिस्थिती मांडली आहे त्यांनी

श्री.ईब्राहीम पटेल :- अप्पासाहेब त्यांनी परिस्थिती मांडली आहे बरोबर आहे , काम थांबलेले आहे.

श्री.कैलास सोनवणे :- तुम्ही चुकता आहेत बोलतांना

श्री.ईब्राहीम पटेल :- काम करुन घेण्याची जबाबदारी आपली होती.

श्री.कैलास सोनवणे :- खरोखर जर एक अभ्यासु नगरसेविका विषय मांडते तेव्हा अभिनंदन करायला पाहिजे त्यांचं. बोलायची पध्दत असते. तुम्ही चुकीचं बोलत आहे. तुम्ही ठेका घेतला आहे का बोलायचा.

श्री.नितीन लढ्ढा :- आवाज दाबण्याचा प्रयत्न करता आहे. विरोधी पक्षाला विषय मांडण्याचा अधिकार आहे.

श्री.कैलास सोनवणे :- तुम्ही चुकीचं बोलत आहे.

श्री.नितीन लढ्ढा :- महापौरताई, शुचिताताई ने जे मुद्दा मांडला. त्या एल.ई.डी. च्या विषयात सखोल अभ्यास मी केलेला आहे. त्या प्रश्नांचे उत्तरं सुध्दा माझ्या चर्चेतुन प्राप्त होतील. आणि मला वाटत आहे. की शपथपत्राची सुध्दा गरज पडणार नाही. जे काही निर्णय घ्यावयाचे आहे. आपण या सभेत ही घेऊ शकतो अशी ती परिस्थिती आहे. साधारणता २८/११/२०१८ ला याच्या संदर्भातला करारनामा झाला. त्याप्रमाणे कामाची मुदत ही दि.३१/०५/२०१८ ला संपुष्टात आली. प्रश्न हा होता की या सहा महिन्यामध्ये संपुर्ण जळगांव शहराचे एलईडी पथदिवे पुर्वीचे पथदिवे काढुन बदलुन देणे अपेक्षित ही होतं आणि आवश्यक ही होतं. साधारणता १५४५७ पथदिवे बदलण्याच्या संदर्भात हा कॉन्ट्रक्ट साईन झाला. शुचिता ताईने एस.एस. पाटलांवर हा ठपका ठेवला की त्यांनी सभागृहाला ही माहिती कळवायला पाहिजे होती. डी.पी.आर. झाला नसेल तर हया कामाला सुरुवात व्हायला नको पाहिजे होती. ती गोष्ट तत्वात: मान्य करु आपण. याच्या मध्ये जवळपास मुख्य रस्त्याचा एक प्रॉब्लेम होता आणि मुख्य रस्त्यांवर ७० watt लाईट हे बदलनं क्रमप्राप्त ही होतं आणि ठरलेलं ही होतं. कामाची तातडीने सुरुवात व्हावी या चांगल्या हेतुने आणि त्या कामाची सुरवात माझे प्रभाग क्र.५ मधुन झालेली होती. आणि त्यावेळेला कुणाच्याही मनात ही शंकाही नव्हती की ईतका वेळ लागेल किंवा या चर्चेपासुन आपण अनभिज्ञ राहीलो नसतो खुप आपण प्रशासनाच्या सोबत आपण सुध्दा त्याला जबाबदार आहे कारण ज्यावेळेला एखादा उपक्रम केंद्र शासनाचा असेल किंवा राज्य शासनाचा असेल किंवा महानगपालिकेचा स्वत:चा असेल परंतू ज्याच्यामध्ये संपुर्ण निधी हा जळगांव शहर महानगरपालिकेचा निधी हा वेगळा लागणार नाही हा आपलाच लागणार आहे , आपण आपल्या निधीचे नियोजन करतांना मनपाचे हित कशामध्ये आहे आणि ते हित डोळयासमोर ठेवुन या सभागृहाने आज जो काही अभ्यास चुकीचा केलेला असेल तो तो चुकीचा केला असेल ही झालेली चुक आपण मान्य करायला पाहीजे की त्या वेळेला सपोज आपल्याकडुन या निर्णयावर आपण आलो असतो तर आपल्याला आज वेगळ चित्र दिसले असते प्रश्न आता हा आहे की साधारणत: १५४५७ पथदिवे बदलविणे होते परंतू ज्यापध्दतीने एस.एस.पाटील साहेबांनी आपल्या समोर सांगीतले की उर्जा बचत हा त्यामागचे मुख्य धोरण आहे म्हणजे राज्य शासन किंवा केंद्र शासनाचे जे धोरण आहे उर्जा बचतीच्या आणि निधी बचतीच्या दृष्टीकोनातुन निर्णय घेतलेला आहे परंतू या सभागृहाने संपुर्ण परिस्थितीचा अभ्यास करता १५४५७ पथदिव्यांपैकी आतापर्यंत ८१८२ पथदिवे हे बदलविण्यात आलेले आहेत आणि साधारणत: जवळपास मॅक्झीमम संख्या जी आहे ती १८watt ची आहे म्हणजे १०८०० पथदिवे शहरात १८watt चे लावणे गरजेचे होते परंतू आतापर्यंत ८१८२ पथदिवे जे बदलविण्यात आलेले आहेत त्यामध्ये १८watt च्या पथदिव्यांची संख्या साधारणत: ८० ते ८५ नगच हे १८ watt चे लागलेले आहेत जे की ७० टक्के पथदिवे हे १८watt चे लावणे गरजेचे होते परंतू जे पथदिवे लावण्यात आलेले आहेत ते त्यापेक्षा जास्त watt चे लावण्यात आलेले आहेत म्हणजे २५ , ३० , ४० watt चे असतील यामागची महानगरपालिकेला याच्या अनुषगांने होणारे आर्थिक नुकसान हे मी तुम्हाला दोन मिनिटांत कॅल्कुलेशन करून सांगतो की ज्या पथदिव्यांना आपण watt प्रमाणे आपण आकारणी केलेली आहे ती एका watt ला ८५ रू प्रमाणे पैसे आपल्याला मक्तेदाराला द्यायचे आहे , म्हणजे तो १० watt चा दिवा लावत असेल तर त्याला आपल्याला ८५० रू द्यायचे आहे या

सर्व ccms त्यापैकी ३ टक्के रक्कम प्रोजेक्ट कंन्सलंटंट म्हणून प्रोजेक्ट कंन्सलंटंन्सी चे देत आहे आज ६ कोटी ४३ लक्ष रू चे हे प्रोजेक्ट आहे ६ कोटी रू साठी आपण जवळपास १८ लक्ष रू प्रोजेक्ट कंन्सलंटंन्सी देतोय कंन्सलंटंन्सी यासाठी देतोय की यामागे आपल्याला dpr प्रकल्प आपल्याला त्याने तयार करून द्यायला पाहीजे हा आराखडा तयार करणे यासाठी करणे गरजेचा होता की एका खांबावर असलेला सोडीयम जो आपल्याला जितका प्रकाश देतोय आणि आपल्याला त्याठिकाणी आपल्याला किती प्रकाशाची आवश्यकता आहे आणि आज मिळणारा प्रकाश हा आपल्याला एलईडीच्या रूपाने आपल्याला मिळणे अपेक्षित होते आणि त्याच्या अनुषंगांने आपल्याला प्रकाश मिळत नाही यानंतर या सर्व पथदिव्यांची २ वर्षांची वॉरंटी EESL कंपनीने दिलेली आहे २ वर्षानंतर कुठलाही पथदिवा बंद पडल्यास त्यास जो काही कॉन्ट्रक्ट ची रक्कम आहे त्याच्या ५ टक्के रिप्लेसमेंट द्यायची म्हणजे २ वर्षात १० पथदिवे जर बंद पडले तरी त्याला ५ टक्के पर्यंत साधारत: ३० ते ३५ लाख रू कंपनीला अदा करावे लागतील आज संपुर्ण विषयाचा अभ्यास केला असता जळगांव शहर महानगरपालिका शहरातील संपुर्ण पथदिवे ज्या ज्या ठिकाणी लावलेले होते आणि ते बदलविण्याच्या दृष्टीकोनातुन भुमिका घेतेली आहे या भुमिकेमागे २४ ते २५ लाख रू खर्च आहे जे बजेट आहे पथदिवे बदलविण्याचे आपले ते २४ ते २५ लक्ष रू आहे हा जो खर्च आहे परंतू याला दोन वर्षांनंतर प्रतीवर्षी ३० लाख रू दयायचे आहेत तरी ५०० पथदिवे बदलविले तरी ३० लाख रू द्यायचे आहे किंवा १००० पथदिवे बदलविले तरी ३० लाख रू द्यायचे आहे हा एकभाग झाला, याचा जर आपण अभ्यास केला तर आपल्याला EESL जे रिप्लेसमेंट करून देत आहे त्याचे टोटल वॅटेजेस जर काऊंट केले तर संपुर्ण जळगांव शहरात १५४५७ बदलविण्यात येणार आहेत त्यामध्ये कंम्झशन होणारे युनिटस म्हणजे हे जवळपास ५६७२७७ वॅटेजेस आहेत म्हणजे हे ५६७२७७ वॅटेजेस आपण EESL कडून पर्चेस करत आहोत आणि त्याचा दर ८५ रू watt प्रमाणे काऊंट केला तर त्याची साधारत किंमत होत ४८२१८५४५/- + याच्यावर १८% GST या व्यतिरीक्त मी तुम्हाला जे खर्च सांगीतले ते EESL चे १५ % प्रोजेक्ट कंसल्टंसी चे ३ % ईन्फ्रास्ट्रक्चर ची कॉस्ट १० टक्के कारण सर्व कॉस्ट मुळ किंमतच जर वाढली एलईडी ची ८५ रू पर वॅट प्रमाणे ४८२१८५४५/- वर होणारे टॅक्सेस चा दर हा आपल्यावर अतिरीक्त बोझा असेल म्हणजे १८ टक्के GST कसा द्यायचा आहे. आपल्याला ४कोटी ८२ लाखावर ईन्फ्रास्ट्रक्चर ची कॉस्ट १० टक्के ४कोटी ८२ लाखावर कंसल्टंसी कशावर द्यायची आहे ४कोटी ८२ लाखावर म्हणजे पर्यायाने मुळ जी रक्कम आहे तीच आपल्या दृष्टीकोनातून जास्त आहे आणि ती भरमसाठ जास्त किंमतीची असल्याने या खर्चावर असलेले टॅक्सेस किंवा ईतर खर्च तर हा प्रकल्प जवळपास ६ कोटी पर्यंत पोहोचेल यामध्ये मक्तेदार यांनी स्वत:चे निधी ही २० टक्के गुतंवणूक केलेली आहे या कंपनीने हा मक्ता घेतलेला आहे त्याने २० टक्के रक्कम गुतंवणूक केलेली आहे आणि ८० टक्के रक्कम तो मक्तेदार बँकेकडुन व्याजाने घेणार आहे आणि ८० टक्के रकमेची जी काही व्याजाची रक्कम होईल आणि त्याचा व्याजाचा हिशोब हा आपल्याच प्रकल्पावर लोड केलेला आहे म्हणजे एकाप्रकारे ही माळ व्याजाची माळ मनपालाच सोसायची आहे पर्यायाने जास्त ८५ रू दर घेणारा वॅटेजेसचा एलईडी त्याची सुध्दा जास्त आर्थिक माळ आपल्यावरच आहे व त्याच्यावर होणारे सर्विसेस चार्ज जे आहेत त्याची सुध्दा माळ आपल्यावर आहे आता हया सगळयांच कॅल्कुलेशन करता साधारणत: हा कॉन्ट्रक्ट ७ वर्षांसाठी बांधलेला आहे या ७ वर्षामध्ये साधारणत: आपण या मक्तेदाराला समथिंग अमाऊंट १३ कोटी ८७ लाख रू आपण देणार आहोत म्हणजे जवळपास आपण १४ कोटी या मक्तेदाराला देणार आहोत म्हणजे दरवर्षी साधारण आपण मक्तेदाराला २ कोटी देण्यासाठी बांधील आहोत विज बचतीच्या संदर्भात ताईंनी उपस्थित केलेला मुद्या तांत्रिक दृष्टया योग्य आहे की EESL ने करारनाम्यात स्पष्ट आहे की त्याने ५० विज बचत करायची त्याने हमी घेतलेली आहे परंतू आतापावेतो ज्या पध्दतीने ८५०० पथदिवे जे बदललेले आहेत त्याचे कुठलेच कॅल्कुलेशन हे मनपाच्या अधिकाऱ्यांनी सुध्दा आम्हाला विश्वासात न घेता आपल्या पध्दतीने केलेले आहे ज्याच्यामुळे विजबचतीचे जे उध्दीष्ट आहे ते साध्य होणे दुरापास्त आहे म्हणजे मी तुम्हाला ते पटवुन दाखवु शकतो की ते साध्य होणार नाही मग आपण जर संपुर्ण जळगांव शहरात पथदिवे हे सुरू झाल्यानंतर अंदाजे ३ कोटी ४० लाख रूपयांचे वार्षिक बिल आपण MSEB ला अदा करतो ३ कोटी ४० लाख रूपयांचे वार्षिक बिल अदा करीत असतांना जवळपास १ कोटी ७० लाख रू बचत जर आपण केली तर त्या बचतीचा कुठेतरी मक्तेदाराला ३ कोटी रू द्यायचे आहे आणि १ कोटी ७० लाख रू.चे बिल आपल्याला सेविंग करून देतोय म्हणजे १ कोटी ७० लाख रू. जे आहेत ते त्या मक्तेदाराला अधिक आपल्या महानगरपालिकेला ३० ते ३५ लाख रू . टाकुन आपण २ कोटी रू चा हप्ता फेडू शकतो की जेणेकरून आपण समजू की महानगरपालिकेला कुठल्याच प्रकारचे आर्थिक नुकसान होणार नाही हया सगळया गोष्टी पाहता ते शक्य आहे या मक्त्यांची मंजुरी जी आहे ती साधारणत: २९/०३/२०१९ ला जळगांव शहर महानगरपालिकेतील अधिकारी तसेच EESL कंपनीचे प्रतिनीधी यांची बैठक दि.२९/०३/२०१९ रोजी झालेली असुन जळगांव मनपाचे कमिशनर साहेब स्वत: या बैठकीला उपस्थित होते एस.एस.पाटील होते, भोळे साहेब होते आणि EESL चे अधिकारीही होते आणि त्या दि.२९/०३/२०१९ च्या संदर्भात ज्या ज्या मुदयावर शुचिताताईंनी आता चर्चा केली आहे त्या संपुर्ण चर्चेचे निवारण या ईतिवृत्तात आलेले आहे , प्रशासन झोपलेले आहे अशातला भाग नाही

प्रशासनाने याबाबतीत गंभीरपणे EESL चे अधिकाऱ्यांना, पदाधिकाऱ्यांना, नगरपालिका संचालनालयाला राज्य शासनाचे कक्षाधिकारी यांना सुध्दा कळविण्यात आले आहे परंतू मक्तेदार यांनी दि.२९/०३/२०१९ च्या बैठकीमध्ये जवळपास १३ मुदयावर चर्चा झाली होती आणि हे १३ चे १३ मुद्दे हे गंभीर स्वरूपाचे होते त्या गंभीर स्वरूपाचे मुद्यावर गंभीरपणे चर्चा झाली आणि तितक्याच जबाबदारीने EESL चे अधिकाऱ्यांनी त्यास्वरूपातील भूमिका स्विकारली की सदरचे लाईटस जे आहेत ते आम्ही तात्काळ बदलवुन देवु समन्वय साधुन आम्ही तात्काळ मान्य करू आणि शुचितातार्इंचे जे आक्षेप आहेत ते EESL चे अधिकाऱ्यांनी मान्य केले त्यानंतर किती पत्रव्यवहार झाले ०३/०४/२०१९ ला एक पत्रव्यहार झाला प्रादेशिक व्यवस्थापक , मुंबई दि.१०/०४/२०१९ ला कक्ष अधिकारी, नगरविकास विभाग, मुंबई, प्रादेशिक व्यवस्थापक , मुंबई यांचे कडे २५/०४/२०१९ , प्रादेशिक व्यवस्थापक , मुंबई यांची ईफीशियंसी दि.३०/०४/२०१९ , प्रादेशिक व्यवस्थापक , मुंबई यांचेकडे अजुन एक पत्रव्यवहार झाला त्यानंतर ३०/०४/२०१९ ला सहा.संचालक, नगररचना संचालनालय तसेच २४/०५/२०१९ ला प्रादेशिक व्यवस्थापक यांची ईफीशियंसी ३०/०५/२०१९ ला पुन्हा त्यांची ईफीशियंसी अशाप्रकारे ईतके पत्रव्यवहार झाल्यानंतर सुध्दा तो मक्तेदार या महानगरपालिकेला बदत नाही याबददल जी नाराजी मी व्यक्त करतो ती नाराजी महापौर ताईंची सुध्दा आहे स्वत: महापौर ताईंनी याबाबत गंभीर स्वरूपाचे पाऊल उचलण्याचे निर्देश दिलेले आहेत. सन्मा.आमदार राजुमामा भोळे यांचासुध्दा पत्रव्यवहार यासंदर्भात झालेला आहे. अशी कुठली एजन्सी आहे की सरकारची एजन्सी आहे म्हणून तीला अभय आहे असा हा विषय होऊ शकतो का ? आज जर याठिकाणी खाजगी मक्तेदार असता तर महानगरपालिका थांबली असती का ? आतापर्यंत त्याला ब्लॅकलिस्टेड केले असते आपण की जो मा. महापौर यांच्या पत्राचा ठिकाणा घेत नाही. मा.आमदार महोदयांच्या पत्राचा ठिकाणा घेत नाही मा.आयुक्तांच्या पत्राचा ठिकाणा घेत नाही अशी निर्ढावलेली एजन्सी आहे , म्हणजे मा.आमदार सुध्दा या विषयी गंभीर आहेत .

श्री.कैलास सोनवणे :- हे चुकत आहे.

श्री.नितीन लढढा :- हया संदर्भात तुम्ही सुध्दा अभ्यास केलेला आहे , याबाबतीत मोठया प्रमाणात महानगरपालिकेचे आर्थिक बाबतीत गदा येते आहे एजन्सी जरी शासनाची असेल शेवटी निर्णय या शहराच्या हिताच्या दृष्टीकानातुन या सभागृहाने निर्णय घ्यायचा आहे कारण या सभागृहातील सदस्यांवर जळगांव शहरातील नागरीकांनी विश्वास टाकलेला आहे आणि त्यांच्या विश्वासाला जागणेसाठी जो काही निर्णय असेल तो घेणे या सभागृहाची प्राथमिकता असते याविषयी १३ कोटी रू. चे पेमेंट आपण ७ वर्षात या कंपनीला आपण करणार आहोत या कंपनीच्या अनुषगांने एक ढोबळ गणित मी तुम्हाला सांगतो csl पेक्षा कमी दराने चांगल्या कंपनीचे लाईटस उपलब्ध होवु शकतात हा विषय उपस्थित करु या. विषयी आपण खोलात जावुन बघायला पाहीजे की ८५ रू पर वॅट EESL आपल्याला चार्ज करत आहे ठिक आहे आज आपला पैसा आहे आणि म्हणून त्याने १० टक्के आपल्याकडुन व्याज मागायचे किंवा १५ टक्क्यांनी मागायचे एक रिजनिबीलीटी असेल तर निश्चतपणे आपण वस्तु जर महाग घेतली तर समजू शकतो परंतु याअनुषगांने ७ वर्षामध्ये १४ कोटी भरणार , औरंगाबाद येथे रेऑन कंपनी म्हणून आहे की ज्या कंपनीचे पथदिवे आपल्या महानगपालिकेचे सार्व.शौचालय येथे स्वच्छ भारत अभियानातर्गत तेथे पथदिव्यांची व्यवस्था केलेली आहे त्या पथदिव्यामध्ये बऱ्याच ठिकाणी वापर केलेले आहे मी फक्त फॉर एक्झम्पल म्हणत आहे अशा बऱ्याच कंपन्या असतील याबाबतीत प्रशासन बारकाईने जावु शकते या कंपनीचे वॅटेजचे दर मी मागविले आहेत यामध्ये २५ पासुन १५० वॅटेजेस चे वेगवेगळया पध्दतीचे रेट आहेत २५ वॅट चा रेट आहे ४४.४० पैसे, ३० वॅटचा आहे ३८ रू., ४० वॅटचा आहे ३१.५० पैसे ४८ वॅटचा आहे ४६.५० पैसे, ६० वॅटचा आहे ३९.०० रू., ७२ वॅटचा आहे ३७.०० रू., ८० वॅट आहे ३२.०० रू., १०० वॅटचा आहे ३० रू., १२० वॅटचा आहे २८ रू, १५० वॅटचा आहे २१.२० पैसे पर वॅटेजेस आहेत म्हणजे आपण त्यांना देतोय ८५ रू पर वॅटेजेस आणि कुठे रेट आहेत ३० ते ४० रू. च्या आसपास एक ॲव्हरेज आपण धरून घेवु या सगळयांचे साधारण रेट जातो ३६ रू पर वॅट ESSL ने १८ टक्के GST लावलेली आहे या कंपनीने माझ्या व्हाटसअप वर मेसेज केले आहे या कंपनीने १२ टक्के GST ची आकारणी केलेली आहे जर आपल्याला ५६७२७७ वॅटेजेस ८५ रू प्रमाणे होणारी रक्कम ४,८२,१८,५४५/- जी आपण EESL ला अदा करणार आहोत . आणि हेच लाईटस आपण कोणत्याही दुसऱ्या कंपनीकडुन किंवा फॉर एक्झम्पल रेऑन कंपनी म्हटलेले आहे यांच्या दराची तुलना केल्यास ५६७२७७ वॅटेजेस गुणिले ३६.१५ रू. याची किंमत जाते २ कोटी ५ लाख २७७ रू. आता दोन कोटी रूपयांमध्ये संपुर्ण जळगांव शहरातील हे पथदिवे महानगरपालिकेने दुसऱ्याकडुन घेतले तर आज आपण २ कोटी रू मध्ये संपुर्ण जळगांव शहराचे पथदिवे बदलवु शकते ज्याचे आपण दरमहिन्याला दोन कोटी रू देणार आहोत आणि ७ वर्ष आपण देणार आहोत जर एकाच वेळेस महानगरपालिकेने २ कोटी रूपयांची ईन्व्हेस्टमेंट केली तर संपुर्ण जी काही विज बचत होईल ही संपुर्ण तर ती आर्थिक स्वरूपात महानगरपालिकेच्या तिजोरीत येईल. ईन्फ्रास्ट्रक्चर कॉस्ट ऑलरेडी आपण EESL ला देतोय त्याच कॅल्कुलेशन मी या ठिकाणी करीत नाही आहे ही ईन्फ्रास्ट्रक्चर कॉस्ट ४ कोटीच्या अनुषगांने १० टक्के जरी म्हटली तर ४० लाख रू होते २ कोटी च्या अनुषगांने २० लाख रू होईल GST हा १२ टक्के प्रमाणे करतोय तो १८ टक्के करतोय याची तुलना केलीतर तो निम्मा होईल असा सर्व

एकंदरीत विचार केला तर मला वाटते की सभागृहाला मी विनंती करतो की आहे ज्या स्थितीला हा कॉन्ट्रक्ट रदद करणे या महानगरपलिकेला आर्थिक हिताचे आहे याची तुलना करण्यात काहीच वावगे नाही शेवटी त्यामध्ये टर्म अॅन्ड कंडीशन्स मध्ये एक भुमिका स्पष्ट आहे , करार दोघेही रदद करू शकता महानगरपालिका किंवा कंपनीनी सहकार्य करीत नसेल तर महानगरपालिका सुध्दा करार रदद करू शकते कामाची मुदत त्याच्या संदर्भातला झालेला पत्रव्यवहार या सगळया गोष्टी ज्या आहेत हा करार रदद करण्याच्या संदर्भात या महानगरपालिका कडे अधिकार सुरक्षित आहेत त्या अटीशर्तीचा आधार घेवुन महानगरपालिका आहे त्या परिस्थिती मध्ये हा करार रदद करू शकते आणि रदद करणे या महानगरपलिकेच्या आर्थिक हिताचे आहे म्हणुन या सभागृहाला माझी विनंती आहे की या संदर्भातला ठराव पारीत करावा आणि आहे तो प्रश्न ज्या पध्दतीने आपण ज्या विभागाच्या माध्यमातुन आपण पथदिव्यांची दुरूस्ती ज्या पध्दतीने करीत होतो त्या पध्दतीने ती सुरू करावी. याच्या संदर्भातला काय न्यायनिवाडा होईल तो बघता येईल आणि हा करार जर संपुष्ट ात आला तर महानगरपालिकेचे निश्चितच १८ कोटी रू वाचतील आणि आज महानगरपालिकेची आर्थिक परिस्थितीचा विचार करता आज १८ कोटी रू ची रक्कम ही महानगरपालिकेच्या दृष्टीकोनातून खुप मोठी रक्कम आहे, आपण कर्मचाऱ्यांचे पगार वेळेवर करू शकत नाहीत छोटया मोठया गटारींचे ढापे वेळेवर रिपेअर करू शकत नाही अशा परिस्थितीमध्ये आयुक्तांचे मी पुन्हा स्वागत करतो आणि पुनश्च एकदा विनंती करतो की अशा पध्दतीचा ठराव पारित करावा आणि हे रदद करावे अन्यथा महापालिकेच्या आर्थिक परिस्थितीला आपण सर्वच जण जबाबदार राहू अशी भिती वाटते .

श्री.कैलास सोनवणे :- शुचिता ताईंनी हा जो ठराव मांडला तेव्हा अश्यात जर आपल्याला रदद करता येईल का

श्री.नितीन लढढा:- होय.

श्री.कैलास सोनवणे :- कारण मी करारनामा वाचलेला नाही आणि जो विषय मांडला गेला आहे, आणि पुर्वीसुध्दा मिटींग झाली होती सन्मा सदस्यांची तेव्हा मक्तेदाराबददल तक्रारी होत्या त्यावेळी नितीन भाऊंनी त्याला फोन करून सांगीतले होंते तुमच्या कामाची पध्दत बदलावी कारण नगरसेवकांची नाराजी आहे शहरामध्ये नाराजी आहे हे सगळे सांगीतले होते तरी मक्तेदाराच्या कामात काही सुधारणा झालेली नाही जी परिस्थिती शुचितातांईनी मांडली, नितीन भाऊंनी मांडली नितीन भाऊ मक्तेदाराचा कॉन्ट्रक्ट २ वर्षांची गॅरटी किंवा दोन वर्षांचा कॉन्ट्रक्ट आहे असे काही आहे काय ? मग टेंडर देतांना कोणीतरी काहीतरी केलेले आहे कारण जळगांव शहरामध्ये सर्वप्रथम एलईडी लावायचे होते त्यावेळी मी सर्व अभ्यास करून मी हे केल होते त्यावेळी तुम्ही महापौर होते भाऊ आणि त्यावेळी हा एलईडीचा मक्ता शासनाकडुनच मंजुर झाला त्यात्याठिकाणी एलईडीची स्किम राबविली त्यावेळी पेपर मध्ये वाचले मी की ६ वर्ष गॅरटी देत होते दुसरे कंपनीवाल्यांनी माझ्याशी कॉन्टक्ट केले होते त्यावेळी ते कॉन्ट्रक्टर तुमच्या कडे आले नव्हते का ? हॅवेल्स कंपनीवाला आला होता ६ वर्ष गॅरंटीचा आणि मला असे वाटते की दरवर्षी देखभाल व दुरूस्तीसाठी ५० लाख रूपये खर्च होतात , पाटील साहेब हे बरोबर आहे का ?

एस.एस.पाटील :- बरोबर आहे.

श्री.कैलास सोनवणे :- तर आपले जवळ जवळ ३ कोटी रू आपले वाचणार होते आणि आपला हा सर्व बजेट ४० कोटीचा होता म्हणजे हा सर्व बजट कसा वाढला की वाढवला गेला की तुम्ही त्यात चुकी केली ते मला माहित नाही. तर हा सर्वा जो प्रकार झालेला आहे.तर चुका तर झालेल्या आहे कोणाच्या नाही तर कोणाच्या हातुन आणि जेव्हा हा कॅन्ट्रॅक्ट दिला गेला तेव्हा मी राजीनामा दिलेला होता नेमका. चला ठिक आहे जे काही घडल असेल मागे परंतु सभागृह मान्य करेल या ठेका रद्द करण्याच्या संदर्भात. मान्य आहे ना सर्वांना. मान्य आहे ना प्रशासनाचे मत घेऊन. प्रशासनाचा मत याच्यासाठी सांगत आहे की हे केल्यानंतर आपल्यावर काय परिस्थिती उद्‌भवणार आहे.

श्री.नितीन लढढा :- अप्पा. अटीशर्तीमध्ये प्रशासनाचा आणि मक्तेदाराचा वाद उद्‌भवल्यास, कामासंदर्भात किंवा पेमेंट संदर्भात काही ही वाद उद्‌भवल्यास सदर बाब तीन दिवसाच्या आत सोडवायचा आहे. जळगांव महानगरपालिका कराराचे उल्लंघन करत असेल तर ईईएसएल महानगरपालिकेला टरमिनेशनची नोटीस ३० दिवसाच्या आत आवश्यक ती उपाय योजना करणेबाबत सुचवेल. महानगरपालिकेने दिलेल्या कालावधीत उपाययोजना करत असतांना करार संपते तसेच ही महत्वाची अट आहे. तसेच ईईएसएल ने कराराचे उल्लंघन केल्यास टरमिनेशन नोटीस देण्याचा अधिकार तसेच करार संपुष्टात आणण्याचा अधिकार महानगरपालिकेला असेल. म्हणजे काय झालेले आहे करारचा उल्लंघन ऑलरेडी झालेले आहे. म्हणजेच ३१ मार्च २०१९ पर्यंत त्यानी संपुर्ण जळगांव शहराच्या पथदिवे बदलुन देणे गरजेचे होते. म्हणजेच Breach of Contract तेथे झालेला आहे ३१/०५/२०१९ लाच असे नाही की आपण ३१/०५/२०१९ एकदम तंतोतंत धरतोय परंतू त्याच्या कार्यपध्दतीमध्ये काहीतरी सुधारणा व्हावी त्या अनुषंगाने प्रशासनाने वेळोवेळी त्याच्यासोबत पत्रव्यवहार केले आहे आणि त्या पत्र व्यवहाराच्या अनुषंगाने EESL हा मक्तेदार कामाच्या बाबतीत गंभीर असल्याचे दिसुन येत नाही तरी महानगरपालिकेला हा करार संपुष्टात आणण्याच्या दृष्टीकोनातुन उपयुक्त ठरेल आणि केलेला ठराव महानरगपालिकेच्या

आर्थिक हिताचा आहे आणि आर्थिक हिताचा असल्याकारणाने मला नाही वाटत शासन असेल किंवा केंद्र शासन असेल काणतेही शासन एखादया स्थानिक स्वराज्य संस्थेचे नुकसान करेल अशी भुमिका यावेळी घेवू शकत नाही .

मा.आयुक्त :- सन्मा.महापौर व उपमहापौर सर्व सन्मा.सदस्य EESL च्या संदर्भात आता आपण जी काही चर्चा करतोय तर अतिशय चांगल्या पध्दतीने चर्चा झाली आणि आपल्याला जे काही सूचना दयायच्या होत्या अपेक्षित असलेल्या ज्या काही व्हाईट पेपर होत्या त्या प्रशासनाने ज्या वेळेला हा करार राज्य पातळीवरून करण्यात आला तर त्यावेळी बरेच दिवस राज्य पातळीवर चर्चा होत होती केंद्र शासनाने वेगवेगळया निधीच्या संदर्भात राज्य शासनाने या संस्थेची निवड करणे आणि एनर्जी बचत करणे या संदर्भात काही अटी घातल्या होत्या आणि त्याची सांगड केंद्रीय अनुदानाशी घातली होती त्यामुळे राज्य पातळीवर हया करार सर्व स्थानिक संस्थांना बंधनकारक होता आता याठिकाणी ही गोष्ट आपल्या लक्षात आली पाहीजे की राज्य शासनाने एक जी.आर काढुन बाकीचे आपले कामकाज सुरू करावे आतापर्यंत जी चर्चा झाली मी माझ्यापातळीवर ३ मिटींग यासंदर्भात घेतल्या आहेत या कामाच्या संदर्भात संचालक , नगरपालिका प्रशासन जे आय.ए.एस ऑफीसर आहेत तर ते ते राज्य शासनासाठी काम करत आहेत आणि त्यांच्याशी माझी चर्चा झाली त्यांनी सुध्दा आपल्या कडुन जे काही पाठपुरावा होतोय त्याचे त्यांनीही ॲप्रिसिएट केले VC मध्ये सुध्दा त्यांनी जळगांवच्या संदर्भात तुम्ही अतिशय चांगल्या पध्दतीने काम करत आहेत आणि त्याचा जाब त्या कंपनीला विचारणार होतात असे असुन सुध्दा त्या कंपनीच्या कामामध्ये काही सुधारणा झालेली नाही ही वस्तुस्थिती आहे , डिपीआर च्या संदर्भात एक ठराविक पातळीवर कोणत्या प्रकारचे एलईडी लावणार त्याबाबतचे डॉक्युमेंट दाखवा तर ते दाखविले नाही किंवा किती लावले यावरून आपल्याला ते बंद करता आले असते तर तसे काणतेही डॉक्युमेंट नव्हते आणि त्यांनी शेवटच्या तारखेला त्यांनी डॉक्युमेंट दिले त्या कपंनीचा अटटाहास असा होता २०० लावले किंवा एका दिवसामध्ये १०० लावले तर १०० चे पार्ट पेमेंट द्या आपला अनुभव असा होता की १०० पैकी १० /१५ किंवा २० बंद पडलेले होते तर आपण त्यांना काय सांगत होतो. की हे काम सुरु असतांना नविन लावण्याचा प्रयत्न करा. आणि जे बंद पडलेले आहे त्यांना ही चालु करण्याचे काम करा.तर ते ही त्यांनी मान्य केलेले आहे. तर ती जी बाब आहे. आपल्याला ही सर्व बाबींचा गांर्भियपुवर्क विचार करावा लागेल. पुन्हा एकदा ही पुर्ण बाब आपण शासनाच्या निदर्शनास आणुन देऊ. पुढच्या मिटींग मध्ये आपण सविस्तर खुलासा करु असे मला वाटते.

श्री.नितीन लढढा :- वागणुक सुधरली मक्तेदाराची आणि वागणुक सुधारल्यानंतर झालेल्या अटीशर्ती प्रमाणे त्याने काम करायला सुरुवात ही केली. काम पुर्णत: चा दाखला दिल्यानंतर त्याची बँक गॅरंटी रिलीज करण्या संदर्भात सुध्दा प्रमुख अट आहे. बँक गॅरंटी रिलीज होऊन जाईल. बँक गॅरंटी रिलीज झाल्यानंतर आपल्या हातात दुसर काही राहणार नाही. परंतु हा उपक्रम ७ वर्षापर्यंत राबविणे. जे कॅलक्युलेशन मी तुम्हाला कंपनीच्याकडुन करुन देत आहे त्याची जर तुलना केली तर हे कुठल्याही स्वरुपात व मक्तेदार जरी सुधारला तरी सुध्दा या महानगरपलिकेचा आर्थिक हित साध्य होणार नाही. म्हणुन कमीत कमी आपल्याकडे ही Opportunity आहे की या स्टेजला त्याला टरमिनेशन करणे आणि त्याचा प्रस्ताव रद्द करणेस मोठी संख्याने तुम्हाला १५००० पथदिवे घेण्याचे. अत्यंत स्पर्धात्मक युग आहे. एकीकडे. या एलईडी च्या संदर्भात भरमसाठ प्रचंड स्कीम झालेली आहे आणि प्रचंड नविन नविन कंपन्या आलेल्या आहे. For example म्हणतो की एखादी स्थानिक कंपनी असेल ती याच पॅरामिटर वरती याच अटीशर्तीं वरती करारनामा करायला तयार असेल अशी स्थानिक कंपनी तुम्हाला केव्हाही सुटेबल राहील. केव्हा तुम्ही त्यांना जाब विचारु शकता इतके पत्र व्यवहार करायची तुम्हाला गरज सुध्दा भासणार नाही. आणि सगळ खेळ कमीत कमी कितीत होईल. दोन सव्वा दोन अडीच कोटींमध्ये हा खेळ होईल. निधीची चिंता करु नका. १४ व्या वित्त आयोगातला पैसा आहे आपल्याकडे शासनाने जरी सांगितला असेल १४ व्या वित्त आयोगातला जर पैसा खर्च करायचा असेल तर ही तुमच्यावर बंधनकारक केलेला आहे की तुम्ही ईईएसएल च्या माध्यमातुन करा. पण ज्या वेळेस मनपाचा Own Funding असेल आणि Own Funding कसा खर्च करावा हे कोणीही आपल्यावर बंधन टाकु शकत नाही. जरी राज्य शासनाने ते निर्णय काढला आहे परंतु मी म्हणतो जर त्यांनी ही आव्हाहन दिले तर महानगरपालिकेच्या Own निधीचा पैसा शासन आपल्याला अश्या पध्दतीने Dirction देऊ शकणार नाही अमुक कंपनी कडुन घ्यावा लागेल किंवा टमुक कंपनीकडुन घ्यावा लागेल आज अनुदानातुन पैसा आपण देतो आहे. आणि अनुदानातुन मिळालेल्या पैश्यांवर राज्य शासनाचा आणि केंद्र शासनाचा हक्क आहे म्हणुन त्यांच्या सर्व गोष्टी आपल्याला मान्य करावे लागतील. निधीची अडचण आहे हे मी मान्य करतो. ३ कोटी रुपयांचा हफ्ता आपण दर महिन्याला आपण हुडकोला भरतो.ते आपण मनपा निधीतुनच भरत आहे.

श्री.कैलास सोनवणे :- हे पहा आमदारांनी ही पाठपुरावा केलेला आहे आणि गिरीषभाऊंनी ही समज दिलेली आहे. आयुक्त साहेबांनी ही पाठपुरावा केलेला आहे. यांनी वेळोवेळी पत्रव्यवहार केलेला आहे त्याला संधी देवुन काही फायदा नाही तो सराईत आहे आपण हया मिटींग मध्ये हा ठराव करून घेवू आणि जसा ठराव मांडायचा आहे तो मांडा आणि तो करून आपण कामाला सुरूवात करून टाकु.

मा.आयुक्त :- हा आयत्या वेळेचा विषय होता आणि हा अशा टेक्नीकल विषय आहे टेक्नीकल गोष्टीचा विषय आहे .

श्री.कैलास सोनवणे :- हे काही चुकीचे नाही आहे साहेब

मा.आयुक्त :- सर्व बरोबर आहे आपली बाजु

श्री.नितीन लढढा :- सभागृहाने घेतलेला निर्णय हा कुठलीही गोष्ट असो याला संधी देणे म्हणजे आपण घोंगड बांधुन घेवु

मा.आयुक्त :- ते काम आपलेच आहे त्याला संधी देणे म्हणजे प्रशासनाला आपली जबाबदारी नाहीये अस काही नाही प्रशासनाला लिमिटेशन आहेत .

श्री.कैलास सोनवणे :- साहेब नियमाप्रमाणे तुमच्याकडे किती वाजता लक्षवेधी आलेली आहे,दोन तास अगोदर आलेली आहे .

श्री. नितीन लढढा :- आयत्यावेळेला सभागृहाला वेळेत लक्षवेधी प्राप्त झालेली आहे .

श्री.कैलास सोनवणे :- सभागृहाचे एकमत आहे हा विषय येथेच पास करावा.

श्री. नितीन लढढा :- महापौरताई व सन्मा.आमदार आपण आपली स्वत:ची कमी करून घेतो आहेत का आपण एक डिग्रीचे आहोत , महापौर ताई आपण एक Dignity आहात, आमदार या शहराची एक Dignity आहे. सन्मा सदस्य हे Dignity आहेत जर Dignity चा अशा पध्दतीने कोणी अपमान करीत असेल तर मला वाटतं याच्या संदर्भात असे Patience ठेवणे कदाचित उचित होणार नाही. आपली भुमिका सहानभुतीची आहे समन्वयाची आहे. शेवटी कस आहे. तुमच्या समोर शासन आहे म्हणुन हा आपण समन्वयाच्या भुमिकेत आहात. हा जर एक आधा खाजगी मक्तेदार असता तर तुमची ही भुमिका बदललेली असती तुमची भुमिका वेगळी राहीली असती. दुसरा कुठला मक्तेदार राहिला असता त्याची ही भुमिका आक्रमक राहीली असती. ठराव आपण पारीत करुन घ्यावा. त्याच्या संदर्भात काय कशी निती आहे ते आपण बघु मा.सभागृह सक्षम आहे.

श्री.कैलास सोनवणे :- भाऊ ठराव मांडा .

श्री.ललित कोल्हे :- नितीन भाऊ, शुचिता ताई म्हणता आहेत की या संदर्भात विशेष सभा घेऊन टाकु.

श्री. नितीन लढढा :- तुम्हाला आम्हाला सगळयांना संपुर्ण जळगांव शहराने Trusty म्हणुन या सभागृहात पाठविलेले आहे. या महानगरपालिकेचा एक एक रुपया वाचविण्याची जबाबदारी नागरीकांनी आपल्यावर टाकलेली आहे. आणि जेव्हा संपुर्ण सभागृह या विषयावर एक मत आहे. बघा राज्य शासन मोठे आहे. केंद्र शासन मोठे आहे.

श्री.कैलास सोनवणे :- ठराव मांडा भाऊ.

श्री.नितीन लढढा :- दि.११/१०/२०१८ महानगरपालिकेचा EESL कंपनीसोबत दि.२८/११/२०१८ रोजी झालेला करारनामा त्या करारनाम्याचे अटी शर्तीचे उल्लंघन केले असता जळगांव शहर महानगरपालिकेने सर्व करारनाम्याच्या अनुषगांने संपुर्ण शहरातील पथदिव्यांची नविन पथदिवे बसविण्याचा धोरणात्मक निर्णय घेतलेला होता आणि त्या धोरणात्मक निर्णयाच्या अनुषगांने EESL या कंपनीसोबत करारनामा केला होता.

श्री.सुनिल महाजन :- ठराव रदद करण्यापुर्वी हे पहा की त्या संबंधी कोणाकोणचे मक्तेदाराशी हित संबध जुळलेले आहेत.

ॲड . शुचिता हाडा :- या विषयावर मी येथे मांडू ईच्छिते की संपुर्ण सभागृहातील सगळयांचीच त्या ठेकेदाराबददल नाराजी आहे हे उघड आहे आज तो ठेकेदार अनेक बाबींमध्ये चुकलेला आहे आणि हा ठेका रदद करण्यात बाबत आपले एकमत होत आहे तरी साहेब जसे म्हणत आहेत की नंतर आपल्याला काही अडचणी येवु नयेत त्या पण महत्वाच्या आहेत सर्वानुमते ठराव करून घ्या त्यानंतर जर काही ईश्यु होणार असेल तर किंवा महानगरपालिकेच्या कोण त्याच्या मागे आहे तर मला तरी वाटते की, आयुक्तांपर्यंत हे पाहोचले आहे संमत झालेले आहे तर या संदर्भातील सर्व अधिकार आयुक्तांकडुन , प्रशासनाकडुन त्यांच्या अधिकाराचा वापर करून व्हायला पाहीजे आणि या विषयाबददल जे काही असेल त्याचा विचार प्रशासनाने करावा आणि जे काही निर्णय घ्यायचा असेल याबाबत त्यांनी विचार करून हा ठेका रदद करून कार्यवाही करावी .

श्री.नितीन लढढा :- आयुक्तांवरच्या अधिकारा संदर्भात आपल्या मनात काही संकोच नाही परंतू उघड डोळयांने संपुर्ण परिस्थिती पाहीली जाते या संपुर्ण सभागृहाने कुठेतरी आपण बचावात्मक दोन पावले मागे जातो त्याचे दुख: मनाला होते हा ठराव तत्वत: मान्य करून घ्यावा या ठरावाबाबत आपण ४ दिवसांनंतर विशेष महासभेचे आयोजन करून घेवु की दुसरे असे की राज्य शासनाकडुन यासंदर्भातील कुठलाही दबाब आला तर किंवा मक्तेदाराकडुन हमी देण्यातआली की आम्ही विहीत मुदतीच्या आंत काम पुर्ण करून देवु तरी हे महानगरपालिकेच्या आर्थिक हिताचे नाही आणि या सभागृहातील कोणाचा मक्तेदारा संदर्भात काही भुमिका असतील तर आमचा या बाबत विरोध राहील परंतू माझी पुनश्च विनंती आहे की तत्वत: हे मान्य करा की हा करारनामा ४ दिवसानंतर कायदेशीर रित्या रदद करावयाचा असेल तर आपण निश्चितच विशेष महासभेचे आयोजन करू आणि हा त्यात निर्णय हाच घ्या की हा करारनामा रदद होईल आणि

हा करारनामा रदद होणची सक्षम कारण आज तुमच्याकडे आहे महानगरपालिकेच्या आर्थिक हिताच्या दृष्टीकोनातुन याकडे पाहावे ही सभागृहाला विनंती आहे

मा.आयुक्त :- आयुक्तांना अधिकार असतात असे नाही. काही प्रशासकीय बाबींमध्ये अधिकार दिले आहेत .

ॲड. शुचिता हाडा :- नितीन भाऊंनी आता सांगीतले की तत्वत: मान्यता दया आणि ४ दिवसांनी महासभेचे मत घ्या. म्हणजे प्रशासन ही अडचणीत येणार नाही. आणि सगळे सदस्य व नगरसेवकांच म्हणणं मान्य होणार.

मा.आयुक्त :- मक्तेदाराला तीस दिवसाची नोटीस द्यायची .

मा.उपमहापौर :- हा टर्मिनेशनची नोटीस द्या.

श्री.नितीन लढढा :- आपण एक काम करु. आज या सभागृहात झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने संपुर्ण सभागृह या एकमतावर आलेला आहे की EESL या कंपनीशी झालेला करारनामा त्याच्या संपुर्ण अटीशर्तीचा या सभागृहात चर्चा झाली. त्याच्यावर सर्व सन्मा.सदस्यांनी चर्चा केली आणि या चर्चेने सदरहु मक्तेदार याच्या कार्यपध्दतीमध्ये कुठेही बदल होऊन दिसत नाही आहे. दिलेल्या मुदतीत मक्तेदाराने ५०% पेक्षा जास्त काम केलेला नाही आहे. जे काम केलेले आहे ते ही समाधानकारक नाही. याच्या व्यतिरिक्त जे अटीशर्ती चा टेस्ट रिपोर्ट त्याने सादर करायला पाहिजे. ते दिलेले नाही. कोणत्या कंपनीचा तो फिक्चर लावत आहे ते सुध्दा त्याने द्यायला पाहिजे.

श्री.कैलास सोनवणे :- भाऊ हे दहा वेळा झाले तुम्ही ठराव मांडा.

श्री.नितीन लढढा :- मक्तेदाराने अटीशर्तीचे वारंवार उल्लंघन केलेले असल्याने या मक्तेदाराचा करारनामा संपुष्टात आणण्याच्या दृष्टीकोणातुन ही सभा हा निर्णय घेत आहे की मा.आयुक्तांना निर्णय देत आहे की त्यांनी तातडीने महासभा संपल्यानंतर मक्तेदाराला जी काही विहित मुदत निर्धारीत केलेली असेल त्या विहित मुदतीची नोटीस मक्तेदाराला देण्यात यावी. आणि विहित मुदत संपुष्टात आल्यानंतर करारनामा तात्काळ रद्द करुन त्याची माहिती या सभागृहाला अवगत करण्यात यावी असा ठराव पारीत करण्यात यावा.

श्री.सुरेश सोनवणे :- आपले ए.टी.डी.वाले झाले, अमृतवाले झाले किंवा साफसफाईवाले झाले यांनी जर नियमाचा व अटीशर्तीचा भंग केला तर त्यांना जो कोणही पाठीशी घालीन. जो नगरसेवक पाठीशी घालीन. त्यांच्यावर व साहेबांवर फौजदारी गुन्हा दाखल करावा. कोणताही मक्ता असो, साफसफाईचा असो की अमृतचा असो की कोणताही असो, कोणतेही मक्तेदाराला पाठीशी घालु नये.

सौ.उज्वला बेंडाळे :- लाईट लावायचे आता बंद आहे पण जे लाईट लागलेले आहे. ते पण बंद आहे. या विषयी जर तो ठेकेदार निघुन गेला पण नागरीकांना तर आम्हाला फेस करावे लागते. आता जो माझा वार्ड १२ आहे तेथे शाळा आहे. शाळा सुरु होईल आणि आता पाऊसाचे दिवस आहे. त्यात आर्ध्यापेक्षा जास्त लाईट बंद आहे. याच्यात चुक कोणाची तो तर सोडुन चालला जाईल पण येथे आता पर्यंत बंद बंद तेच चर्चा सुरु आहे. पण जे लावलेले आहे ते बंद अवस्थेत आहे त्याच्या विषयी काय ?

श्री.मनोज चौधरी :- मा.अश्विन भाऊ जे बंद आहे त्या लाईटांच काय ? कारण की आमच्या वार्डात अविकासीत भाग आहे शहरातील नागरीक उमवि तसेच जैन इरिगेशन चे सर्व कर्मचारी हे त्या रस्त्याचा वापर करतात. मागे आम्ही कम्पलेंट दिलेली आहे. तेथे सगळे कुत्रे कावरलेले आहे. लहान लहान मुलांना खुप त्रास होतो. म्हणजे हे असे एक दिवसचे नाही आहे भाऊ त्या ठिकाणी नगरसेवकांना समजतं काय बोलतात लोकं. म्हणजेच नितीन भाऊ इतकं त्रास होतो की लोकं रात्री १२ -१२ वाजता उठवतात आणि सांगतात की तुमच्या घराच्या बाहेरची कांडी चालु आहे आणि आमच्या घराच्या बाहेरची बंद आहे. त्या ठिकाणी आपण कांड्या बदलल्याच नाही आहे त्या आपल्या जुन्या आहे. आपण सर्व सदस्य यांना सांगा. आणि तुमच्या अधिकाऱ्यांना जर सांगितलं तर ते म्हणतात की मटेरीअल नाही. तर याची जबाबदारी कोणाची आहे. अश्विन भाऊ स्वखर्चाने आम्ही कमीत कमी १००-१०० कांड्या आणुन बसविलेले आहे. अशी परिस्थिती आहे महानगरपालिकेची आणि एक वर्षापुर्वी जवळ पास साहेब मी स्वत: १५०-१७५ एल.ई.डी. लाईट तुम्ही माझ्या प्रभागात विचारपुस करा मी स्वखर्चाने लावलेले होते. ते सुध्दा यांनी काढलेले आहे आणि ते एल.ई.डी. लाईटस कुठे गेले ते विचारा तुम्ही यांना.

श्री.एस.एस.पाटील :- जळगांव शहरात जेथे जेथे एल.ई.डी. लागलेले आहेत आणि जे बंद झालेले आहे. तर बंद लाईटस तर आपल्याला उतरवावे लागतील. त्या ठिकाणी त्यांनी नविन लाईट आणि ब्रॅकेटस लावलेले आहे. शहरात ज्या ठिकाणी आपले जुने लाईट आहे त्या ब्रॅकेट वरती जे एल.ई.डी. इंस्ट्रुमेंटस आहे ते आपण परत रिपेअर करुन त्या ठिकाणी लाईटसची व्यवस्था आपण करुन देऊ.

श्री.मनोज चौधरी :- जे एल.ई.डी. लावलेले होते जे आपल्या जुन्या कांड्या आहेत ना त्यांचे काय झाले ?

श्री.एस.एस.पाटील :- जे आहेत आपले त्यांचा दुरूस्ती केलेली नाही. आणि जे मनपा चे लाईट आहे त्यांचा रिपेअरींगचे काम चालु आहे.

श्री.मनोज चौधरी :- किती दिवसापासुन चालु आहे. तुम्ही माझ्या वार्डात संध्याकाळी ७.०० - ७.३० वाजता या. मी तुम्हाला परिस्थिती दाखवतो. कमीत कमी ४०० कांड्या लागलेले असतील तर ३०० कांड्या बंद आहे. किती रिपेअर केल्या सांगा तुम्ही. अश्विन भाऊ माझ्याकडे त्या लोकांची फोन रिकॉर्डींग आहे. मी तुम्हाला दाखवु शकतो. एखाद्या नगरसेवकाला नाही. सामान्य माणसाला बोलतात असे बोलतात यांचे लोकं. आपले संबंधीत अधिकारी तर सोडा कर्मचारी सुध्दा ऐकत नाही साहेब.ऐवढी परिस्थिती खराब आहे आमच्या वार्डाची.

मा.आयुक्त :- एस.एस.पाटील, उद्या सकाळी ०८.०० वाजता किती लाईट सुरु आहे आणि किती बंद आहे ही माहिती मला पाहिजे आणि जे बोलता आहे ते मला कागदावर पाहिजे.

सौ.उज्वला बेंडाळे :- साहेब माझ्या नवरंग कॉलनी मध्ये अश्विनभाऊ माझ्या वार्डात दिवस आणि रात्र २४-२४ तास लाईट चालु असतात. म्हणजे आपण एकीकडे विज वाचवायची आणि २४-२४ तास लाईट सुरु ठेवायची चार चारदा सांगुन सुध्दा लाईटं बंद होत नाही.

श्री.मनोज चौधरी :- मी लाईट विभागाला फोन केला कि लाईटं मी लावलेली आहे ते मला परत करा ते लाईटं ही मिळालेले नाही आहे मला. ते तर परत करायला पाहिजे होते.

मा.आयुक्त :- महापालिकेच्या परिस्थितीनुसार आपण योग्य निर्णय घेतला, धन्यवाद.

श्री.नितीन लढढा :- सन्मा.सदस्यांनी योग्य निर्णय घेतला परंतु त्यांचा आक्षेप महानगरपालिकेच्या भुमिकेवर आहे. की मी सौजन्याने एल.ई.डी. लावले आपल्या स्वखर्चाने हे यांनी Replace केल्यानंतर माझे एल.ई.डी. मला परत मिळाल नाही ते गेले कुठे.

मा.आयुक्त :- ते तर Replace च केलेले नाही ना.

श्री.नितीन लढढा :- Replace केलेले आहे.

मा.आयुक्त :- आपण या संदर्भात प्रश्न उत्तर न करता हा विषय कश्या प्रकारे मार्गे लागेल या पध्दतीने विचार करु या. एक EESL ला नोटीस तर आपण देऊच आणि ज्या ठिकाणी EESL चे लाईटस आहेत. आपले लाईटस ही आहेत. आणि ज्या ठिकाणी असे बंद आहेत तर आपण संपुर्ण शहराचा पाहणी करुन किती बंद आहे ते पाहुया.

श्री.भागचंद जैन :- साहेब आपले शुचिता ताईंनी आणि नितीन भाऊंनी अभिनंदन तर केलेले आहेच. साहेब आपल्या बद्दल आमच्या मनात कुठलीही शंका नाही पण जसे एस.एस.पाटील साहेब आहे. सगळे कामं नगरसेवक तुमच्या पध्दतीनुसार करत आहे. भाऊ तुम्ही सभागृह नेते आहात तुम्ही डायरेक्ट जाऊ शकतात. पण नविन नगरसेवक घाबरतो जायला.मी जाऊ शकतो. साहेब प्रत्येक नगरसेवकाला असाच त्रास होत असतो. याच्या आधी माझे विशालभाऊ त्रिपाठी आणि आमचे बोलणे झाले होते की नगरसेवक डायरी चालु करावी. हे लोकं भेटायला येत नाही. साफसफाई वाले असतील किंवा लाईट विभागवाले असतील तर आपल्याला नम्र विनंती आहे की नगरसेवक डायरी परत चालु करावी.

श्री.इब्राहिम पटेल:- महापौर साहेबा माझ्या एरिया ची ५ दिवसापासुन लाईट गेलेली आहे. का गेलेली आहे आणि कोण चालु करेल हे विचारायचे आहे.

मा.आयुक्त :- तो एम एस ई बी चा प्रॉब्लम आहे.

श्री.विशाल त्रिपाठी :- आता आपण जे ट्युब कांड्या लावत आहे. जसे शुचिताताईंनी आणि नितीन भाऊंनी सांगीतले. तर आपण ते एल.ई.डी. विकत घेऊनच लावुन घ्या ना. त्याच पध्दतीने. फिक्चर कांड्या लावण्यापेक्षा आता जे नविन परचेस करायचे आहे आपल्याला नविन मिळेल ते एल.ए.डी. रुपांतरीत करुन तेच लावुन टाका हे माझे म्हणणे आहे.

मा.आयुक्त :- आज आपण अस म्हणु शकत नाही की आम्ही तुमचा करारनामा रद्द करतो तुमच्या एल.ई.डी. आम्हाला द्या.

श्री.विशाल त्रिपाठी :- नाही नाही त्यांच्या कडुन नाही घ्यायचे आहे. एस एस. पाटील साहेबांना सांगुन त्या ठिकाणी आपले विकत घेऊन लावा.

मा.उपमहापौर :- चला आता लाईटांचा विषय झालेला आहे. आता पुढचे विषय घ्या.

**नगरसचिव :- मा.महापौर व सहाय्यक संचालक, नगररचना विभाग यांचे कडुन आलेल्या प्रस्तावाचे वाचन केले.**

**मा.महापौर .सौ.सिमा सुरेश भोळे . यांचेकडील जा.क्रं.ज.श.म.न.पा/म.का/२०१९ दि.०४/०६/२०१९ अन्वये काळाची गरज लक्षात घेता जल बचती संदर्भात आवाहन करणे संदर्भात दिलेल्या पत्र वाचन करण्यात येत असुन ते खालील प्रमाणे .**

सद्यस्थितीत संपुर्ण राज्यासह शहरात पाण्याची टंचाई भासत असून काही शहर लगत असलेल्या खेडयामध्ये ८ ते १५ दिवसानंतर अपुरा पाणी पुरवठा तसेच टँकर द्वारे पाणी पुरवठा होत आहे. तसेच प्रत्येक ठिकाणी कुपनलिकेद्वारे जमीनीतील पाणी उपश्यामुळे भुजलस्तर देखील कमी होवुन कुपनलिका निरूपयोग होत आहे त्यातच उन्हाच्या तिव्रतेमुळे उपलब्ध असलेला जलसाठा देखील दिवसेंदिवस बाष्पीभवनाद्वारे कमी होत आहे.

परिणामी भविष्याचा विचार करता आपण सर्वांवी जलबचत , जल संवर्धन करणे काळाची गरज असुन माझ्यासह आपण सर्व उपस्थित पदाधिकारी , सदस्य, अधिकारी , कर्मचारी यांनी आपआपल्या इमारतीच्या छतावरील पाणी कुपनलिकांमध्ये सोडणे तसे शक्य नसल्यास आपआपल्या परिसरात कुठल्याही प्रकारे पावसाचे पाणी जमिनीत मुरेल अशी यंत्रणा अद्यावत करून आपले भविष्य व भावी पिढीस उदभवणाऱ्या जल संकटातुन मुक्त करूया ही विनंती .

तसेच **सहाय्यक संचालक नगररचना यांचेकडील पत्र जा.क्रं./नर/३५/२०१९ दि.०३/०४/२०१९ रोजीचे पत्र प्राप्त झालेले असुन ते खालील प्रमाणे असे.**

१४ व्या वित्त आयोग ॲक्सीस बँक खाते क्र.९१५०१००३४०४४२९६ चे दि.०२/०१/२०१९ रोजी संबंधीत खात्याचे डिसेंबर महिन्याचे विवरण (स्टेटमेंट ) काढले असता त्यात दि.१०/१२/२०१८ अन्वये AS PER COURT ORDER नुसार एकुण रक्कम रु.३,००,८९,४५२/- मात्र संबंधीत खात्यावरुन DEBIT परस्पर झालेली दिसुन आले. त्याबाबत अर्थ विभागाने बँकेत जाऊन चौकशी केली असता मा.श्रीमती एस.आर.गायकवाड ३ रे सह दिवाणी न्यायालय व स्तर जळगांव यांचे पत्र क्र.म.जा.क्र.२७४२/२०१८ दि.०५/१२/२०१८ रोजीचे पत्र ॲक्सीस बँकेस मिळाले मा.आयुक्त महानगरपालिका जळगांव यांचे खाते क्र.९१५०१००३४०४४२९ चे खाते गोठविण्यात आलेली रक्कम दि.१०/१२/२०१८ पावेतो न्यायालयात जमा करणेबाबत पत्रान्वये आदेशीत केल्यानुसार रक्कम अदा करण्यात आलेली आहे.

सदर १४ व्या वित्त आयोग ॲक्सीस बँक खाते क्र. ९१५०१००३४०४४२९६ वरुन दि.१०/१२/२०१८ नुसार एकुण रक्कम रु.४,१०,७५,३५२/- मात्र परस्पर दिवाणी न्यायाधीश व स्तर, जळगांव यांच्या खात्यावर वर्ग केलेल्या रक्कमेचा सविस्तर तपशील खालील प्रमाणे,

| अ.क्र. | दावा क्र. | पक्षकाराचे नांव | एल.ए.आर.क्र. | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | १८२/२०१८ | सुरेंद्र ब्रिजलाल पटेल | २००/२००४ | रु.३७,०५,५९९ |
| २. | १८३/२०१८ | जागृती संजय पटेल | १९९/२००४ | रु.६१,१८,७२९ |
| ३. | ३०४/२०१८ | रामकृष्ण नेवजी महाजन | १४१६/१९९८ | रु.७,३०,८१४ |
| ४. | ८०/२०१८ | घेवरचंद मोतीलाल जैन व इतर | ३५६/२००५ | रु.६१,७९,३१५ |
| ५. | २३४/२०१८ | यशवंत कृष्णाजी व इतर | २६०/२००५ | रु.२,३९,१०,१३७ |
| ६. | ७४५/२०१८ | लक्ष्मिकांत रामदास वाणी | ११९७/१९९८ | रु.४,३०,७५८ |
| | | | एकुण :- | रु.४,१०,७५,३५२ |

सदर रक्कमा १४ व्या वित्त आयोगाचे खात्यातुन जळगांव म.न.पा.ची संमती न घेता बँकेने परस्पर वर्ग केलेल्या असुन सदर रक्कमा नगररचना विभागाचे विकास शुल्कातुन वर्ग करणे कामी मा.आयुक्त यांनी दि.०२/०३/२०१९ रोजी मान्यता दिलेली आहे. तरी त्यानुसार वरील रक्कमांचे बिले १४ वे वित्त आयोगाकडे वर्ग करणे कामी बिले अर्थ विभागाकडे सादर करणेत आलेली आहेत.

श्री.नितीन लढढा :- साहेब तुम्ही ज्या गतीने वाचत आहात त्या गतीने या विषयाचा अवलोकन करता येत नाही. विषय कशाच्या संदर्भात आहे हे लक्षात येते. तातडीचा नसेल तर तुम्ही पुढच्या वेळेस पाठवा याला. तुम्ही दुसरी कुठली मिटींग घ्याल किंवा दुसरी जी महासभा येईल त्यात घेऊ किंवा त्याच्यातला संदर्भ सांगा की हे असा घटनाक्रम आहे आणि या घटनाक्रमामुळे प्रशासनाचा आर्थिक नुकसान होत आहे किंवा याच्यात कुठे बेकायदेशीर कृत्य घडलेले आहे. जसा तुम्ही वाचत आहे ते कळत नाही.

श्री.कैलास सोनवणे :- पुढचा विषय सुरू करण्याआधी मी तुम्हाला बोललो होती की मला दुसऱ्या विषय मांडायचा आहे की आपली जी मागे मिटींग झाली होती मला पाच ते सहा अतिक्रमणाच्या बाबतीत बोलायचे आहे मी विच ारले होते त्यांनी परवानगी दिलेली आहे साहेबांना माहिती आहे मला फक्त चर्चा करू द्या .

श्री.कैलास सोनवणे :- आसोदा रोड झोपडपट्टी आणि कांचन नगर मध्ये, आमचं एकच म्हणणं आहे चारही पाचही ठिकाणी नियमाप्रमाणे करा. नियमाप्रमाणे तोडता येत असेल तर तोडा आणि नाही तोडता येत असेल तर नका तोडा. आसोदा रोड झोपडपट्टीच्या संदर्भात त्या तक्रारदार ही आणि ज्यांच्या झोपड्या तोडायच्या आहे ते ही. त्यांच्या डोक्यावर टांगती तलवार आहे केव्हा आपली झोपडी तुटेल. आणि समोरच्यांना ही अपेक्षा आहे की हे तोडत का नाही आहे. एक डिसीजन तुम्ही घेऊन टाका. माझ्या माहितीनुसार जेव्हा १९९५ ला मी सभापती होतो स्थायी समितीच्या त्यावेळी आसोदा रोड झोपडपट्टी तोडण्या संदर्भात मी त्या ठिकाणी गेलो होतो. रोड करण्याच्या संदर्भात रोड काँक्रीट करायचं होतं. त्या ठिकाणी त्यांनी आम्हाला जी.आर. दाखवला होता की १९९५ च्या पुर्वीच्या ज्या झोपड्या आहे. ते निष्कासीत करता येत नाही असा स्पष्ट

जी.आर. आहे. त्यानंतर १० वर्षाचा संरक्षण त्यांना परत भेटलं २००५ पर्यंत. जर तसा असेल तर आपल्या कडुन त्या ठिकाणी का तोडण्यासाठी पथक जातो. म्हणजेच का जातो याचा खुलासा तुम्ही करायला पाहिजे. दोघंही ठिकाणी ते कांचन नगरच्या ७-८ झोपड्या आहे आणि आसोदा रोडच्या ७०-८० झोपड्या आहेत. परंतु एकच तोडायचं यांनी हा कुठला न्याय आहे. जर नियमात नसेल तर त्याचा ही नियोजन तुम्ही या ठिकाणी करावं साहेब. हा एक विषय आहे. दुसरा विषय रथ चौकातला आहे. रथ आपण ज्या ठिकाणी लावतो त्या रथाच्या घराच्या बाजुला आपल्या कर्मचाऱ्याच्या भावानी ३ मजली बिल्डींग बांधुन टाकलेली आहे. माझा वार्ड आहे तो. आणि जेव्हा त्यानी सुरुवात केली बांधकामाची तर मी त्याला बोललो की वार्डातील तक्रारी येत आहे. तु बांधकाम करु नकोस. त्यानी काही ऐकलं नाही साहेब.आणि त्याने ३ मजली बिल्डींग त्या ठिकाणी बांधुन टाकली. आता मी तुम्हाला विचारलं तर तुम्ही मला सांगितलं की नोटीस दिलेली आहे. बोलवा शेख साहेबांना नोटीस दिलेली आहे का ? कळायला पाहिजे हा एक विषय आणि तिसरा एक विषय गणपती नगरचा साहेब. त्या ठिकाणी आपले कर्मचारी गेले होते. दोन वाद त्या ठिकाणी आहे. एक त्यांचं म्हणणं आहे की खरेदीखत मी तातडीने करुन **घेतलेले** आहे. आणि दुसरा विषय आहे आपली नियमाप्रमाणेची कार्यवाही. त्यांनी ते तोडायला पाहिजे तर ते का नाही तोडत. त्यांनी काही प्लॅनपण त्या ठिकाणी केलेलं आहे. ठिक आहे ना प्लॅन दिला असेल ना तर ते सोडुन त्यांचं नियमाप्रमाणे जे असेल. ते खुप जुना आहे साहेब १९७६ चा काही तरी आहे. ते तुम्ही तपासा. परंतु आज त्यांनी वरच्या बांधकाम काहीच दिलेलं नाही आहे साहेब. ते तोडायला तुम्हाला काय अडचण आहे. ते आगोदर तोडायला पाहिजे नियमाप्रमाणे असेल तर आणि खालची जर त्यांनी परवानगी दिलेली असेल तर ते राहु द्या. या तिघंच्या तिघं विषयांचे संदर्भात संबंधीतांना सांगुन तुम्ही दोन मिनटात नियोजन करावे अशी माझी विनंती आहे.

श्री.नितीन लढढा :- सभागृहातील सत्ताधारी पक्षाच्या सदस्य वास्तविक बघितलं तर हे सगळे प्रश्न जे आपण उपस्थित केले हे आपण मा.आयुक्तांच्या दालनात जाऊन सुध्दा व्यवस्थीत रित्या चर्चा करुन निर्णय घेऊ शकतात. विरोधकांची ही भुमिका असते की त्यांना प्रशासन व्यक्तीगत विषयांमध्ये तेवढी किम्मत देत नाही. म्हणुन सभागृहामध्ये विषय मांडण्याची अग्रिम भुमिका हे विरोधीपक्षाची असते. सत्ताधारी पक्षाने सभागृहात विरोधक जे बोलत असतील तर विरोधकांना शांत करण्यासाठी संदर्भात काही भुमिका असेल तर त्यांनी ती मांडुन त्यांचा समाधान करुन द्यायला पाहिजे. परंतु सत्ताधारी पक्षाच्या जेष्ठ नगरसेवकांना सभागृहामध्ये अश्या पध्दतीची भुमिका जर मांडण्याची गरज पडत असेल. तर ही लोकशाही मध्ये हे काही योग्य संकेत नाही आहे. आणि योग्य दिसत नाही.

श्री.कैलास सोनवणे :- नितीन भाऊ तुम्ही जे न्याय दिला मला आता ते मला महित नाही आहे का ? साहेबांना विचारा किती वेळा गेलो त्यांच्याकडे, यांना विचारा, शेख ईस्माईल साहेबांना विचारा कितीदा त्यांचेकडे गेलेलो आहे फोन लाऊन लाऊन विचारलेले आहे.

श्री.नितीन लढढा :- ही जर वस्तुस्थिती आहे. आणि एक जेष्ठ नगरसेवक जर **न्याय** मागत असेल आणि त्याला न्याय मिळत नसेल तर आमच्या सारख्यांनी आणि सामान्य जनतेने काय **करावे** हा सुध्दा एक प्रश्न त्या दृष्टीकोणाने आपोआपच निर्माण होतो.

श्री.कैलास सोनवणे :- किती वेळा आलो साहेब.

मा.आयुक्त :- उपस्थित सर्व सन्मा.सदस्य, **अनधिकृत बांधकाम** आणि अतिक्रमण हे आपल्या **सर्वांचा** जवळचा विषय आहे. बऱ्याच तक्रारी मध्ये लोकशाहीला जर आपण विचार केला तर ८०% तक्रारी याच स्वरुपाच्या आहे. या मध्ये दोन खाजगी लोकांमध्ये वाद हा **प्रामुख्याने** विशेष समोर येतो. महानगरपालिकेच्या दृष्टीने सर्व जे अनधिकृत व अतिक्रमणे व बांधकामे जे नियमाप्रमाणे नाही. ते निष्कासीत करण्याचे सुरु होणार त्याच्या बद्दल तुम्हाला **दुमत असण्याचे** काही कारण नाही. पण **विशिष्ट** स्वरुपात **एखादी** जागा खरेदी केली आणि त्याच्यावरचा अनधिकृत बांधकाम काही कार्यवाही **करुन** निष्कासीत केलं. तर रितसर ते करायला पाहिजे. जे प्रॉबलेम असतील त्याप्रमाणे. आम्ही अस समजतो की **एखाद्या** नगरसेवकाने जर तक्रार केली तर ती त्याच्या वार्डाच्या दृष्टीने सार्वजनिक हितास्तव असतं. पण ज्या वेळेला संबंधीत पार्टी**चे** लोकं involve असतात त्यावेळेस संपुर्ण कार्यवाही ही कायद्याच्या चौकटीप्रमाणे करावी लागते. आता दुसरे जे प्रश्न आहे त्या संदर्भात आम्ही पुर्णपणे तपासणी करु. आणि ठरावीक जे आहे दोन झोपड्या चार झोपड्या त्या संदर्भात आपण बऱ्याच वेळा माझ्याकडे आलात. आणि त्याचवे**ळी** मी आपल्याला सांगितले. आम्ही खात्री करु आणि त्याच दिवशी ते लोकं परत आले. हे बघा आपली दखल घेतली जात नाही हा विषय नाही.

श्री.कैलास सोनवणे :- तुम्ही चुकी**चे** बोलत आहे साहेब

मा.आयुक्त :- तुम्ही एका दिवसात २-३ दा सुध्दा आलात.

श्री.कैलास सोनवणे :- एका दिवशी एक वेळा बोला ना मंग.

मा.आयुक्त :- माझ्याकडे ते Calculation नाही.

श्री. कैलास सोनवणे :- तुमचं चुकत आहे साहेब. एकाच दिवशी मी कमीत कमी ५-६ वेळी आलो.

मा.आयुक्त :- आपण या कामासाठी ५-६ वेळा किंवा याच्यापेक्षा ही जास्त वेळा आलात.

श्री.कैलास सोनवणे :- आणि मी तुमच्या माहितीसाठी सांगतो मी **त्याच्यात भागीदार** आहे. तुम्ही खुलासा करा ना.

मा.आयुक्त :- आणि जर Documents वर ओळख आली तर.

श्री.कैलास सोनवणे :- कोणाची

मा.आयुक्त :- जो कोणी मागत असेल त्याची

श्री.कैलास सोनवणे :- मला नोटीस आली तर मी सांगितल की जे नियमात असेल ते करा. चार वर्षापुर्वीची तक्रार दिलेली आहे. महानगरपालिके**ची** मला रितसर नोटीस आली आणि माझं म्हणणं मांडले मी. धामने साहेबांकडे म्हणणं मांडले मी. धामने साहेबांकडेपण मांडलं. त्या समोरच्याला बोलवले त्यानी ही मांडलं. तो सांगत होता बे-परवानगी आहे. मी सांगितले की आगोदरची खरेदी केलेली आहे माझ्याकडे ते कागदे नाही आहे रितसर नियमाने कार्यवाही करावी. आता मी कस काय कळवु ते. सांगा बरं.

मा.आयुक्त :- **ती** तुमची जबाबदारी आहे.

श्री.कैलास सोनवणे :- आमच्या ताब्यात नाही आहे ते. आम्ही कस करणार. आता त्या तक्रारदाराने तक्रार केलेली आहे.

मा.आयुक्त :- त्याच्या पत्रा**ला** देऊ आम्ही उत्तर.

श्री.कैलास सोनवणे :- द्या ना मंग उत्तर. पाहु मंग आम्हीपण काय करायचं तर. आणि रथ चौकाच काय करता आहे साहेब. सांगा धामणे साहेब तुम्ही सांगितले की मी नोटीस दिलेली आहे.

श्री. धामणे :- तुम्ही लेखी अर्ज द्या.

श्री.कैलास सोनवणे :- हुशाऱ्या **मला** नका सांगा साहेब. आता मला सांगा जर त्या वार्डात **कोणीही** लेखी अर्ज देत नसेल तर नियमानुसार नसेल तर तुम्ही सोडुन देणार आहे का ते ? तुमच्या निर्दशनास आणुन दिलेले आहे.

श्री. धामणे :- तुम्ही लेखी अर्ज द्या.

श्री.कैलास सोनवणे :- लेखी अर्ज द्या हे तुम्ही आता सांगत आहे. **जर वॉर्डात तुम्ही तिकडे जर कुणी तक्रार जर केली तर ती तुम्ही सोडुन देणार आहेत का तुमच्या निदर्शनास आणुन दिलेले आहे हा विषय आता बोलत आहात तुम्ही** फोनवर तुम्ही फार पुर्वी सांगितलं.

श्री. धामणे :- आपली प्रोसेस अशी आहे की लेखी अर्ज दिल्यानंतरच आपण कार्यवाही **करतो**.

श्री.कैलास सोनवणे :- काल मी तुम्हाला विचारले तर तुम्ही सांगितलं की नोटीस दिलेली आहे.

श्री. धामणे :- त्यांनी बांधकाम नकाशा आणला होता.

श्री.कैलास सोनवणे :- जर त्यांनी आणला नसेल तर त्याच्यानंतर तुम्ही काय कार्यवाही केली.

श्री. धामणे :-- **आपली कार्यपध्दती अशी आहे की लेखी अर्ज आल्यावर कार्यवाही करु.**

श्री.कैलास सोनवणे :- **ती** काय **त्यांची** जागा नाही आहे. महानगरपालिकाच्या मालकीची जागा आहे. पहिल्यापासुन सांगितले की नगरपालिकेची जागा आहे **ती.**

श्री.चंद्रशेखर पाटील :- **महापौरताई गेल्या २०१२ पासुन** आणि गेल्या दोन वर्षापासुन २०१८ आणि २०१९ या मध्ये आपले कुठलेही **प्रकारचे फळ** मिळालेल नाही आहे. परंतु मागच्या ऑक्टोबर मध्ये **महापौर ताई तसेच सन्मा .सदस्य यांनी एक पत्र दिलेले होते त्यामध्ये २५ कोटी रूपयांचे जे अनुदान होते ते सर्व नगरसेवकांच्या कामामध्ये समान कामे करावी पण आता पावसाळा सुरू होत आहे पाऊस जर आला तर लोकांच्या घरात खोटे नगर मध्ये दुषित प्रकारचे पाणी येत आहे** तर लोकांच्या घरात १५ दिवसापासुन दुषीत पाणी येत आहे. या संदर्भात संबंधीत इंजिनिअरला सांगितलं वार्ड आफिसरला सांगितलं. कोणीही लक्ष द्यायला तयार नाही. जर कदाचित उद्या उठुन लोकांना काही **आरोग्याचा** प्रश्न झाला तर नगरसेवक म्हणुन आम्ही सर्वे जबाबदार धरले जाऊ. माझी सन्मा.सभागृहाला आणि सदस्यांना विनंती आहे तात्काळ पाणी पाऊसाळयाच्या निमित्ताने रस्त्यावर मुरुम टाकणे किंवा व्यवस्थीत पाणीपुरवठा करणेची उपाययोजना करा. उन्हाळयात पाणी साठणार नाही आणि नागरीकांची गैरसोई होणार नाही.

श्री.नवनाथ दारकुंडे :- व्हालचा पंखा गेलेला आहे. **सुधारायला** टाकलं तर खडके साहेबांनी १५ दिवस सहीला पाठविलं. रात्रभर पाणी वाया घालवायचं का आता ही पाणी वाया जाणे चालु आहे. हे काय प्रकार आहे. पाणी सप्लाय कालचा चालु आहे अजुन व्हाल बसलेला नाही १५ दिवस झाले. पाणी वाया **जाते** रात्रभर आणि इकडे लोकांना पाणी भेटत नाही.

इंजिनिअरला सांगितलं तर इंजिनिअर खडके साहेबांच नांव **सांगतात**. कालचा विषय आहे रात्रीच अजुनही पाणी चालु आहे. हमालवाडा, शिवाजीनगरचा भाग, याच उत्तर द्या. खडकेसाहेब उत्तर द्या सादा खर्च तुमच्याकडुन होत नाही.

श्री.डी.एस.खडके :- व्हाल रिपेअरींगचा काही विषय नाही. Annual Maintenance चा कॉन्ट्रक्ट दिलेला आहे. व्हालमनचा रिपोर्ट आला की लगेच माझ्या सहीने वर्क ऑर्डर निघेल.

श्री.नवनाथ दारकुंडे :- परवा झाली तुमची सही. पंधरा दिवस झाले तो व्हाल खराब आहे. महापौर साहेब पाणी अजुनही वाया जात आहे.

सौ.सरीता नेरकर :- महापौर साहेब पाईप लाईन फुटलेली आहे. बरेच लोकं आजारी पडलेले आहे.

श्री.डि.एस.खडके:- एकच वेळा झाला असा २२ तारखेला. २१ तारखेला टाकी धुतली गेली होती. ती टाकी **वॉश** आऊट केली.

सौ.सरीता नेरकर :- जेव्हा गिरणा टाकी मध्ये पाणी **सोडल** तुम्ही. ते आता ही नागरीकांनी फोटोस माझ्याकडे पाठविलेले आहे.

श्री.डि.एस.खडके :- गिरणा टाकी मध्ये पाणी सोडायचं होतं. सकाळी ५ वाजता आल्यानंतर मला माहिती कळली की एम.आय.डी.सी. मध्ये पाईप लाईन फुटली होती. गिरणा टाकीत पाणी सोडायचे होते. तेथुन आल्यानंतर गिरणा टाकीचा पाणी वॅश आऊट केलं.

सौ.सरीता नेरकर :- सर लोकं आजारी पडले आणि लोकांनी माझ्याकडे फोटो आणुन दिले. आणि गेंदालाल मिल व शिवाजी नगरकडे पाणी सोडला जातो एक नंबर वार्ड ला. आता ते लोकं खोटं बोलत आहे का ?

श्री.डि.एस.खडके :- **गिरणा टाकी मध्ये पाणी वाढल होते एम आय डी सी मध्ये जी पाईपलाईन फुटली होती त्यांनंतरही वॉश आऊट केले होते गिरणा टाकी मध्ये जेव्हा पाणी आले तेव्हा मला सकाळी ६ वाजता फोन आला होता की पाण्यामध्ये लेंडी नाल्याच्या बाजुला फुटली होती त्यामुळे पाण्यामध्ये थोडयाफार प्रमाणात घाण आली असेल.**

श्री.नवनाथ दारकुंडे :- व्हाल रिपेअरींगसाठी कोणाची मान्यता घ्यावी लागते. १५-१५ दिवस वाट **पहायची** का नगरसेवकांनी पाणी गळतीची. विशेष खर्च ठेवलेला आहे तुम्ही तर इंजिनिअर लोकं काय करता आहे तिथे ?

श्री.कैलास सोनवणे :- हे जे आपण प्रश्न करतो ना. हे जर मी बोलीन तर वाईट वाटेल त्यांना. पण हे प्रश्न फोन करुन त्यांना ही विचारु शकता. इतके दिवस असतात आपण ऑफिसला जाऊन विचारु शकता. कशाला वेळ वाया **घालवायचा**

श्री.नवनाथ दारकुंडे :- फोन करुन ही कामे होत नाही आहे **आप्पा** .

श्री.कैलास सोनवणे :- आजची मिटींग , काय मिटींग चालु आहे का ही ?

सौ.उज्वला बेंडाळे :- महापौर ताई गळत्यांचे **प्रॉब्लेम** सोडविले जात नाही . तेथे कर्मचारी कमी आहे आणि गळत्यांचे **प्रॉब्लेम** जास्त होत आहे. त्याच्यामुळे पाण्याचा फोर्स काय कमी होत आहे का. वारंवार फोन करुन सुध्दा Complaint **ची** दखल कोणी घेत नाही

श्री.डि.एस.खडके :- **आपण ज्यावेळेस तक्रारी केलेल्या आहेत त्या वेळेस तेथे मी आलेलो आहे दैनंदिन तक्रारी असेल तर मागे तुमच्या वॉर्डाच्या संदर्भात आलो होतो.**

सौ.उज्वला बेंडाळे :- किती दिवस चालणार आहे असे.

श्री.डि.एस.खडके :- **व्हॉल्व गळती होती त्यावेळी व्हॉल्व बदलवुन दिलेला होता.**

सौ.उज्वला बेंडाळे :- तर दर वेळेला आम्ही तेच करायचे का ? आम्ही ते पार्ट चेंज करायचे का? **सकाळी** २.३० वाजेपासुन सकाळी पहिला सप्लाय सुरु होतो. तेच काम पाणी येत नाही. पाणी येत नाही हेच काम.

श्री.डि.एस.खडके :- **वेगवेगळे मुददे असेल ते प्राब्लेम सॉल्व करण्यात आले होते.**

सौ.उज्वला बेंडाळे :- आयुक्त साहेब, हे जे उमाळयाचा जलशुध्दीकरण **केंद्र** आहे तेथे बिबट्या फिरतो **असे** ऐकले होते वृत्तपत्रात ही वाचले होते. मा.आमदार साहेबांची जेव्हा बैठक झाली होती तेव्हा १०० कोटी मधुन १ कोटी तेथे खर्च करण्यात यावा अस म्हटलं होतं. पण जेव्हा मा.ना.श्री.गिरीषभाऊ महाजन यांनी सांगितले की, शहरासाठी करा. मी माझ्या खात्याकडुन पैसे द्यायला तयार आहे. तर आपण लेटर वगैरे काही **दिलेले** आहे का तस, मागणी केलेली आहे का ?

श्री.डि.एस.खडके :- **नाही या संदर्भात काही केलेले नाही कारण की तेथील जागा जी आहे ती आपल्याला सदर जागा वनविभागाने करारनाम्याने दिलेली आहे . त्या अनुषगांने काही केलेले नाही**

सौ.उज्वला बेंडाळे :- कधी करणार आहे मग. तिथले कर्मचारी धोक्यातच **आहेत** आणि **एखादा** कर्मचारी लाजीरवाणीपणे मेला तेव्हा करणार आहे. मला समाधानकारक उत्तर मिळालेले नाही अजुन? काय करणार आहे कसे करणार आहे ?

श्री.डि.एस.खडके :- वाघुर धरणाला कंपाऊंड बांधण्याची तजवीज करु.

सौ.उज्वला बेंडाळे :- मग लवकरात लवकर करा. दुसरा विषय आहे गिरणा पंपीगचा गिरणा पंपींगवर आपले किती कर्मचारी आहे कामाला. तेथे एकही माणसे **कामाचे** नाही. **मला उत्तर मिळालेले नाही .की काय करणार आहे काय नाही**.

श्री.एस.पी. भोळे :- त्या संदर्भात ठराव झालेला आहे की **काही कर्मचारी तेथे ठेवावे** आणि त्यानी देखभाल करावी. **कारण तेथे आपली मशिनरी पडलेली आहे ती मशीनरी आपली सांभाळली जाईल त्यानुसार तेथे ५ कर्मचारी आहेत**

सौ.उज्वला बेंडाळे :- तेथे तुम्हाला माहिती आहे का की कर्मचाऱ्यांना मारहाण होत आहे आणि कर्मचाऱ्यांना मारहाण होईपर्यंत शांत बसणार का आपण. **त्यांचे जिवाचे** काही **झाले** तर जिम्मेदार कोण असेल. ते काही वरदळची जागा नाही एकांतचा विषय आहे तो. त्या कर्मचाऱ्यांची जबाबदारी कोणाची असेल. **त्यांच्या जिवाचे काही बरेवाईट झाले तर काय करायचे** सांगा ना उत्तर तर द्या हो **की** नाही.

श्री.एस.पी. भोळे :- कर्मचारी ठेवावे लागतील तिथे. **तेथे तीन शिफ्ट मध्ये काम केले जाते एकूण ५ कर्मचारी आहेत तसेच १ स्पेअर मध्ये ठेवावा लागतो**

सौ.उज्वला बेंडाळे :- **कर्मचाऱ्यांची** काय गरज आहे तिथे.

श्री.एस.पी. भोळे :- ऑपरेटर तर ठेवावा लागतो त्याठिकाणी आणि तीन शिफ्ट मध्ये **डयुट्या** असतात.

सौ.उज्वला बेंडाळे :- तर **एखाद्या** संस्थेला द्या मला वाटतं मागे पंचवार्षिकला आम्ही निवडुन आले **होता** तेव्हा पासुन हे चालु आहे. एकतर तेथील भंगार **मध्ये** विक्री काढा **आत्ता तो विषय झाला** तो पण तसाच चालु आहे ना.म्हणजे कर्मचाऱ्यांचा जिव धोक्यातच आहे ना. **कर्मचाऱ्यांचा विमा वगैरे काही नाही .**

श्री.एस.पी. भोळे :- आम्ही तसा प्रस्ताव ठेवला होता मशिनरी **पण तो आहे त्या परिस्थितीमध्ये ठेवण्याबददल महासभेत ठराव झालेला आहे**

श्री.डी.एस.खडके :- **ती मशिनरी त्या ठिकाणी ठेवण्याचा ठराव झालेला आहे पाणी पुरवठयाच्या अनुषगांने तो ठेवण्यात आलेला आहे तरी पाणी पुरवठा च्या धारेणात्मक निर्णयाकरीता प्रस्ताव ठेवण्यात आलेला आहे.**

सौ.सरीता नेरकर :- गिरणा टाकीला वॅश आऊट करतात का ? जागा आहे का तिथे ?

श्री.डी.एस.खडके :- गिरणा टाकीला वॅश आऊट सोडलेला आहे. पाणी घेतल होत त्या दिवशी गिरणा टाकीचा पाणी बाहेर वॅश आऊट केला.

सौ.सरीता नेरकर :- ते घाण पाणी तुम्ही ईकडे सोडले होते .

श्री.डी.एस.खडके :- गिरणा टाकीला वॅश आऊट सोडलेला आहे**.** वॉश आऊटचे पाणी कुठेही पुरविण्यात आलेले नाही.

श्री.भगत बालाणी :- महापौर साहेब, आज आपली जी मिटींग सुरु झाली. तर आता मी अशी एक सुचना मांडत आहे ती सर्वांना मान्य असेल. जो तो सदस्याने त्याच्या वार्डाचे प्रभागाचे प्रश्न मांडायलाच पाहिजे. पण **असे वाटत आहे की** २.०० वाजेपर्यंत आपली मिटींग संपुन जाईन. परंतु आता सभेला सुरुवातपण नाही झाली. माझी अशी विनंती आहे की, सर्वांची संमती असेल तर २-४ वाजेपर्यंत लन्चला सुटी द्या. कारण की काही **डायबेटीज** पेशन्ट आहे माझी चिंता नाही. मी ९.३० ला जेवन करुन आलेलो आहे. त्यानंतर मग ८.०० वाजो ९.०० वाजो की १०.०० वाजो. माझी अशी सुचना आहे. सर्वांना जर मान्य असेल तर परत ४.०० ला आपण सुरुवात करु.

श्री.कैलास सोनवणे :- महापौर साहेब, भगतभाऊंच्या मताशी मी सहमत आहे.आम्हीपण **डायबेटीज** पेशन्ट आहे. सकाळपासुन त्रास होत आहे. फायदा होत आहे की नुकसान होत आहे तेच समजत नाही.

सौ.**पार्वताताई** भिल :- महापौर साहेब मी खडके साहेबांना इतकंच विचारु इच्छिते की, माझ्या वार्ड क्र.११ मध्ये पाईप फुटलेले आहे व्हाल खराब आहे, तेथे किती लोकं काम करता असं मला संबंधीतांनी उत्तर द्यावे.

श्री.इब्राहिम पटेल :- सर्व सभागृहाकडुन मी बोलत आहे. टिका करायच्या असले तर कोणीही करतो. मी करतो दुसरे नगरसेवक झाले ते करतात. परंतु रात्री बे रात्री मोठी पाईप लाईन फुटते. २४-२४ व ४८-४८ तास अधिकारी वर्ग असो कर्मचारी वर्ग असो तिथे उभे राहुन काम करतात. ते ही त्यांना श्रेय द्यायला पाहिजे. आणि त्यांची पाठ थोपाटली पाहिजे. मी स्वत: तुमच्या सोबत होतो. आपण चाचणी घेतली मेहरुण मध्ये कस्तुरीच्या मागेच्या बाजुला आणि जे कामे केलेले आहे त्याचे श्रेय ही त्यांना मिळायला पाहिजे आपण ही **त्यांना** सहकार्य केला पाहिजे. आणि त्यांनी जे **काम** केलेले आहे रात्री बे रात्री त्याचे ही कौतुक करायला पाहिजे. बस एवढे बोलायचे होते.

**नगरसचिव :- प्रश्न क्रं.१) श्री.नितीन बालमुकूंद लढ्ढा**

| प्रश्न | उत्तर |
|---|---|
| जळगांव शहर महानगरपालिकेत बांधकाम परवानगी कंप्लीशन प्रमाणपत्र, टी.डी.आर. | नगररचना विभागात दि.०१/०४/२०१९ ते ३१/०५/२०१९ या कालावधीत प्राप्त प्रस्तावांची माहिती खालील प्रमाणे सादर करण्यात येत आहे. |

<table>
<tr>
<td>भुमि अभिन्यास संबंधात प्रलंबीत प्रकरणांची (नावनिशीवार) माहिती मिळावी. तसेच प्रलंबीत असण्याची कारणे काय ? प्रकरण दाखल झालेचा दिनांक व प्रकरणात त्रुटी असलेस संबंधीतांना तसे लेखी कळविले असल्यास लेखी कळविल्याचा दिनांक या बाबत माहिती मिळावी.</td>
<td>
<table>
<tr><th>तपशील</th><th>प्राप्त</th><th>मंजुरी दिली</th><th>नामंजुर</th><th>प्रलंबीत प्रकरणे</th></tr>
<tr><td>बांधकाम परवानगी</td><td>१२१</td><td>२८</td><td>२१</td><td>५१</td></tr>
<tr><td>कंम्प्लिशन</td><td>९५</td><td>२२</td><td>११</td><td>६२</td></tr>
<tr><td>टी.डी.आर.</td><td>११</td><td>००</td><td>००</td><td>११</td></tr>
<tr><td>अभिन्यास</td><td>०७</td><td>००</td><td>००</td><td>०७</td></tr>
</table>
</td>
</tr>
</table>

श्री.नितीन लढढा :- कलम ४४ चा जो माझा प्रश्न होता की दि.०१/०४/२०१९ ते दि.३१/०५/२०१९ या कालावधी मध्ये नगररचना विभागामध्ये किती प्रकरण प्राप्त झाले त्याच्या संदर्भातील यादी नावानीशी मागितलेली होती. याचा मला उत्तर मिळालं की, दि.१८/०५/२०१९ च्या पत्रान्वये विचारलेल्या प्रश्नात संबंधीत कालावधी दिलेला नाही. त्यामुळे दि.०१/०४/२०१९ ते दि.३१/०५/२०१९ पावेतोची माहिती खालील प्रमाणे सादर करण्यात येत आहे.सदर पत्रामध्ये माहिती नावानीशी मागितलेली आहे परंतु नगररचना विभागाकडे अपुर्ण कर्मचारी नसल्यामुळे माहिती सादर करता येत नाही. इतका कमी कर्मचारी वर्ग आहे की, माहिती नावानीशी देणेस विभाग असमर्थता दाखवत आहे. जर खरी अशी परिस्थिती असेल, की अपुर्ण कर्मचारी असतील. तर एक **उदाहरण** असा सांगतो. एक अभियंता मा.सभापती यांच्या **दालनात** स्वियसहाय्यक म्हणुन कार्यरत आहे. मी महापौर राहिलेलो आहे हे उपमहापौर राहिलेले आहे. बरीच मंडळी महापौर ही झालेली **आहेत.** उपमहापौर ही झालेली **आहेत** परंतु तांत्रिक पदाचा अधिकारी कधीही स्वियसहाय्यक म्हणुन आम्ही घेतलेला नव्हता. आणि घेण्याची अशी आवश्यकता ही नाही. कारण स्थायी समिती सभापती असो, महापौर असो यांना ज्या विषयांचे संदर्भात ज्या वेळेला अडचण वाटेल, त्यावेळेला केव्हाही तांत्रिक माणसाला व तांत्रिक अधिकारीला बोलऊ शकतात. आणि त्यांच्याकडुन त्यांना जी काही माहिती अपेक्षित असेल घेऊ शकतात. एकीकडे कर्मचारी नसल्याच्या संदर्भात अपुर्ण कर्मचारी वर्ग असल्या कारणाने माहिती मिळत नाही. आणि एकीकडे तांत्रिक अधिकारी स्वियसहाय्यक म्हणुन एक सभापतींच्या दालनामध्ये कार्यरत असतात.ही बाब कशाचा संकेत आहे. आणि याच्या **मागची** प्रोव्हीजन काय ? वास्तवीक या जागेवर Clerical दर्ज्याचा व्यक्ती आसावा. जेणे करुन काही पत्र व्यवहार करायचा आहे. आलेल्या प्रश्नांचे उत्तर **द्यायची** असेल तर या दृष्टीकोणानुसार तेथे नियुक्ती करावी. परंतु या पदस्थापनेच्या संदर्भात प्रशासनाने कोणती भुमिका स्विकारलेली आहे त्याचे सुध्दा उत्तर तुमच्याकडुन मला अपेक्षित आहे. दुसरा यात जी माहिती आहे. दोन महिन्यांचा **कालावधीची** आहे. बांधकाम परवानग्या नगररचना विभागामध्ये १२१ प्राप्त आहे. १२१ प्रकरण प्राप्त झाल्यानंतर २८ प्रकरणांना मंजुरी करण्यात आली. २१ प्रकरण नामंजुर करण्यात आली. ५१ प्रकरण प्रलंबित आहे. म्हणजे दाखल झाल्यापासुन दोन महिन्याच्या कालावधी मध्ये जवळपास ५०% प्रलंबित प्रकरणे हे **कसे** कृत्य आहे. **त्या**प्रमाणे भोगवटाप्रमाणपत्र ९५ प्राप्त झाले, २२ ला मंजुरी दिली. ११ नामंजुर केले. ६२ प्रकरणे प्रलंबित आहे. हे जवळपास ५०% च्या वरचा **रेषो** आहे. सगळयात **महत्वाचे डिपी.आर.चे** जवळपास ११ प्रकरणे प्राप्त झाले. मंजुर किती शुन्य, नामंजुर शुन्य, प्रलंबित प्रकरणे ११, जमीन मागणीची प्रकरण ७ प्राप्त झाली. एकालाही मंजुरी दिली नाही. एकही नामंजुर नाही. ७ ही प्रकरण प्रलंबित आहे. मा.आयुक्त साहेब काही वेळानंतर भुसंपादनाच्या संदभात विषय येईल. आणि त्या विषयाचे अवलोकन आपण या ठिकाणी केलेले असावं. साधारणतं भुसंपादनाची रक्कम मागणी करण्याच्या संदर्भातले जवळपास ६७ प्रकरण या महासभेने मान्य करुन मा.जिल्हाधिकारी महोदयांकडे भुसंपादनासाठी पाठविलेले आहे. आणि त्या प्रकरणांमध्ये साधारणता ३३६ कोटी रुपये त्यांना अदा करावे लागतील अशी एकंदरीत परिस्थिती आहे. आज ३३६ कोटी रुपये सोडुन ३ कोटी ३६ लक्ष रुपये भरण्याची आपली तयारी नाही आहे किंवा आपली व्यवस्थाही नाही आहे. अश्या परिस्थितीमध्ये जर टी.डी.आर.चे प्रकरण दाखल होत असतील आणि त्या टि.डी.आर.च्या प्रकरणांना तात्काळ ठेवण्याच्या मागचा हेतु काय ? मी यापुर्वी अनेक वेळा या महासभेमध्ये बोललेलो आहे. प्रशासनातर्फे तुम्ही या जमिन मालकांना **आवाहन तरी करावे** की आपण जमिनीच्या **मो**बदल्यामध्ये टि.डी.आर. घेण्यास इच्छुक असाल तर २४ तासाच्या आत तुम**चे** प्रकरण मार्गी लावव**े** जाईल. रेड कारपेट टाकुन त्यां**चे** टि.डी.आर. **चे** सर्टीफीकेट त्यांच्या हातात द्यायला पाहिजे. का तर महानगरपालिकेला अश्या पध्दतीने टि.डी.आर.मध्ये सुध्दा वर्षानुवर्ष फिरविल्या गेल्यानंतर जमिनमालक १२७ च्या नोटीसकडे वळतो. १२७ ची नोटीस म.न.पा.ला देतो. १२७ ची नोटीस भुसंपादनासाठी जाते. आर्थिक परिस्थिती महानगरपालिकेची योग्य नसल्याकारणाने आपण ती रक्कम अदा करु शकत नाही. दोन वर्षाचा कालावाधी **गेल्यानंतर** जमिनमालक उच्च न्यायालयात जातो. रिटपीटीशन फाईल करतो. **आणि** उच्च **न्यायालयात गेल्यानंतर** ते आरक्षण **रदद** करतो. म्हणजे मला

सांगा जेथे बिना मोबदला जमिन महानगरपालिकेला मालकीहक्काने मिळत असेल. महानगरपालिकेच्या खिश्यातला एक रुपया ही जात नसेल. अश्या परिस्थितीमध्ये प्रकरण प्रलंबित ठेवण्याच्या मागची Ideology काय ? अत्यंत गंभिर बाब आहे आणि अश्या पध्दतीने हे आरक्षणे व्यपगत झाली असल्याने या शहराचा मागे २० वर्षापुर्वी जे नियोजन विकास आराखडा तयार करण्यात आला असेल. ते संपुर्णत: **उदयास** होतो. आणि ज्याला आपण एक सुनियोजीत शहर म्हणुन त्याच्याकडे बघत असतो. आणि हे सुनियोजीत शहर विकसीत करणेची संधी तुमच्या आणि आमच्या हातातुन चालली गेलेली असते. अत्यंत गंभिर बाब आहे हे मी आताच चर्चा करत आहे **असे** नाही हे मी महापौर असतांना सुध्दा या सदंर्भातली भुमिका सभागृहाला स्पष्ट केलेली आहे. यांसदर्भातील मागीतलेली यादी पुनश्च मला नावानिशि मिळावी अशी मी या सभागृहास पुन्हा विनंती आहे. याच्या मागचे नेमके धोरण काय ? **विशिष्ट** लोकांचे प्रकरण **निघतात** सामान्य लोकांचे प्रकरण निघत नाही. नेम**के** पाणी बुड**ते** कुठे आहे माती शिरते कुठे आहे. या संदर्भात संपुर्ण सखोल चौकशी व्हायला पाहिजे. नेम**के** आम्ही जे तुमच्या कामाबद्दल ऐकलेला आहे की तुमच्याकडे फाईल प्रलंबित राहत नाही. परंतु प्रकरणे अटकता कुठे ? कुठल्या कारणासाठी त्यांना थांबवि**ले जाते.** कुठल्या गोष्टीची अपेक्षा ठेवली जाते या सर्व गोष्टींचा खुलासा होणे अपेक्षित आहे.

श्री. जितेंद्र मराठे :- सन्मा. सभागृह आणि मा.महापौर आमचे जेष्ठनेते आणि अभ्यासु व्यक्तीमत्व यांनी **जो** प्रश्न मांडला की सभापतींकडे इंजिनिअर स्वियसहाय्यक म्हणुन काम करत आहे. तर त्यांच्या माहितीसाठी सांगुन देतो की, यांचा कोर्ट मॅटर चालु आहे. यांना विभागीय आयुक्तांकडुन आदेश आहे की ते इंजिनिअरींग पदाच्या व्यतिरिक्त दुसरे कामे करु शकतात. त्याच्या अनुषंगाने डांगे साहेबांशी चर्चा करुन आम्ही **तो** निर्णय घेतला. त्यांना विभागीय आयुक्तांकडुन नोटीस ही मिळालेली आहे. या प्रमाणे हे सर्व काम केलेले आहे.

मा.आयुक्त :- नगरसेवकांनी आणि माजी महापौरांनी **जो** प्रश्न विचारला. बांधकाम परवानगी आणि टी.डी.आर. प्रकरण आणि भोगवटाप्रमाणपत्र यामध्ये काही प्रमाणात प्रलंबित प्रकरणे होतील. सद्या **सरसकट** विचार केला. As on today तर ११ ते ११ टी.डी.आर.प्रकरण निकाली काढण्यात आलेले आहे.

श्री.नितीन लढढा :- ही माहिती मला आज दिली.

मा.आयुक्त :- विषय काय होता टी.डी.आर.च्या संदर्भात मी पुणे महानगरपालिकेला उपायुक्त दक्षता म्हणुन काम केलेले आहे. त्या ठिकाणी काही केसेस असे झालेल्या होत्या. तत्कालीन आयुक्त मुंबई महानगरपालिका यांनी Clear Process यासाठी दिलेली होती. तर ती संपुर्ण प्रक्रिया माझ्या खाली गेल्यावर मला या System मध्ये काही त्रुट्या आल्या. पुन्हा मग अस झाल की, पुण्यातला आणि इथल वेगळा **शेडयुल** आहे. पुण्यात काय आहे तुम्ही कितीही आणि काहीही अटी टाकल्या तर ते Complete करतात. येथे अशी परिस्थिती नाही. येथे Minimum आहे. आपण कुठलेही प्रकरण जाहिर प्रसिध्दी देतो. तर ती प्रथा सुरुवात केली. आमच्या एवढे एवढे प्रकरण आहे. या संदर्भात जर कोणाला काही सांगायचे असेल किंवा म्हणणे असेल तर त्यांनी १० दिवसाच्या आत सांगाव आता सुदेवाने या १२ प्रकरणांमधुन ११ प्रकरणात मुदत संपल्यानंतर कोणाचीही हरकत आली नाही. पण एक प्रकरण आलेल आहे. त्याची आम्ही त्याप्रमाणे कार्यवाही करत आहोत.म्हणजेच ही प्रथा अत्यंत पारदर्शक आहे.बऱ्याच गोष्टी प्रसिध्द केल्याने लोकांना माहिति मिळु शकते. टी.डी.आर.चे प्रकरण आता काही प्रलंबित राहणार नाही. आणि आपण जस म्हणत आहात तर टी.डी.आर.च आपल्याला प्रोत्साहन देईल. आणि काही दिवसानंतर आपण गाईडलाईन करुन प्रत्यक्ष त्यांच स्वागत करुन प्रत्यक्ष त्यांच्या हातात टी.डी.आर. सर्टीफीकेट द्यायचे. भोगवटा प्रमाणपत्राच्या संदर्भात बांधणीचा एक इशु. त्याच संदर्भात सुध्दा आपण Joint Director of Town Planning, Nashik यांना केलेले होते आणि त्यांच रिट पेटीशनचा प्रश्न होता. पुर्वीच्या By Laws प्रमाणे काही ठरावीक बाधा येत होती. त्यामुळे यात सुध्दा आम्ही सकारात्मक निर्णय घेतलेला आहे. २० सप्टेंबर २०१६ पुर्वी ज्या बांधकामांना परवानग्या दिलेल्या आहे.त्यावेळेच्या नियमाप्रमाणे असतील तर ते आम्ही Accept करतो आहे. त्याच बरोबर त्या तारखेच्या नंतरच्या कुठल्याही प्रकरणामध्ये आम्ही हे करणार नाही आणि तसी नोटीस सुध्दा प्रेस मध्ये आम्ही देतो आहे. तर ते प्रकरण आता निकाली काढायला काही अडचण नाही. अभिन्यासामध्ये सुध्दा काही विषय होते. तर त्याच्यामध्ये आपले डी.सी. रुल्स मध्ये संबंधीत विकासकांनी डांबरी रस्ते, सी.एल.ओ. वगैरे वगैरे. हे करणे न्यायीक आहे आपल्या महापालिकेमध्ये आपण फक्त मुरुमचे किंवा खडीचे रस्ते करुन घेतो. जळगांव शहरात कुठलाही विषय आला तर तो आर्थिक बाबीशी येतो. उद्या आर्थिक बाबी फार चांगली आहे तर खडीचे रस्ते करुन आपण डांबरी रस्ते करु शकतो. पण आज जे ५०० कोटीचा बोझा आहे. काही वर्षाने ते बोझा ही आपल्या अंगावर येतो. ते Clear त्या संदर्भा त सुध्दा Clarity आलेली आहे. त्याचाही Notification आम्ही देतो. ज्या तारखेपासुन हे आहे तर त्या तारखेपासुनचे जे काही ले आऊट आहे. त्यासाठी Compulsion आपल्याला करावा लागेल. अशी सर्व वस्तुस्थिती आहे. हया पदाच्या बाबतीत

आपण हे करुन घेऊ. माझ्या माहिती प्रमाणे ज्या ठिकाणी पब्लीक संबंध येणार नाही त्या ठिकाणी असे कार्यकारी लोकांना देऊ नये. आणि एक तांत्रिक माणुस ज्या ठिकाणी खऱ्या अर्थाने त्याचा उपयोग करता येईल त्या ठिकाणी नियुक्त करु.

**नगरसचिव :- प्रश्न क्रं.२) श्री.नितीन मनोहर बरडे**

| | |
|---|---|
| १)जळगांव शहरवासियांना नियमितपणे पा.पु.केला जात आहे, काय ? अखंडीत पाणी पुरवठयाची कारणे काय ? | १) अपवादात्मक परीस्थिती वगळता शहरात तिन दिवसा आड नियमित पाणी पुरवठा करण्यात येत आहे. मुख्य जलवाहिनीची दुरुस्ती, व्हॉलची दुरुस्ती अथवा व्हॉल ना दुरुस्त होणे, विदयुत पुरवठा खंडीत होणे इ.तांत्रिक कारणास्तव शहरातील पाणी पुरवठा विस्कळीत होत असतो. |
| १) तिन दिवसाआड पाणी पुरवठा केल्याने पाण्याची किती बचत झाली ? | २) तिन दिवसाआड पाणी पुरवठा केल्यामुळे दैनदिन पाणी उचलमध्ये पाणी बचत झालेली नाही. तथापी वाघुर धरणातील पाण्याची पातळी कमी होणे, वाघुर रॉ वॉटर पंपीग येथील पंपाची पाणी उचल क्षमता कमी झाल्याने नागरिकांना पुरेसा दाबाने पाणी पुरवठा करणे कामी तिन दिवसा आड पाणी पुरवठा करण्यात येत आहे. |
| २) सुजल योजने अंतर्गत शहरात वाघुर पाईपलाईनवर विविध ठिकाणी व पाण्याच्या टाक्यांवर मीटर बसविले आहेत त्याबाबत व्यवस्थित रेकॉर्डीग आहे का ? व पाणी मीटर पासुन काय फायदा किंवा तोटा झाला ? | ३) सुजल निर्मल अभियान अंतर्गत वाघुर रॉ वॉटर पंपींग व उमाळा जलशुध्दीकरण कैंद्र रेमंड बुस्टर येथील वॉटर मिटरची रिडींग घेण्यात येत आहे. वॉटर मिटर बसविले मुळे प्रत्येक टाकीवर येणारे पाणी व जाणारे पाणी यांचे मोजमाप करता येते. अमृत पाणी पुरवठा योजना कार्यान्वीत झाल्यानंतर याचा पुर्णपणे उपयोग घेता येईल. वॉटर मिटर मध्ये काही साहित्य अडकल्यास पाणीचा दाब कमी प्रमाणात होतो. |
| ३) वाघुर धरणात पाणी साठा किती आहे ? शहरास सदयस्थितीत केल्या जात असलेल्या तिन दिवसा आड पाणी वितरणाची पध्दत सुरु ठेवल्यास पाणी किती दिवस पुरेल ? | ४) आज रोजी वाघुर धरणात ३३ द.ल.घ.मी. जिवंत पाणी साठा शिल्लक आहे. वाघुर धरणावर पिण्यासाठी आरक्षित असलेल्या शहराचा विचार करता दर महिन्याला ४ दलघमी पाणी आवश्यक आहे. याचा विचार करता जळगांव शहरास सदयस्थितीत तिन दिवसा आड पाणी पुरवठा करण्यात येतो. त्याप्रमाणेच भविष्यात पाणी पुरवठा केल्यास ऑक्टोबर अखेर पावेतो महानगरपालिकेस धरणातील पाणी उचल करता येईल. |

श्री.नितीन बरडे :- मा.महापौर ताई आपण लोकपत्रात आवाहन दिलेले आहे पाणी बचतीचा मला पहिल्या प्रश्नाचे उत्तर मिळालेले आहे.अपवाद वगळता शहरात तीन दिवसाआड पाणी पुरवठा नियमीत सुरू आहे. मला आठ दिवसापुर्वी जी आढावा बैठक झाली होती. आणि प्रश्न उत्तराचे तासात सन्मा.सदस्य जे बोलतात आहे. मला नाही वाटते की प्रत्येक प्रभागात नियमीत पाणी पुरवठा होत आहे. माझ्या प्रभागात रामदास कॉलनी, गुरुकुल कॉलनी, राका पार्क, सिध्देश्वर नगर, इंद्रप्रस्थ नगर, नंदनवन कॉलनी, या भागात होणारा पाणी पुरवठा जो होता ते काही भागामध्ये शेवटच्या भागात शेवटच्या लोकांना पाणी जात नाही. एक तास पाउण तास झाला की आमच्याकडे पाणी बंद करायला सांगतात. आमच्याच प्रभागात का असे, कुठे दोन तास सुरु आहे कुठे चार तास चालु आहे. कुठे आठ तास चालु आहे तर कुठे चौवीस तास चालु आहे. कमी दाबाचा भाग आहे चढउतारचा भाग आहे. कमी दाबाने पाणी येते. तो का होत आहे त्याचेही मी तुम्हाला विश्लेषन देईल. दुसरा प्रश्न आहे तीन दिवसाआड पाणी पुरवठा केल्याने पाण्याची बचत किती झाली. महापौरताई कालच आपण पाणी बचतीचे आवाहन केलेले आहे. आपण तीन दिवस बचत केली तर पाणी बचत किती झाली. बोलवा संबंधीत अधिकाऱ्याला किती पाणी उचलता आहे, किती शहराला देता आहे, किती बचत झाली. त्यांनी सरळ लिहीलेले आहे की पाणी बचत होत नाही. आपल्या जळगांव शहराला ८५ ते ९० एम.एल.टी. पाणी दररोज लागते. पुर्ण शहराला आज आपण तिन दिवसात पाणी देत आहे. सरासरी तुम्ही जे नविन पंप बसविलेले आहे.यांच्या म्हणण्यानुसार Discharge कमी होतो. Discharge कश्यामुळे कमी होतो ते ही मी सांगेल. जुन्या पंपाचा Discharge १० लाख लिटर होता. दोन नवीन पंप आहे त्यांचा Discharge आहे. साडे तेरा लाख लिटर तासाला. जवळ जवळ २४ तास पाणी चालु आहे. तीन दिवसाच्या आड देत होते तेव्हाही २४ तास चालु आहे. खोट असेल तर सांगाव त्यांनी. धरणात पाणी कमी झाला Discharge कमी झाल. आजची पाण्याची लेव्हल असेल २२५.५ म्हणजेच आपल्या पाईपाच्या ७-८ मिटर वरती पाणी आहे. ४ वर्षापुर्वी या पेक्षाही परिस्थिती बिकट असतांना २२२ लेव्हल असतांना आम्ही २ दिवसाच्या आड पाणी देत होतो. सुजल निर्माण अभियान अंतर्गत आपण रॉ वॉटरला पुर्ण शहरात ५ कोटी ५० लाख रुपयांचे मिटर बसविलेले आहे.आज जे मोजणी करत आहे मिटर प्रमाणे मोजणी होत नाही . मिटर मध्ये काही साहित्य अटकल्यास पाण्याचा दाब कमी होतो. त्याचा ही खुलासा संबंधीत अधिकाऱ्यांनी करावा. वाघुरचा जो जलसाठा आहे ते आपल्या सर्वांसमोर आहे. ते आपल्याला

काटकसरीने वापरायचा आहे. महापौरताई संबंधीत अधिकाऱ्यांना बोलवा. शेवटी काही घरांना राका पार्क, रामदास कॉलनी वगैरे घरांना पाणी भेटत नाही. आज मी सकाळी ४ वाजेचा फिरत आहे. ३.३० पासुन पाणी सुरु आहे. मी इंद्रप्रथ कॉलनीत होतो ६.३० वाजता आर्ध्या तासासाठी पाणी आलेले आहे. तिथे मी उभा राहिला तेव्हा पाणी आलेले आहे. आठ दिवसापुर्वी संबंधीत अधिकाऱ्यांना संपुर्ण भाग दाखविला होता.त्या इंजिनिअर्सची बदली झाली नविन इंजिनिअर्स त्या ठिकाणी आले. परत परत का तेच करत राहायचे. इंजिनिअर्स म्हणतात आमच्याकडे माणसे नाही. पाणी आले नाही तर इंजिनिअर्स नागरीकांना म्हणतात, आम्ही इस्टीमेट बनवुन देतो नगरसेवकांना सांगा पाईपलाईन टाकायला, आम्ही कशातुन टाकुन द्यायची मनपा फंडातुन तुम्ही पैसे देणार आहे आम्हाला.एक वर्षात अमृतची योजना चालु होईल. मला सांगा का कमी दाबाने पाणी येते.

श्री.नितीन लढढा :- मा.महापौरताई आणि आयुक्त महोदय, बेसीक कस आहे जो पर्यंत तुम्ही त्याच्या मुळाशी जाणार नाही. तो पर्यंत विषयाचे गांर्भिय कळणार नाही. २०१४ ला एनसीसी कंपनी ने सर्व सर्व्हेक्षण केले होते .आणि त्या सर्व्हेक्षणाच्या अंती जळगांव शहरात साधारण २०,००० नळ कनेक्शनस आहे. असा स्पष्ट लेखी अहवाल त्यांनी महानगरपालिकेत सादर केलेला आहे. २०१४ ते २०१९ या पाच वर्षाच्या कालावधीमध्ये संबंधीतांनी काय पाऊली उचलले. जे अनधिकृत कनेक्शन आहे. त्यातुन महानगरपालिका काहीही फायदा नाही. जे नागरीक वर्षातुन २००० रुपये पाणीपट्टी भरता. संतुष्ट पाणी टंचाईचा निर्णय झालेला आहे. भविष्यात गंभिर स्थितीला सामोरे जाणे पेक्षा ३ दिवसा आढ पाणी देण्याची संदभाची भुमिका मान्य झाली. परंतु माझ्याकडे आजचा Calculation माझ्याकडे दि.३१/०५/२०१९ ची जलसाठा प्रकल्पाची आकडेवारी आहे. धरणाची पातळी आहे २२५.९०० मिटर उपरोक्त पाणी साठा त्याच्यामध्ये आहे. १०९.८०९ दशलक्ष म्हणजे साधारणता १ लाख १० हजार पाणी साठा दि.३१/०५/२०१९ रोजी शिल्लक होता. महानगरपालिकेला लागणारा पाणीपुरवठा जे आपण रोज उचलता तो सुध्दा Calculation केला तर ३६५ दिवसासाठी २९००० दशलक्ष लिटर हे आपल्याला वर्षाला लागतो. साठा किती आहे १,१०,००० एम.एल.टी.चा म्हणजे या Calculation जर आपण गेलो ३ वर्ष जलसाठा पुरेल या आकडेवारी प्रमाणे परंतु यामध्ये पाणी कमी जास्त होत असतं. ५० टक्के पाणी बाषीभवन होऊन गेले. तरी ही हे जलसाठी ३ वर्ष २ दिवसानंतर दिला तर नंतर सुध्दा दररोज ९० दशलक्ष पाणी सोडतोय संपुर्ण जळगांव शहराला ॲटेटाईम सप्लाय करायचा असले तर ८२ lml पाण्याची उपलब्धता आहे परंतु आपण १०० MLT घेवुन शहराला पाणी पुरवठा करतोय परंतु संपुर्ण शहराला जेवढा पाणी पुरवठा करायचा आहे त्याच्या पेक्षा पाणी उचलायचे १०० टक्के पैकी फक्त ३३ टक्के भागाला पाणी पुरवठा करत आहेत ही वस्तुस्थिती नाकारून चालणार नाही जर धरणामधील परिस्थिती कमी झाली असती आणि आपण हा निर्णय घेतला असता की ३ दिवसाआड केला असता परिस्थिती त्याच्या पेक्षा भयावह झाली असती त्याच्या अनुषगांने जर आपण ६ दिवसाआड चा निर्णय घेतला असता तर परंतु तशी परिस्थिती नाही म्हणजे आपण काय करतोय की ३६५ दिवसांचे पैसे नागरीकांकडुन घेत आहे आणि फक्त ९५ दिवस पाणी देतोय आमचे सर्व सन्मा.सदस्य आम्ही ज्यावेळेला सत्तेत होतो त्यावेळेला जे विरोधक होते ते सातत्याने आमच्यावर आरोप करायचे की तुम्ही ३६५ दिवसांचे पैसे घेतात आणि २ दिवसाआड पाणी देतात तुम्ही पाणीपटटी माफ का करत नाहीत किंवा ती कमी करत नाहीत मला तो प्रश्न उपस्थित करायचा नाहीये . एखादा जनसाधारण मुददा आहे आणि आपण या शहराचे प्रतिनिधीत्व करत आहोत हा क्राईम आहे जी जबाबदारी आपली आहे ज्याच्यासाठी उपलब्धता आपल्याकडे आहे या ४५ डिग्रीच्या तापमानामध्ये लोकांचे हाल करतोय तो क्राईम आहे . याला निसर्ग जबाबदार नाही ही मानविय रचलेले आहे या संपुर्ण गोष्टींकडे कधीही गांर्भीयाने बघीतले गेले पाहीजे याला . खडके साहेब दोषी नाही, आयुक्त साहेब दोषीनाहीत किंवा सभागृह दोषी आहे असे मी म्हणत नाही . परंतू या शहराला प्राधान्य आणि प्राधान्यकरण ठरवणे हा आमचा तुमचा Joint part आहे. हा सत्ताबदल झाला. सत्ताबदल झाल्यानंतर कुठलाही सरकार बदलतं, कुठल्याही संस्थामध्ये पदाधिकारी बदलता. प्राधान्याने त्याच संदर्भात आढावा बैठकी होतात. आणि आढावा बैठकीत हेच बघीतल जात की, मागच्या बॉडीने कोण कोणत्या चुका केलेल्या आहे. ते कश्या प्रकारे दुरुस्त करता येतील. किंवा या शहराच्या दृष्टीकोणातुन योग्य निर्णय कसा प्रकारे घेता येईल. आपण वृत्तपत्रकातुन वाचतो की बैठकांचा जोश खुप मोठा आहे. दिवसेंदिवस किती बैठकी आपण पाहतो, पण या बैठकींचा निष्पण काय होतो ? हि वस्तुस्थिती आहे की पाण्याचा डिस्चार्ज किती असेल तो एका दिवसांत कमी होत नाही आपल्याकडे सिस्टीम लागलेली आहे आपल्याकडे उपसा होतोय घरी आपण माठामध्ये नळाचे पाणी त्यामध्ये आपण तांबे टाकतो किंवा वाळी टाकतो त्यावेळेला आपण नळ चालु करतो आणि टाकी भरा हे कॉमन सेंस आहे जेव्हा डिस्चार्ज पुर्ण होत आहे, एका दिवसांत परिस्थिती बदलत नाहीये की काल ५० एमएलटी घेतला आणि आज ३० एमएलटी झाले असे होत नाही फक्त एकीकडे ज्या कडे गांर्भीयाने पाहायला पाहीजे होते त्या गांर्भीयाने पाहीले गेले नाही, दुर्लक्षित झालेले आहे. आपण जेव्हा म्हणतो की तहान लागली त्यावेळेला विहीर खोदायची अशी परिस्थिती झालेली आहे. मोटारींच्या मेंटेनंस च्या बाबतीत साधारण ५०० हॉर्स पॉवरच्या मोटारी ज्या ६ मोटारी आहेत त्यामध्ये ४ कार्यान्वीत असतात दोन मोटारी हया स्टँड बाय असतात ज्यावेळी एखादी मोटर उत्कृष्ट

कंपनीची आहे किर्लोस्कर कंपनीची आहे परंतु ज्यावेळेला ते मेंन्टेनंन्स निघत त्यावेळेला एखादी मोटार कारागीर २ किंवा ५ हॉर्स पॉवर चेकाम करणारा कारागीर त्या मोटारीचे काम करतो म्हणजे मशिनरी घ्यायची आणि ती कमी दर्जाच्या कारागीराकडुन कामाला लावायची हे कायमचे आहे आता गैर कंपनीचे असतात स्थानिक कारागीराला एवढे नॉलेज नसते त्याच्या ते तंत्रज्ञान / किंवा ईक्वीपमेंट नसते कि तो त्या पध्दतीने काम करू शकेल ही परिस्थिती आहे की स्थानिक गॅरेजवर आपली मशिनरी दुरूस्ती करतात हे वास्तविक बघता ही गंभीर बाब आहे. अशा ५०० हॉर्स पॉवरच्या मोटरी चें वार्षिक मेंटेनंन्स चे कॉन्ट्रक्ट हे संबंधित कंपनीशीच करायला पाहीजे कारण त्यांचेकडे तंत्रज्ञान आहे तुमचे वार्षिक मेंटेंनंन्स जास्तही होवु शकते परंतू त्यापेक्षा ईनडायरेक्ट म्हणजे ज्यापध्दतीने मागच्या आठ दहा दिवसापुर्वी पाणी पुरणेसाठी ३ दिवसाआड पाणी पुरवठा व्हावा हा त्यामागचा हेतू होता की जळगांव शहरातील संपुर्ण परिसरात ओरड होती कारण भौगोलिक दृष्टया उंच भाग आहे आणि त्याभागातील सगळयात जास्त ओरड होती त्यादृष्टीकोनातुन पाणी मिळावे हा मुख्यत: हेतू होता की शहरातील नियोजन २ दिवसाआड करणेपेक्षा ३ दिवसाआड करायचे आणि म्हणजे आपल्याला स्वतंत्ररित्या पाणी पुरवठा करता येईल परंतु मागच्या वर्षापर्यंत सुध्दा सुनिलभाऊंच्या काही तक्रारी नव्हत्या किंवा संपुर्ण शहराच्या बाबतीत ही काही तक्रारी नव्हत्या आपण MIDC ला घाईगर्दीने २५ लाख रू भरण्याचा निर्णय घेतला माझ्या मते हे तुमचे २५ लाख रूपये वाया गेलेले आहेत आज सुप्रिम कॉलनीची तक्रार काही प्रमाणात कमी झालेली आहे २५ लाख रूपये आपण घाई घाईने भरून टाकले आहेत परंतू तेथे पाईपलाईन जी आहे ती स्वत: ची नाही त्यावर सुध्दा आपण दुसऱ्यावर अवलंबुन आहे त्यासाठी सुध्दा मी व्यक्तीगत पाठपुरावा केला परंतू २५ लाख रूपये भरल्यानंतरही -----

श्री.कैलास सोनवणे :- बोला बोला तुम्ही एकदम मस्त बोलत आहात . आपण १० मिनीटांचा ब्रेक घेऊया.

श्री.नितीन लढढा :- ३-४ वाजेपावेतो नागरीक झोपु देत नाहीत त्यांना एक महिला नगरसेविकेला सामोरे जावे लागत आहे.

श्री. कैलास सोनवणे :- मी सुध्दा १० ते १५ वर्षापासुन नगरसेवक आहे मला ही सगळी परिस्थिती माहिती आहे आता या १० महिन्यात काय घडले असे .

श्री.नितीन लढढा :- अप्पा त्यांना १० वर्षात ५०० /५०० नागरीकांना सामोरे जावे लागले नाही , स्टँड फील्टरची परिस्थिती बघीतली का साहेब आपण ५-५ फुट उंच गवत उगलेले आहेत त्याचे फोटोग्राफ सुध्दा माझ्याकडे आहेत दिवसातुन कमीत कमी ३ ते ४ वेळा फील्टर वॉश आऊट करणे गरजेचे आहे जे पाणी आपण त्याला मायक्रो फील्टर म्हणतो किंवा ते पाणी त्या फील्टर मधुन जात असते जे जे काही मागणी आलेली असेल ती सगळी त्या सुधारणा करून या शहराला पाणी द्यावे परंतु आपण त्या फील्टरची परिस्थिती बघाल तेव्हा तुम्हाला माहिती होईल की वॉश आऊट करण्याच्या संदर्भात काय अडचणी आहेत फील्टर वेळेवर कार्यान्वीत होत नाही अशी गंभीर परिस्थिती आहे .काय घडलेले आहे की या सगळया गोष्टींना कुठेतरी मायनर चुका घडतात कुठे चुका होत आहेत हे पाहण्याची गरज नाही शेवटी परंतु कमीत कमी जे जबाबदार अधिकारी आहेत त्यांनी यावेळी ज्या ज्या वेळी प्रशासन म्हण किंवा ईतर अधिकारी म्हण महापालिकेचे यांच्या निदर्शनास आणणे गरजेचे आहे , आणि जर का त्यांच्या निदर्शनास आणण्याकरीता त्यावर काही उपाययोजना निश्चितपणे आपण सर्व सदस्य या परिस्थितीला जबाबदार आहोत परंतू असे होता कामा नये की सगळयात ज्वलंत प्रश्न हा पाण्याचा असतो दिवसाची सुरूवात झाली की हया पाण्याचा असतो घरातल्या महिला असो की पुरूष मंडळीचा असो यावेळेला आपण शहरातील ५ लाख लोकसंख्येचे प्रतिनिधीत्व करीत आहोत येथील कुठलेही पाणी पुरवठयाशी संबंधीत गंभीर प्रश्न असतील १०० कोटी च्या अनुदानामध्ये कुठल्या कामाला मंजूरी दिली की जर ओपन स्पेस ला चेंजींग फेस केले ही हया शहराची क्वालीटी होवु शकत नाही यावेळेला सन्मा .महापौर ताई की ज्यावेळेला आपल्या जळगांवच्या ज्याकाही प्राथमिक गरजा आहेत त्या १०० टक्के पुर्णत्वास गेलेल्या आहेत आणि ज्याच्या नंतर तुमच्याकडे जी सद्यस्थिती आहे त्यावेळेला तुम्ही अश्या प्रकारच्या प्रायोरिटीला हात घालु शकता याच्या संदर्भातील ज्या काही अडचणी असतील त्या आर्थिक बाबींशी निगडीत आहेत त्यांचे उत्तम उदाहरण ते देत गेले आहेत की अश्या पध्दतीच्या मागण्या आम्हीच दिलेल्या आहेत परंतू निधीमुळे ते काम होवु शकले नाही. परंतू आपण ज्यावेळेला १०० कोटी रूपयांच्या निधीमुळे या शहराचा विकास होतो त्यावेळेला त्याचा प्राथमिक कायदा असायला पाहीजे या गांभीर्याने नगरसेवक म्हणतो माझ्या घराकडचा रस्ता झाला मी समाधानी आहे मात्र पेमेंट करायची जबाबदारी ही प्रशासनाची आहे त्याला ती करावीच लागेल परंतू त्याची प्रायोरिटी काय आहे ती सुध्दा समजून घेणे गरजेचे आहे की हे निर्णय तुम्ही दोन दिवस अगोदर घ्याल की नाही घ्याल तो तुमचा प्रश्न आहे २५ लक्ष भरून सुध्दा त्याचा उपयोग या पावसाळयापर्यंत परंतु आता ४ एक दिवसात पावसाळा सुरू होईल पाण्याची तिव्रता कमी होवुन जाईल, मागणी कमी होवुन जाईल परंतु एखादे धोरणाचे नियोजन न करता घाईगर्दीने राबवायचे यागावाच्या दृष्टीकोनातून आपण जे काही निर्णय घेतो आहेत पाण्याची पर्यायी व्यवस्था करीत आहोत परंतू ज्यावेळी आपल्याला खरच व्यवस्थेची गरज असेल तर त्यावेळेस पर्यायी व्यवस्था केली तर आपण समजू शकतो की ती पर्यायी व्यवस्था पुर्णत्वास आली परंतू मनपाची आर्थिक स्थिती नसतांना २५ लाख रू ची उधळण करणे हेही काही संयुक्तीक वाटत नाही हा अत्यंत गंभीर विषय आहे मा. आयुक्त महोदय , मा.महापौर ताई आपणांस विनंती आहे नागरीकांच्या या ३

दिवसाआड पाणी पुरवठयासंबंधी जो काही धोरणात्मक निर्णय होत असेल आणि या सगळया गोष्टी थांबविण्या योग्य आहेत पाईपलाईन व व्हॉल्वच्या रिप्लेसमेंट चे कामे होत नाहीत किती प्रकारचे व्हॉल्व नादुरूस्त आहेत ते बदलविणे गरजेचे आहेत का काही चेंबरमध्ये जावुन परिस्थिती बघा १०/१० फुट उंचीचे झाडे उगलेले आहेत परंतू जबाबदारी आहे ती कुणीही समजुन चालत नाहीत. याबददल फक्त महापौर ताई किंवा आयुक्तांना जाणे शक्य नाही परंतु यासाठी अभियंत्याला जाणे शक्य होणार नाही यासाठी एक सिक्वेंस लावलेली आहे की एखादा मदतनीस किंवा इंजिनियर असेल किंवा व्हॉल्वमन असेल त्यांनी वेळोवेळी रिपोर्ट करणे गरजेचे आहे आज पाणीपुरवठा ईतक्या बेभरोसे चाललेले आहे की नगरसेवक जातो १५ मिनीटे व्हॉल्व उघड तर उघडला जातो , यासगळया गोष्टीमध्ये सिस्टीम लावायची व्यवस्था आहे ती पुर्णत खुल्या प्रकारची आहे याविषयी माझी एक विनंती आहे आयुक्त साहेब की या विषयावर गांभीर्य ओळखुन वेळप्रसंगी आपल्याला आज आपण दोन दिवस केले आहेत पाण्याची ईफीशियंन्सी वाढलेली आहे पाण्याचा डिस्चार्ज वाढलेला आहे यासंबंधी जो काही प्रस्ताव आलेला आहे भविष्यात असे प्रस्ताव आलेल्या आपण खुप मायक्रो पध्दतीने जी कोणी रिकामी मंडळी असतील ती खुप कमी काम करीत असतील त्यांच ज्ञानही आणि अनुभवही खुप चांगला आहे त्यांना विश्वासात घ्या त्यांना या विषयावर जॉईन्टली कुठेतरी या निर्णयावर या की बघा पाईप लाईन फुटते शेवटी काय होते रोष काय माथी मारला जातो की पाईपलाईन निकृष्ट दर्जाची आहे सिमेंटची पाईपलाईन असल्यामुळे ती वारंवार फुटते हा ईन्लॉजीकल मुददा आहे साहेब पाईपलाईन जर निकृष्ट दर्जाची असती तर पर्टीक्युलरी एका भागात मेहरूणच्याच भागात फुटली असती असे नाही टोटल २५ की.मी चे पाईपलाईन आहे ही २५ किमी ची पाईपलाईन सिमेंटचीच आहे ती कुठेही फुटली असती जर ती निकृष्ट दर्जाची असती परंतु ऑपरेटींग सिस्टीम जी आहे त्या सिटिम मध्ये अनुभव असलेले बरेचशे अभियंते बरेचशे कर्मचारी हे सेवानिवृत्त झालेले आहेत माणसांची उपलब्धता पुरशी नाही म्हणून यामुळे काय होते मानवीय चुकांमुळे या पाईलाईनी फुटतात त्यांचे मॉनिटरींग सुरू करणे गरजेचे आहे ते वेळेवर सुरू होत नाही वरचा व्हॉल्व सुरू केलेला आहे खालचा व्हॉल्व हा कमी प्रमाणात सुरू केलेला आहे त्यामुळे पाईप मध्ये प्रेशर क्रीयेंट होते मग ती फुटते आणि मग आपण जळगांव शहराला २ दिवसांनी पाणी पुरवठा बंद आहे असे सांगतो १ दिवसांचा किंवा दोन दिवसांचा बंद आहे असे मग आपण त्यांना सांगीतले की त्याचे समाधान होते परंतू त्यांच्या घरामध्ये काय परिस्थिती होते यांचे गांभीर्य तुम्हा , मला किंवा कदाचित तुम्हाला माहिती नाही कारण माणसांच्या उपलब्ध वेळेनुसार होत असते काही अत्यंत गंभीर बाब आहेत आपण संपुर्णत: लक्ष घालुन सुक्ष्म निर्देश करा ज्या ज्या काही बदलण्याची आवश्यकता असेल आपण तातडीने पुढच्या महासभेमध्ये त्याला मान्यता घ्या . १०० कोटी मध्ये साधारणत: १० कोटी रूपयांचे विषय जे ओपन स्पेस ला आपण चंजिंग फेसिंग करण अशा परिस्थितीमध्ये संभव नाही ज्यावेळी आपल्याला पुढील निधी मिळेल त्यावेळेला अश्या विषयांवर खर्च करावा परंतू या अनुषगांने पाणी पुरवठयाच्या बाबतीत ज्या गंभीर गरजा असतील त्या तातडीने महासभेपुढे ठेवा हि सभागृहाला विनंती आहे .

श्री नितीन बरडे :- किती प्रमाणात पाणी पुरवठा होतो या भागात

श्री.डी.एस.खडके :- पाण्याचा दाब कमी असल्याप्रमाणे समता नगर सुटलेले आहे आणि काही भागांमध्ये आणि जो चढावावरती भाग आहे आणि पुर्ण शहरामध्ये कमी प्रमाणात पाणी पुरवठा जरी झाला तरी आपण त्या भागात पुरवठा पुर्ण करण्याचे प्रयत्न करतो.

श्री नितीन बरडे :- मी तुम्हाला सांगतो फ्लॅट सिस्टिम झाले किंवा ईतर यांचे टप्पे वाढवा आता एक टप्पा केला आहे तरी पाण्याची आपली जी एक टाकी आहे त्या टाकीचे व्हॉल्व तुम्ही आठच उघडतात १७ किंवा १८ तर उघडत नाहीत मग पाणी कसे काय पोहोचेल .

श्री.डी.एस.खडके :- पुर्वी १४ होते १४ चे आता १८ केले आहे जास्त प्रमाणात उघडले की टाकी लवकर रिकामी होते .

श्री नितीन बरडे :- तुमच्या उत्तरात दिले ले आहे की मिटर मध्ये पाणी अडकते मा.महापौर ताई मी सर्वांच्या माहितीकरीता सांगतो टाक्यांना मिटर बसविलेले आहे खाली त्या मिटर मध्ये काहीच नाही विचारून घ्या .जे मिटर बसविण्यात आले आहेत ते एक प्रकारे रेडयुसरचे काम करीत आहेत त्या मिटरप्रमाणे रेकॉर्डींग होत नाही. यांनी येथे स्पष्ट करावे की मिटर प्रमाणे पाण्याची रेकॉर्डींग होते असे मिटर काढुन टाकलेले आहेत. जेथे ५०० चे पाहीजे तेथे ३०० चे बसविले आहेत कुठेतरी मक्तेदाराला ॲडजेस्ट केलेले आहे. त्यामुळे टाकीतुन निघणारे पाणी कमी प्रमाणात निघते महापौर ताई व अश्विनभाऊ तुमच्या भागातीलच सांगतो मी गिरणा टाकी मधुन एक मेन लाईन जाते मेन लाईन जाते ती शिव कॉलनी जवळ कुठेतरी क्रॉस होते की नाही त्या मेन लाईनीवरून कनेक्शन दिलेले आहेत कनेक्शनचे पैसे किती घेतले असतील व्हॉल्व मनने १६-१६ हजार रू घेतलेले आहे तुमच्या भागात जी लाईन जाते सर्वांना माहिती आहे आपले इंजिनियर पण सामील आहेत आपले जे मिटर बसविण्यात आलेले होते त्यापैकी रॉ वॉटर ला एक मिटर बसविले होते फील्टरला एक मिटर बसविलेले आहे आवक होते आपली फील्टरला जावक चे मिटर बसविलेले आहे का त्यांना विचारा ?

श्री.डी.एस.खडके :- नाही बसविलेले आहे.

श्री नितीन बरडे :- तिथे रॉ वॉटरला जे मिटर बसविलेले आहे त्याचे डायमिटर कमी झालेला आहे म्हणुन तुमचा डिस्चार्ज येत नव्हता. तिथे मिटरचा डायमिटर कमी आहे. म्हणुन पाण्याचा डिस्चार्ज भेटत नाही ही सर्व टाक्यांवरची परिस्थिती आहे. हे Adjust केलेले आहे मक्तेदाराला. अश्विन भाऊ तुमच्या माहितीसाठी सांगतो की, ए.बी.एम.च्या पुढे मिटर बसविलेला नाही आहे यांनी आपल्या पाण्याची नोंद होत नाही आहे. हे कश्या नोंद घेता मला माहित नाही. किती पाणी जळगांवात आला आणि किती पाणी आपण धरणातुन उचलले. किती पाणी धरणातुन उचलले त्याची नोंद होते. हे मिटर मोजण्यासाठी यांना आठ जणांना प्रशिक्षण दिलेले आहे. आपल्या ऑफिस मधले आठ जणांना प्रशिक्षण दिलेले आहे. फक्त तुम्ही नावे विचारा कोण आहे ते आठ प्रशिक्षण घेणारे, क्लार्क असे आहेत, कागदावर, तेथे मिटर रिडींग करणेसाठी यांनी उत्तरात दिलेले आहे की अमृत योजनेच्या वेळेस मिटरचा उपयोग होईल. आज जळगांव शहरात जे मिटर लावलेले आहे ते एक ही उपयोगाचा नाही आहे. नुसते लावुन टेवलेले आहे. गिरणा टाकीचे जे मिटर आहे ज्या मिटर मधुन आमच्या टाक्या भरल्या जातात IC चा पंप आहे तो Discharge का कमी देतो. गिरणा टाकीच्या सरमला पाणी येतो तो कमी येतो आणि IC चा हा पंप जास्त पाणी फेकतो.तो सरम खाली होऊन जातो म्हणुन हे कमीचा पंप वापरता आहे.

श्री.डी.एस.खडके :- IC चाच पंप आहे तेथे पण मिटरचा पंखा तुटलेला आहे.

श्री नितीन बरडे :- मला खरं सांगा तुम्ही कोणत्याही मिटर मध्ये पंखा शिल्लक आहे का ? सांगुन द्यावा, तुमच्या इंजिनिअरला विचारुन घ्या फोन लावुन, एका ही टाकीच्या मिटरला पंखा शिल्लक आहे का ?

श्री.डी.एस.खडके :- बऱ्याचश्या टाक्यांना शिल्लक नाही आहे.

श्री.नितीन बरडे :- बऱ्याश्यांना नाही सर्वांनाच नाही आहे ना.

श्री.कैलास सोनवणे :- तुम्ही ते मुद्दाम केलेले आहे का ?

श्री.नितीन बरडे :- त्याचा कारण काय अप्पा, Adjust केलेले आहे ते ठेकेदाराला डायमिटर कमी घेतलेला आहे. हे प्रकल्प आता बसविलेला आहे प्रकल्प वाल्यांनी.

श्री.कैलास सोनवणे :- हे केव्हा घेतलेला आहे.

श्री.नितीन बरडे :- हे माझ्या मते २०१४-१५ साली घेतलेला आहे.

श्री.डि.एस.खडके :- सन २०१२-१३ चा असेल.

श्री.कैलास सोनवणे :- मला सांगा तुम्ही हे प्रॉब्लम २०१४-१५ पासुन आहे. आणि तुम्हीच पाहत होते पाणी पुरवठा, मग आता काय अस झाल काय विषय आहे?

श्री.नितीन बरडे :- हे अशा करीता झाले तो जो पंप आहे तो मोठा येणार होता. गळती वाढली, सप्लाय वाढले आणि त्यांनी सप्लाय तेच ठेवला,आणि ते वाघुर मधला मिटर आहे ना ते काही आठ ते दहा महिन्यापुर्वी लावलेला आहे.

श्री.योगेश बोरोले :- नितीन भाऊ पहिल्यापासुनच लावलेला आहे तो.

श्री.नितीन बरडे :- कधी लावलेले आहे.

श्री.योगेश बोरोले :- २०१४ मध्ये लावलेले आहे.

श्री.नितीन बरडे :- मग डायमिटर का नाही मिळाला पंपाचा. डायमिटर कमी नाही आहे का?

श्री.योगेश बोरोले :- डायमिटर आणि पंपाचा काहीच संबंध नाही.

श्री.नितीन बरडे :- साहेब हे डायमिटर चेक करा. हे कमी डायमिटरचे मिटर आहे. तीन ठिकाणी कम्प्युटर सेंसर पाहिजे.

श्री.कैलास सोनवणे :- आयुक्त साहेब याच्यामध्ये काही गैरसमज आहे का ते सांगा खरोखर जर तुमचे काही चुकत असेल तर नितीनभाऊ तुमची मागणी काय आहे तुमचे म्हणणे काय आहे की कोणी काही भ्रष्टाचार केलेला आहे .

श्री.नितीन बरडे :- हे मिटर कामाचे नाहीत याच्यामुळे प्रेशरचा परिणाम येतोय सगळीकडे हया मिटर मुळे हे आटे कमी करत आहेत यांनी दोन किंवा तीन आटे वाढवावे सगळीकडे पाणी जाईल टाक्या रिकाम्या होतात परंतू आटे वाढविले जात नाहीत.

श्री.डी.एस.खडके :- उन्हाळयामध्ये आपली जी सिस्टिम आहे त्या सिस्टिम प्रमाणे उमाळयाच्या त्याप्रमाणे १६ आटे आहेत ते १८ केलेले आहेत आपल्याला कमी करावे लागतात त्यावेळेस आपण पाणी पुरवठा करू शकतो .

श्री.नितील बरडे :- थंडी असो की पावसाळा असो किंवा उन्हाळा असो वर्षानुवर्षे १८ आटे चालत आलेले आहेत गिरणा टाकीचे २ आटे वाढविल्यानंतर लक्ष्मी नगरचा प्रॉब्लेम होता तो थोडयाप्रमाणात मिटला होता नंतर उज्वला ताईंनी पाणी जोडले होते .

श्री.डी.एस.खडके :- काही जनांनी डिमांड केलेली आहे डिमांड प्रमाणे आपण कूठलीही सिस्टिम बदलविण्यात आलेली नाही त्या अनुषगांने आपण ज्या ठिकाणी गरज होती त्या ठिकाणी आपण आटे वाढविलेले आहेत जर जास्त वाढविले तर टाकी रिकामी होते मग टाकी रिकामी झाल्यावर आपण म्हणतो की लेव्हल ० वर आहे .

श्री.नितीन बरडे :- तुम्ही पाणी ३ दिवसांनंतर देत आहेत तर तसे रोटेशन लावा , तुम्हाला हे मान्य आहे का काही भागात २४ तास पाणी जाते काही भागात ८ तास जाते काही भागात ४ तास जाते .

श्री.डी.एस.खडके :- हो काही भागात अशी परिस्थिती आहे.

श्री.नितीन बरडे :- आमच्या भागात १ तास का एक तास सव्वा तास झाले की तुम्ही बंद करतात .

श्री.डी.एस.खडके :- काही भागांमध्ये ७-८ तास आहे .

श्री.ईब्राहीम पटेल :- साहेब ज्या ठिकाणी जास्त पाणी जात असेल त्या भागामध्ये पाणीपटटी ची रक्कम जास्त प्रमाणात आकारणी करावी . किंवा त्यांचेवर कारवाई करा खडकेसाहेब तुम्ही पाणी टंचाई निर्माण करू नका आपण जळगांव शहराला दोन दिवसाआड पाणी पुरवठा करत होतो आता करू शकत नव्हते का.

श्री.डी.एस.खडके :- नाही.

श्री.ईब्राहीम पटेल :- आपण ऑक्टोंबर पर्यत पुरवठा करू शकत होतो.

श्री.कैलास सोनवणे :- त्याचे कारण तुम्ही प्रक्टीकली दया कारण तुम्ही त्या ठिकाणी काम केलेले आहे.

श्री.नितीन लढढा :- पाणी पुरवठयाबाबत त्यांची सर्व माहिती महानगरपालिका प्रशासनाकडे दस्ताऐवजांमध्ये उपलब्ध आहे यावर कार्यवाही होईल का एक, अनंत Condition हे मुख्य लाईनिंग योजना आहे आणि एखाद्या परिसराला १ तास देतात आणि काही भागात जास्त आहे हे सुध्दा प्रत्येक व्हॉल्वमनला व प्रत्येक प्लंबर ला प्रत्येक कनिष्ठ अभियंत्याला सगळयांना हे नॉलेज आहे हे सगळे माहिती असुन सुध्दा प्रशासन कारवाई करीत नाही की ज्याच्यामुळे तुमचा होणार पाणी पुरवठा अव्याहात पणी होणारा हा उर्वरित भागांवर परिणाम करणारा असतो आणि मग तुम्ही रोगाच्या मुळावर जाणार नाहीत आणि वरचेवर उपचार करीत असालतर रोग कायम राहील योग्य उपचार होणार नाही.

मा.आयुक्त :- कारवाई करू शकु रिजन एक आहे अभियंत्याचे खास

श्री.नितीन बरडे :- आमचा भाग उतरता आहे म्हणजे महाबळ कॉलनी एकतर्फा पाणी दिले तर टाक्या रिकाम्या होतात आमच्या.

मा.आयुक्त :- १ तास पाणी आपण देतो त्याचे पुर्ण रोटेशन पाहावे लागेल , आपण अश्या रितीने पाठपुरावा करावा लागेल अश्या वेळेला आपण रोटेशन प्रमाणे पाणी पुरवठा केला पाहीजे मेन लाईनवर जे कनेक्शनस आहेत आणि जे ईलिगल आहेत त्यांचेवरही कारवाई होईल.

श्री.नितीन बरडे :- यांच्या अधिकाऱ्यांकडे माणसे नाहीत यांचे खाते नगररचना विभागाशी जोडुन दया आणि जे पाणी पुरवठयात कामे करतील अश्यांना नगररचना विभागात घ्या तुम्हाला तुमचे पैसे खर्च करण्याची गरज पडणार नाही मजुर , व्हॉलमन पण मिळुन जातील तेथुन स्वनिधी निर्माण होईल .

**नगरसचिव विषय क्र.१)** दि.२१/०२/२०१९ रोजी झालेल्या महासभेचे तसेच दिनांक ०५/०३/२०१९ विशेष महासभा (अंदाजपत्रक सभा) व दिनांक ०५/०३/२०१९ रोजी झालेल्या विशेष महासभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १४८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, **दि.२१/०२/२०१९ रोजी झालेल्या महासभा विषय क्र.०४ ठराव क्र.८१ मध्ये गुंठेवारी अधिनियम २००१ अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिकेकडे विहीत नमुन्याप्रमाणे प्रस्ताव सादर करताना म.न.पा.त जे नोंदणीकृत आर्किटेक्ट, इंजिनिअर असतील त्यांचेकडून हे काम नियमानुसार करुन घेण्यात यावे अशी इतिवृत्तामध्ये दुरुस्ती करुन सदरच्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करणेस तसेच दिनांक ०५/०३/२०१९ विशेष महासभा (अंदाजपत्रक सभा) बैठकीच्या कार्यवृत्तास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

**तसेच दिनांक ०५/०३/२०१९ रोजी** झालेल्या विशेष महासभा विषय क्र.२६ ठराव क्र.१४१ या ठरावात सुचक म्हणुन श्री.राजेंद्र झिपरु पाटील यांचे नावा ऐवजी सुचक म्हणुन रेखा चुडामण पाटील यांचे नावाची नोंद घेणेबाबत दुरुस्ती करुन सदर बैठकीचे कार्यवृत्त कायम करणेंस मान्यता प्रदान करणेंत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

| | | | |
|---|---|---|---|
| **अनुकूल मते** | :- | ६७ | **प्रतिकुल मते :- ००** |
| **सूचक** | :- | **ललित विजयराव कोल्हे** | |
| **अनुमोदक** | :- | **राजेंद्र झिपरु पाटील** | |

**नगरसचिव विषय क्र.२)** आरोग्य विभागाकडील ई-निविदा क्र.१२३९ घंटागाडीव्दारे शहरातील दैनंदिन घराघरातुन निर्माण होणारा ओला व सुका विलगीकृत कचरा, रस्त्यावरील कचरा संकलन व वाहतुक करणे तसेच दैनंदिन रस्ते, गटार इ.साफ

**सफाई करीता कामगार पुरविणे कामी प्राप्त L१ निविदाधारक मे.वॉटर ग्रेस प्रॉडक्टस नाशिक यांचेशी करारनामा करुन कार्यादेश देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.**

श्री.नितीन लढ्ढा:- या संदर्भातील काल सायंकाळ पावेतोच्या ज्या चर्चा होत्या त्या खुप वेगळया प्रकारच्या होत्या आणि त्या चर्चेतुन कदाचित हा ठेका तहकुब होण्याच्या मार्गावर येवुन ठेपलेला होता. परंतू काय कमाल झाली , पार्टी मिटींग मध्ये निश्चय झालेला होता की या संदर्भात सविस्तर अभ्यास करून विविध पध्दतीने महानगरपालिकेचे आर्थिक हित कश्या पध्दतीने जोपासले जाईल कारण ज्या चर्चा ऐकत होतो की काही विशिष्ट मंडळीलाच त्याचा फायदा होणार होता.

श्री.कैलास सोनवणे :- आयुक्त साहेब मी एक सांगु ईच्छितो माझे याचेवर ऑबजेक्शन आहे तातडीचा मुददा मांडतो आहे आपण आणि तो मुददा मांडण्याचा मला अधिकार आहे.

ॲड . शुचिता हाडा :- त्यांचे ऑबजेक्शन आहे ते तुम्ही मान्य करायचे .

श्री.नितीन लढ्ढा:- एक भारतीय जनता पक्षाचा सदस्य व या सभागृहाचा सदस्य काल सध्यांकाही मला भेटला

श्री.कैलास सोनवणे :- ठराव मान्य झाल्यानंतर त्यांना थांबविण्यात यावे आपला लॉ आहे आणि मला बोलण्याची संधी द्यावी आमच्या पार्टी मिटींग मध्ये काय घडले याच्याशी तुम्हाला काही घेणेदेणे नाही तुम्हाला काय काय मांडायचे आहे ते मांडा मिटींग मध्ये काय ठरल ते मी तुम्हाला याठिकाणी सांगेल, मान्य आहे की तुम्ही काही नगरसेवकांच्या शंका होत्या शंकेचे निरसण करण्यात आले ऐकुण घ्या चर्चा करू आपण महापौर सो यांना बसवुन घ्या, आमच्या नगरसेवकांच्या काही शंका होत्या , शंका अशा प्रकारच्या होत्या की खांमगांव नगरपालिकेमध्ये काही तक्रार आहे ब्लॅकलिस्ट आहे हा एक विषय होता , कार्यदेशावर सही नव्हती आणि खाली सहया नव्हत्या आणि त्या प्रमाणे टेंडर उघडु नये असे चंद्रकांत वांद्रे नी हा दिमाग लावला होता परंतू ती जी कम्युनिटी असते त्यामध्ये टेक्नीकल पर्सन घ्यावा लागतो चंद्रका ंत वांद्रे हे काही टेक्नीकल नाहीत त्यांना कामाच्या सोईसाठी तेथे देण्यात आले होते , टेक्नीकल ऑफीसर वाहुळे साहेब आता आलेले आहेत तर अश्या शंकामुळे चर्चा चित्रविचित्र होत्या , राहीले फायदा नुकासानचा विषय आरोग्यधिकारी यांना विचारू शकता ते सांगतील हे रितसर आहे किंवा नाही काही शंका माझ्यासुध्दा होत्या त्या शंका मी याठिकाणी उपस्थित करणारच आहे तुम्ही बोला परतू जे मुदयावर आहे तेच बोला .

श्री.नितीन लढ्ढा:- वास्तविक आपण यावेळेला ७५ कोटी रूपयांचा महानगरपालिकेचा ठेका देणार आहोत याठिकाणी आपण ठेका पध्दतीने सुध्दा काम चालवितो आहे त्यामुळे आपल्याला समाधान मिळेल किंवा नाही हे येणारे भविष्यच सांगेल अशावेळी येणारा मक्तेदार हा कुठली मान्यता प्राप्त आहे की कोणी त्याच्याबाबतीत छाती ठोक पणे सांगेल की हा अत्यंत चांगल्या पध्दतीने काम करेल , परंतू महानगरपालिका एखादया ठेक्यावर किंवा एखादया प्रकल्पावर एवढया मोठया प्रमाणात खर्च करीत असतांना विशिष्ट प्रकारच्या काहींच्या मनामध्ये शंका होत्या ज्या शंका यांच्या मनात होत्या त्या शंका आमच्याही मनामध्ये होत्या आणि त्या शंकाच्या अनुषगांने आपण एखादया निर्णयापर्यंत येतात हा विषय कुठेतरी थांबविला गेला पाहीजे त्याच्यावर सखोल अभ्यास होणे गरजेचे आहे, आणि परिस्थिती बदलते आणि बदलत्या परिस्थिती नुसार वरिष्ठांच्या मनामध्ये शंका निर्माण होंते तो ठेका आपण ७५ कोटीला दया २०० कोटीला दया किंवा ५०० कोटीला दया कारण तुमचे बहुमत आहे त्याठिकाणी तो निर्णय या बहुमताने घेवु शकतात माझा आता काही आक्षेप नाही परंतू यापुर्वी सुध्दा ठेका पध्दतीने ज्या ज्या वेळी दांडेकरला ठेका दिला जायचा त्यावेळी सभागृहामध्ये वारंवार अश्या पध्दतीचे प्रश्न उपस्थित केले जायचे त्यावेळेला ते काम जे करत होते त्याबाबतीत समाधानकारक काम मिळत होते १०-२० टक्के त्यामध्येही चोऱ्या होत असतील त्यामध्ये काही दोन मत नाही, येणाऱ्या कालावधीमध्ये काय होईल हे आपण आज सांगु शकत नाही माझ्या सांगायची विनंती एक आहे की ईतक्या मोठया प्रमाणात पैसा खर्च होत आहे तर त्या पध्दतीचे काम या शहरातील नागरीकांना सदस्यांना मिळायला पाहीजे का की शेवटी या सर्व समस्यांना तुम्हा आम्हा सर्वांना सामोरे जावे लागते घंटा गाडी आली नाही लोक नगरसेवकांना सांगतात एस.आय फोन करीत नाही किंवा आयुक्तां कडे जात नाहीत कारण तो नगरसेवकाला फोन करतो गटार साफ झाली नाही की तो नगरसेवकाला फोन करतो मग नगरसेवकांच्या डोकेदुखी वाढतात आणि त्या डोकेदुखी वाढु नयेत म्हणुन आपण मोठयाप्रमाणात पैसा खर्च करतो हा पैसा खर्च करतांना त्याचा आऊटसोर्स हा योग्य पध्दतीने व्हायला पाहीजे हा माझा आक्षेप आहे सभागृहातील कोणी सदस्य छातीठोक पणे घेत असेल तर निश्चीतच आम्ही त्याला तयार आहोत एखादया सदस्याने उभेरहावे आणि त्याने सांगांवे की आरोग्याच्या मक्तेदाराच्या संदर्भात पुढील ५ वर्षामध्ये एकही तक्रार येणार नाही आणि आली तर तुम्ही मला जबाबदार म्हणून पकडा त्याने हमी घ्यावी .

श्री.कैलास सोनवणे :- माझ्या ज्या शंका होत्या ज्यावेळी पहिल्यांदा आपण असे ठरविले होते की ४ प्रभागाकरीता प्रभागनुसार ४ ठिकाणी द्यायचे ज्यावेळी दांडेकर या एका व्यक्तीला पुर्ण ठेका तुम्ही देवुन दिला तर तो कोणाचीच चालु देत नाही तसे जास्त होणार नाही दांडेकरने डायरेक्ट ठेका बदलवुन टाकला होता आणि जळगांव करांची हाल केले होते

त्यावेळला अध्यक्ष होते केडी पाटील होते तसे हाल नविन ठेकेदाराकडुन होणार नाही त्यासाठी त्याला करारनाम्यामध्ये बांधा .

श्री.नितीन लढढा:- या विषयाची हमी घेणार कोण ?

श्री.कैलास सोनवणे :- करारनाम्यात बांधतील ना त्याला काहीतरी प्रमाणात त्याला दंड वगैरे असे काही करता येईल तसे आपल्याला करता येते ना साहेब. कोणीही हा ठेका घेतला तर मी त्यासाठी सांगतच होतो की प्रभाग समिती निहाय ४ ठेके द्या की Monopoly करुन ठेका देवु नका, दुसरा विषय असा आहे की एक टेक्नीकल प्रश्न मला पडला होता की ज्यावेळी आपण ४ प्रभागांचा ठेका आपण काढत होतो त्यावेळी मिटींगमध्ये भगतभाईंनी प्रस्ताव मांडुन त्यामध्ये बदल केला आणि त्यांनी सांगीतले की एकमुस्त ठेका काढण्यात यावा त्यावेळेस सुध्दा तुम्ही ऑब्जेक्शन घेतले होते तुमच्या लक्षात नसेल तर मी सांगु शकेल तुम्हीच घेतले होते मी स्वत: ईतिवृत्त वाचुन तसेच नगरसचिव विभागात जावुन मी स्वत: तेथे सी.डी पाहुन ते ऐकले आहे आणि तुमचे ऑब्जेक्शन असे होते की मागचे ठराव बदल करण्यासाठी कमीत कमी ३ महिने लागतील आणि त्या मिटींगला २ महिने आणि ४ दिवस झालेले होते दि.०७/१२/२०१८ ला आपण तो पारीत केलेला होता आणि पहिली मिटींग ११/१०/२०१८ ला झालेली होती तर मला ती अडचण आली की आपण हया इतिवृत्तमध्ये बदल केला आणि त्या बदला नुसार एकमुस्त ठेका निघुन गेला मी मा.आयुक्त साहेबांना दाखविले व परवा मी त्यांना विचारले की त्याला टेक्नीकलदृष्टया काही अडचण येणार नाही का आणि साहेबांनी मला सांगीतले की काहीच अडचण येत नाही आणि भाऊ तुमच्या त्या मुद्याची मी खात्री केली होती आणि तो ठेका रद्द होऊ नये या हिशोबाने मी हे केले होते की तो ईलिगल पणे होवु नये त्यानंतर मी कमीत कमी ८ ते १० वेळा विकास पाटील यांच्या सोबत बसुन त्याचा अभ्यास केला कारण सगळया नगरसेवकांचे ऑब्जेक्शन होते काही म्हणत होते ते चुकीचे आहे , केस दाखल केलेली आहे वगैरे वगैरे तर या शंकाचे निरसण करण्यासाठी मी १० वेळा त्यांच्या सोबत बसलो त्यांनी सगळया शंकेचे निरसण केले तुम्हाला परत जर वाटत असेल तर उदय पाटीलयांना बोलावुन तुमच्या शंकेचे निरसण करता येईल संगळयाची उत्तरे मिळाले आहेत फक्त माझे एक म्हणणे होते पार्टी मिटींग झाली मी सुध्दा त्या पार्टी मिटींग मध्ये होतो ५४ रू च्या विरोधात होतो जर तुम्ही ५४ रू प्रति कामगार प्रमाणे सेवा शुल्क तुम्ही त्या मक्तेदाराला दिला तर ५४ X ४०० X ३० X १२ X ५ म्हणजेच पाच वर्षात आपण ३,८८,८०,०००/- आपण त्याला जास्तीचे देत आहेत तर माझे असे मत होते की हा मक्ता दोन टाईप मध्ये करावा , एक मक्ता मजुर पुरविण्याचा म्हणजे कामगार पुरविण्याचा त्यामध्ये सर्विस टॅक्सचा विषय आलाच नसता हा एक विषय होता आणि मागच्या मक्त्यांच्या तुलनेमध्ये हा मक्ता मासिक कितीने जास्त आहे तर तो ११ लाखाने जास्त आहे याबाबत उदय पाटील सांगु शकतील आणि त्याचे होतात ६ कोटी ७ लाख तर असा हा दहा कोटीचा तोटा मला मनाला पटत नव्हता तर मी त्यांना त्याबाबत विचारले की कसे आहे तर त्यांनी असे सांगीतले की हा मक्ता तसाच काढलेला आहे मागचे मक्तेदार जे होते त्यांचे काम घंटागाडीही पुरविणे , कचरा उचलायला कामगार पुरविणे , रस्ते साफ करणे , घर टु घर कचरा उचलणे आणि त्या किमती मध्ये हे सगळे होते ते मला पटत नव्हते परंतू त्यांनी सांगीतले की आपण असे दिलेले आहे आणि शासनाकडुन आपल्याला गाडया आल्या आणि मागच्या वेळेस आपल्या गाडया भाडयाने घेतल्या नव्हत्या आपल्या गाडया घेण्याची अट सक्तीची केली म्हणून नाहीतर आपल्या गाडया तशाच पडुन राहील्या असत्या आणि सर्व शेवटी समाधान झाल्यानंतर याबाबत आम्ही गिरीषभाऊ यांचेशी बोललो त्यांनीही सांगीतले की मी चर्चा केली असुन तुम्ही मक्ता मंजुर करा जळगांव शहरासाठी हा हिताचा मक्ता आहे आणि त्या नंतर आम्ही हा मक्ता केला तुम्ही सांगा आता पैसे भेटले आणि या याविषयी सुध्दा बोललो की मागच्या मक्तेदाराचा विषय आलेला आहे आता मला प्रशासनाला विचारावस वाटत की तुम्ही मागचे मक्ते रदद करत आहेत तुम्ही चांगले काम केले म्हणजे आम्ही म्हणजे आमच्या वॉर्डात चांगले काम केले म्हणुन १ नं चे बक्षीस मिळाले आहे २ नंबर चे मिळाले आहे कुणाला ३ नं. चे मिळाले आहे, कुणाला ४ नं. चे मिळाले आहे आणि कमी चा जो मक्ता आहे तरीही रदद करतात मग ते रदद का करतात म्हणून माझे काही म्हणणे नाही कुणाला २ कुणाला ४ कुणाला ६ असे महिने बाकी आहेत पण मागचे कमीचे मक्तेदार कोण प्रशासन कसे प्रस्ताव ठेवतात कसे की त्याला कन्टीन्यु करा ज्यांना शासनाने पुरस्कार दिलेल्यांचा कमीतकमी त्यांनचा पुर्ण होवु द्या शेवटी प्रशासनाने ठरावावे आणि आपण सर्व मिळुन ठरवा काय करायचे आहे ते.

श्री.नितीन लढढा :- परंतु तुमचे जे शब्द होते कमी रकमेचे मक्ते चांगले काम करणारे , बक्षिस मिळवुन देणारे ते रदद करून आपण ज्यांचे तोंड पाहीले नाही त्याचेत्याच्या कामाची तुलना आपण कुठे केलेली नाही. आणि त्याला आपण वाहतो आहे अशी परिस्थिती अप्पांच्या बोलण्यातुन समोर आली आहे आपण येथे सांगीतले की येणारा मक्तेदार की ज्याची जबाबदारी एकही नगरसेवक घेणार नाही अटी शर्तीच्या बाबतीत आपण जे म्हटले होते ते आपण थोडयावेळापुर्वी essl च्या संदर्भात २ तास या सभागृहात त्यावर चर्चा केली अनेक अटी शर्ती त्यामध्ये टाकलेल्या आहेत पण तो मक्तेदार एवढया अटी शर्तींना जुमानतो आहे का जर मक्तेदार अटी शर्तींना जुमानतच नसेल तर मक्तेदाराला कीतीही अटी शर्ती तुम्ही किंवा या सभागृहाने टाकत चला शेवटी त्याची काम करण्याची ऑनेस्टी आणि प्रशासन त्याच्यावर किती चांगल्या

प्रकारचे निर्णय घेवु शकते प्रशासनातील चेहरे तेच आहेत इकडेचे तिकडे याच्यामध्ये काही फार मोठा बदल होतो याच्यातील काही मोठा भाग नाही यामध्ये काहीतरी मिळेल असे मी खात्रीशिर रित्या मी सांगु शकत नाही कारण ती सिस्टीम तशीच झालेली आहे या सिस्टिम ला मी बदलु शकत नाही , तुम्ही बदलु शकत नाही परंतु चर्चा करून त्याच्यामधुन काय चांगले साध्य करून घेता येईल कारण त्याचा प्रश्न हा आहे कारण शासन आपल्याला अनुदान देते म्हणून आपण एका हाताने घ्यायचे आणि दुसऱ्या हाताने देवुन द्यायचे हा काही व्यवहारीक विषय नाही कारण वाचलेला पैसा महानगरपालिकेला दुसऱ्या प्रकल्पाला कामात येईल ही एकंदरीत परिस्थिती आहे जो काही निर्णय आपल्याला घ्यायचा असेल तो निश्चितपणे घ्यावा परंतु महानगरपालिकेच्या आर्थिक हिताचा हया निर्णय शिवसेना पक्ष विरोधात आहे.

श्री.ईब्राहीम पटेल :- अश्विनभाऊ आरोग्याच्या विषयी बोलत आहे आपण जो करार करणार आहेत त्या व्यतिरीक्त काही उपाययोजना केलेली आहे का ?

श्री.नितीन लढढा :- जवळपास आपण ७ कोटी रू खर्च करून महानगरपालिकेने ८५ घंटागाडया घेतलेल्या आहेत याचे कंम्पेनशेसन केव्हा होवु शकते की ज्या वेळेला तुम्ही या गाडयांना महानगरपालिकेचे अनुज्ञेय असलेले भाडे त्या घंटागाडयांचा तुम्हाला स्विकार करावा लागेल आणि त्यापोटी आम्हाला ईतक भाडे द्यावे लागेल अशा पध्दतीची निविदा तुम्ही प्रसिध्द केलेली आहे तिला काय प्रतिसाद मिळाला ती कीती कोटी मध्ये गेली ती दरमहिन्याला १५ कोटीला गेली की २० कोटी ला गेली त्याच्यामध्ये ७ कोटी रू ची गुतंवणुक छोटी नाही साहेब खुप मोठी गुंतवणूक आहे येणारा मक्तेदार जेव्हा काम करतो तेव्हा त्याचे कॅपीटल किती होते पण जर ही एक्सरसाईज आपण यापुर्वी केली असती आणि आल्यानंतर मनपाच्या घंटागाडयांच्या संदर्भात तो मनपाला ईतकी रक्कम अदा करीत आहे त्याचा ईतका आर्थिक फायदा मनपाला होत आहे आणि ती किंमत जी आहे ती आपल्याला अवास्तव वाटते की त्या मक्तेदाराला या शहराच्या स्वच्छतेच्या संदर्भात देणे हे मनपाच्या हिताच्या दृष्टीने अवास्तव वाटत आहे मग तुम्ही सेकंड पार्टला असा मक्ता काढला असता की मनपा भाडे स्विकारणार नाही घंटागाडयांचे आम्ही आमची वाहने तुमच्या वापरासाठी देवु ही पडताळणी तुम्ही केलेली नाही ही एक्सरसाईज जर पुर्वी झालेली असती वाहुळे साहेब आपण यामध्ये खुप तज्ञ आहात एखादया गोष्टीची एकझरसाईज केलेली नसेल तर तुम्ही ती पुर्ण करणार कसे काय जसे अप्पांनी सांगीतले की भाडे अवास्तव होते म्हणून आपण भाडे माफ करून टाकले .

श्री.कैलास सोनवणे :- मी मिटींग मध्ये बोलत नाही .

श्री.नितीन लढढा:- मग आता बोला ना आज तोच मक्तेदार भिवंडी मध्ये मनपाला गाडयांचे भाडे देत आहे पण त्याला एका ठिकाणी मनपाला भाडे देणे शक्य आहे दुसऱ्या ठिकाणी मनपाचे ईतका पैसा वर आला आहे की कोणीही यावे आणि भरभरून दान आपण त्याच्या झोळीमध्ये टाकावे ईतकी काही आपली परिस्थिती नाही आहे किंवा आपण ईतके काही रईसजादयाची औलाद नाही तर या सगळयागोष्टींचा विचार करून निर्णय घ्यावा .मक्ता द्यावा कुणाला , कसा .द्यावा भविष्यात त्याच्याकडुन कसे काम करून घ्यावे ते प्रशासन आणि सत्ताधारी यांच्या अधिकार क्षेत्रा ामध्ये आहे .

श्री.कैलास सोनवणे :- त्याला आपण भाडे माफ केलेले आहे किंवा नाही हे पाटील साहेब सांगतील आपल्याला .

श्री.उदय पाटील :- मा सभागृह याठिकाणी नितीनभाऊंनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे की आपण त्यांना गाडया मोफत दिल्या किंवा विनामुल्य दिल्यास नाहीत यापुर्वी महानगरपालिकेमध्ये २०१३ ची निवडणुक झालेली होती त्यावेळी वॉर्डरचनामध्ये वाढ झालेली होती ३७ वॉर्डासाठी या सभागृहाने निर्णय घेतला होता की आपल्याकडे मन्युष्यबळ आणि वाहनव्यवस्था ही २० वॉर्डाची आहे ज्यावेळेला २० वॉर्ड पुरतीच होती त्यावेळेला आपण ती निविदा प्रसिध्द केलेली होती आणि त्या निविदेमध्ये आपण असे म्हटले होते की २० वॉर्डांचा जा ठेका दिला त्या वाहनांचे आता आपण काय करणार मग आपली वाहने जर रिकामी राहीली तर म्हणून आपण त्यांना आपली घंटागाडी घेणे बंधनकारक राहील असा आपण एक कॉज टाकलेला होता आणि टाकतांना सुध्दा आपण वाहन दुरूस्ती करीता आपल्याकडे वाहन व्यवस्था विभाग आहे वाहन व्यवस्था विभागाकडे आपण जी काही मदत घेतली होती आणि त्यांनी सरकारी भाडे असे काढले की मनपाची एकही घंटागाडी मक्तदाराने घेतली नाही ४० पैकी आपल्या घंटागाडया हया सडुन खराब झालेल्या आहेत आता शासनाने डीपीआर मंजुर केलेले आहे त्यालाही सभागृहाने मान्यता दिली आणि शासन अनुदानातुन आपण ७ कोटीची वाहने घेतली आम्हाला अशी भिती होती की पुन्हा आपण तसा कॉज टाकला आणि पुन्हा आपण त्यांना म्हटले की तुम्हाला आमची वाहने घ्यावीच लागतील आणि एवढे भाडे दयावेच लागेल जर त्याने सांगीतले की मला मनपाच्या वाहनाची आवश्यकता नाही माझ्याकडे वाहने आहेत तर मग शासन अनुदानातुन आपण घेतलेल्या ७ कोटी रूपयांच्या वाहनांचे काय करायचे तशीच परिस्थिती पुन्हा निर्माण झाली.

श्री.नितीन लढढा :- ७ कोटी रू अनुदान काय विशेष आहे

श्री.उदय पाटील :- भाऊ हा डिपीआर शासनाने मंजुर केलेला आहे .ही वाहने मनपाच्या ताफ्यात दाखल केलेली आहे.
श्री.नितीन लढढा :- ८५ वाहने मनपामध्ये दाखल करणे यावर आपण हा विचार केला की याच्यावर मनुष्यबह नाही म्हणून महानगरपालिका स्वत: जर कधी कर्मचारी त्यावर नेमुन ज्या पध्दतीने मक्तेदार करणार आहे मक्तेदार काही आकाशातुन जन्माला येत नाही मक्तेदार हा तुमच्या आमच्यातलाच एक असतो आणि ही एक एक्सरसाईज आपण केली असती की घंटागाडया आणि त्यांचे नियोजन मनपा स्वत: करेल स्वत: मनपा कर्मचारी नियुक्त करेल मक्त्याने करेल आणि मनपा स्वत: कचरा संकलन करेल आणि त्यावर होणारा खर्च हा ईतका येतो आणि या गाडया जर आपण मक्तेदाराला दिल्या त्यानेजर संपुर्ण यंत्रणा लावली तर याचे कंपेसेशन कुठे आहे का शेवटी तुलना कुठेतरी करावी लागेल ना उदय पाटील किंवा शासनाने सांगीतले की गाडया घ्या तर घ्या गाडया घेतांना त्याचा भविष्याचे नियोजन तर केलेले असेल त्या गाडया काही पार्कींग मध्ये शोपीस म्हणुन ठेवायच्या नाही ज्यावेळेला गाडया घेतल्या असतील त्यावेळी काहीतरी विचार केलेले असतील ना मग ते नियोजन काय होते मग नियोजनात बदल घडला कसा काय ? ज्यावेळेला तुमची पॉलीसी बदलते त्यावेळेला ती बदलत्या प्रवाहाच्या विषयी समर्पक उत्तर आपण देवू शकू ही परिसिथती ऑन पेपर पाहीजे की आम्ही ही परिस्थिती मनपाच्या आर्थिक हिताच्या दृष्टीकोनातुन बदलत आहोत मनपाने जरी ७ कोटी रूपयांच्या गाडया शासकीय अनुदानातुन घेतल्या परंतू त्या गाडयाचे काम मनपा आपल्या स्वत:च्या जबाबदारीवर पार पाडेल की त्याला ईतर खर्च येवु शकतो किंवा त्याला ईतर खर्च येतो आणि जर कधी आपण मक्ता दिला आणि मक्तेदाराला गाडया दिल्या तर त्याचे आर्थिक नुकसान मनपाला होवू शकते आणि आर्थिक फायदा मनपाला होवू शकतो परंतू याच्या एक्सरसाईज कुठे झालेल्या नाहीत गाडया जळगांवात दाखल झाल्या आणि त्यावेळी एकमुस्त कडे वळलो जबाबदार प्रभाग वाईज ठेक्याच म्हणत आहेत प्रभाग वॉईज ठेक्याचे त्याच्यामध्ये वाहनांचे काहीच नाही. त्यामध्ये त्यांना आपली वाहने परवडणारे नव्हते म्हणून त्यांनी त्यांची स्वत:ची वाहने लावली होती आपली वाहने सडुन गेली वाहने सडून गेल्यामुळे परंतू आजच्या परिस्थितीलाही त्या वाहनांची काळजी घेणे हे त्या संबंधीत विभागाची जबाबदारी असेल आजही बऱ्याचश्या घंटागाडया नागरीकांपर्यंत पोहोचत नसतात आणि मला एस.आय कडुन उत्तर मिळते की भाऊ गाडी दुरूस्तीला गेली आहे मग ती जबाबदारी कुणावर निश्चित करायची ७ कोटींच्या गाडया आहेत याचा त्यांनी हा विचार केला नाही का ? की ही सगळी वाहने मक्तेदाराचीच आहेत का त्याला मक्तेदारच शासनाचा माणुस असेल नाहीतर दुसरा कोणीतरी मक्तेदार पाहीला असता काहीतरी चुकीचे चाललेले आहे पैशाचा योग्य उपयोग होत नाही हा स्पष्ट पणे आमचा आरोप आहे .
श्री नितीन बरडे :- पाटील साहेब हे तुमचे आत्ताचे मुदद‍े आहेत असे वाटते तुम्ही तेव्हा आरोग्याधिकारी नव्हते ना विकास पाटील होते आपण २० वाहनांचे ठेके काढले होते त्यातील १७ वाहने दिलेले होते .
श्री.उदय पाटील :- २२ वाहनांचे काढलेले होते त्यापैकी २ वाहनांचे रदद केले होते आणि २० वाहनांचे ठेके आजरोजी सुरू आहे.
श्री नितीन बरडे :- आपले असे ठरले होते की गावातील जे वॉर्ड आहेत त्या वॉर्डामध्ये दोनच घंटागाडया चालवायच्या आठवतय का तुम्हाला तुम्ही नसाल त्यावेळी तुम्ही प्रभाग अधिकारी होते त्यावेळेस त्यावेळी ते मक्ते झाले तेव्हा तुम्ही नव्हते आपले असे ठरले होते की मक्तेदाराला २० गाडया देतोय त्यानंतर ते त्यांचे वाहने वापरतील आणि आपले जे कंटेनर आहेत ते ५०० रू ठरविण्यात आलेले होते आणि जे उर्वरीत वाहने असतील ते गांवात कचरा जास्त आहे त्याभागात दोन दोन घंटागाडया चालवायच्या आपल्या घंटागाडया हया ड्रायव्हर मुळे किंवा बॅटरीमुळे काही टायर मुळे हया तेथे पडल्या गाडी नादुरूस्त झाली की दुसरी गाडी बदलविण्यात येत होत्या. त्यांना कोणीच काही केलेले नाही म्हणून त्या सडलेल्या आहेत तुमचा आरोप आहे ना की त्या मक्तेदारामुळे किंवा मक्ता दिला होता म्हणून गाडया सडल्या आहेत हे चुकीचे आहे त्यावेळी तुमच्या कडे ड्रायव्हर उपलब्ध नव्हते .
श्री.उदय पाटील :- जी माहिती आपण दिली ठिक आहे आता जी वाहने आपण घेतली त्या वाहनांचे काय करणार आपण जरी निविदेमध्ये असे दिलेले आहे तरी ही निविदा ६ कोटीची कमीची आलेली आहे म्हणजे आपण वाहने दिली नसती तर निविदाचे दर उंच गेले असते .
श्री.नितीन लढढा :- अंदाजपत्राकाबददल बाऊ करण्याचे काही कारण नाही .
श्री.अनंत जोशी :- मागेपण आपण मक्तेदाराला सांगीतले होते की महापालिकेचे वाहने घ्यावी लागतील म्हणून हि संविदा आम्हाला परवडणारी नाही असे त्यांनी सांगीतले होते काही ठेके त्यांनी घेतले नाहीत आणि २० वाहने देण्यात आली आजही एकमुस्त ठेकेदार आपल्याकडुन घंटागाडया घेणार नाही तो वाहने फुकट मागतोय पण तुमचे वाहने फुकट देणार का? म्हणजे २० मक्तेदार पुर्वी होते त्यांनी तुमचे काम वाहनासोबत केले होते त्यांनी स्वत: चे वाहने लावलेले होते आताही स्वत:चे वाहने लावुन कामे करत आहेत हे धोरण त्यावेळेस का ठेवण्यात आले नाही आजच का वापरले जात आहे तुमचे वाहन पडलेले आहे पडलेली वाहने सडणार तुम्ही स्वत: सांगीतले की २० वाहने सडले आहेत काहींनी सांगीतले की तुमचे

भाडे परवडणार नाही म्हणून तुमचे वाहने घेवु शकत नाही तुम्ही त्यांना भाडे परवडणार नाही तर तुम्ही मोफत घ्या असे सांगणार का ? पण हया ठेकेदाराला ऑनलाईन निविदा काढलीय .

श्री.उदय पाटील :- मुददा सारखा होता .

श्री.अनंत जोशी :- मला एक सांगा मागच्या वेळेस मक्तेदाराला घंटागाडयाचे भाडे परवडणारे नाही म्हणून त्यांनी वाहने घेतली नाही तुम्ही हया गाडया पडु दिल्या आणि आता हा म्हणुन सुरूवातीलाच आपण अशी अट टाकली हे कशा साठी माझे महापौर सो ा यांना विनंती आहे की पाटील साहेबांनी उत्तर दयावे त्यावेळेस तुम्ही ठेकेदाराला वाहने का दिली नाहीत आणि आता मोफत देण्याचे कारण काय आहे महापौर सा ो यांनी परवानगी दिलेली आहे मी परवानगी घेवुन बोलतोय

श्री.कैलास सोनवणे :- कोणत्या ठेकेदाराला दिलेली होती , वाहन विभागाने भाडे असे काढले नाही ना त्या पुर्वीच्या मक्तेदाराला दोनशे रू .मध्ये रिक्षा मिळत होती तो कशाला आपली वाहने घेईल .

श्री.नितीन लढढा :- आपले भाडे अवास्तव होते म्हणून त्यांनी आपली वाहने घेतली नाहीत

मा.आयुक्त :- वस्तुस्थिती अशी आहे मागच्या वेळेला जे काही मक्ते दिलेली होती टेंडर मध्ये ठाराविक ठेकेदाराला आहे अटी टाकलेल्या होत्या प्रीबीट च्या वेळेला सगळेच भाग घेवु शकतात आणि टेंडर बघण्यापुर्वीचे कारण आहे हा एक प्रॉब्लेम आहे.

श्री.नितीन लढढा :- ठीक आहे जर का ही वस्तुस्थिती प्रीबीट मध्ये त्यावेळेला जे काही मक्तेदार आलेले असतील म्हणजेच तेवढया मक्तेदारांमध्ये हा विषय झाला.

श्री.कैलास सोनवणे :- सगळयांनाच झाला होता.

श्री.नितीन लढढा :- अप्पा ऐकून घ्या जेजे आले त्यांच्यासाठीच हा निर्णय सामुहिक होता ना की संविदा तुम्हाला मिळेल की आम्ही आमची वाहने तुम्हाला देवु .

मा.आयुक्त :- प्रिबीट नाही सगळेच मक्तेदार असे नाही प्रिबीट ला कोणी अनुउपस्थित असले तरी त्यांची निविदा आपण उघडतो तर ते सगळयासाठी एकच असते

श्री.नितीन लढढा :- हया अटी शर्ती ज्या शिथील केलेल्या आहेत हयाच निविदा पुर्वी शिथील करून टेंडर झाले असते तर अजुन चांगल्या पध्दतीने त्याला प्रतिसाद मिळाला असता आणि जास्त स्पर्धा झाली असती आज ठाराविक लोकांमध्येच स्पर्धा झाली .

श्री.कैलास सोनवणे :- असु शकेल.

श्री.नितीन लढढा :- टेंडर घेणारी जी व्यक्ती असते त्या टेंडरच्या अटी शर्ती ज्या आहेत ना त्या अश्यात पध्दतीने मिश्किल केल्या जात आहेत कमीत कमी ४ ते ५ लोक उपस्थित असतील ठेकेदार असेल नगरपालिका असेल किंवा काही असेल हा सगळा खेळ जो आहे ना तो तातडीचा खेळ असतो कोण कश्या पध्दतीने त्यांच्या अटी शर्ती फॅब्रीकेट होत असतात माझ्याकडे २० वर्षांचा अनुभव आहे परंतु माझ्या मते चांगली कामे करणारी येथे १० मंडळी आहेत तेही मक्तेदार आहेत मीही मक्तेदार आहे परंतु ज्यांच्याकडे ५ ते ६ वर्षांचा अनुभव आहे ते काम माझ्यापेक्षा चांगल्या पध्दतीने करतात परंतु ईन्क्लुज करून साधारण ज्यांना २० वर्षाचा अनुभव असेल अशी व्यक्ती या निविदेमध्ये पाठवावी माझ्यापेक्षा एक कॉन्ट्रक्टर जे आहेत ही अटी शितील करणे करीता साहेब ही भुमिका लिमीट मध्ये करण्यापेक्षा ही स्थिती असल्यामुळे नविन निविदा प्रसिध्द केली असती आणि मी निश्चितपणे सांगु शकतो की या पेक्षा जास्त चांगल्या तऱ्हेने प्रतिसाद मिळेल तुम्ही आजही ती निविदा उघडु शकता जर का तुम्हाला पारदर्शी पध्दतीने काम करायचे असेल तर .

मा.आयुक्त :- जर का आपल्याकडे एकच निविदा दोन वेगवेगळया आल्या असत्या तर मी समजु शकलो असतो म्हणजे ॲटोमेटीक तुमचे काम झाले असते जर तर ची कारणे असतात .

श्री.विशाल त्रिपाठी :- ज्याला ठेका घ्यायचा असतो तो बरोबर भरतो .

श्री.कैलास सोनवणे :- कॉम्लीकेशन झालेली आहे त्याच्यात त्यांचे आणखी एक उदाहरण सांगतो भाऊ त्याचे निविदा निघाल्यावर सुध्दा ऑब्जेक्शन घेतले गेले आहे त्याच्यावर

मा.आयुक्त :- आणि या ठिकाणी आपल्या शहराचा डिपीआर हा संचालक स्वच्छ महाराष्ट ने अप्रुव केलेला आहे आणि मी आज दुसऱ्या परिस्थिती मध्ये आहे. पण राज्यातील बऱ्याच नगरपरिषद काही अपवाद वगळता ज्या ठिकाणी मुंबई महानगरपालिका असेल मुंबई वगळता मी पुण्यात सुध्दा काम केलेले आहे तर हे टेंडर डॉक्युमेंट जे केले आहे तर ते संपुर्ण अप्रुव्ह हे शासन करत असते पण मला या ठिकाणी जाहीरपणे एक सांगायचे आहे की उदय पाटील यांनी जे डॉक्युमेंट दिलेत ते अतिशय सुंदर केलेले आहे तेही ॲनी हॅव कंन्सलटंट नाहीतर या प्रक्रीयासाठी दोन ते अडीच टक्के रिबीट दिलेले आहे याचा आपण स्पर्धात्मक दृष्टीने विचार करावा आणि शहराची गरज याचाही विचार करावा .

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १४९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम 2016 नुसार 5 वर्ष कालावधी करीता (1) घंटागाडीद्वारे शहरातील दैनंदिन घराघरातून निर्माण होणारा कचरा, रस्त्यावरील कचरा तसेच उपहारगृह, दुकाने, व्यापारी संकुले, उद्याने इ. सर्व ठिकाणाचा घनकचरा (ओला व सुका) वेगवेगळा संकलन करुन ट्रान्सफर कलेक्शन सेंटर पर्यंत वाहतूक करुन सुका कचरा उतरविणे व ओला कचरा रिफयुज कॉम्पॅक्टरमध्ये लोड करुन घनकचरा प्रक्रिया प्रकल्पापर्यंत वाहतूक करणे. तसेच (2) शहरातील प्रभाग समिती क्रं. 1 ते 4 पैकी दोन प्रभागातील दैनंदिन रस्ते, गटार, व्यापारी संकुले इ. साफ सफाई करणे करीता 400 कामगार पुरवठा करणेकामी एकूण अंदाजीत रक्कम रु.75.50 कोटी येणारा खर्च 14 व्या वित्त आयोगाच्या प्राप्त निधीतून करणेस मा. महासभा ठराव क्रं.18 दि.11/10/2018 अन्वये मान्यता देण्यात आलेली असून प्रभाग निहाय ई-निविदा न मागविता संपुर्ण शहरातील एकमुस्त पध्दतीची ई-निविदा प्रक्रिया करणेस मा. महासभा ठराव क्रं. 32 दि.07/12/2018 अन्वये झालेल्या इतिवृत्तात सुधारणा नुसार एकमुस्त पध्दतीच्या ई-निविदा प्रक्रियेस मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

जळगांव शहराचे एकूण क्षेत्रफळ 68.24 स्के. कि.मी. असून शहरातील लोकसंख्या अदमासे 5 लक्ष आहे. आज रोजी शहराच्या साफ सफाईसाठी सध्यस्थितीत आस्थापना सुचिवर कायम स्वरुपाचे 175 झाडू कामगार + 160 गटार कामगार + म.न.पा. वाहनावर कचरा संकलन करणे कामी 83 कामगार असे 418 कामगार व त्यावर नियंत्रण ठेवणारे 45 मोकादम असे एकूण 463 कामगार आज रोजी कार्यरत असून मा. शहर अभियंता यांचेकडून प्राप्त केलेल्या अहवालानुसार जळगांव शहरातील एम.आय.डी.सी. परिसर वगळून रस्ते व गटारींची माहिती खालील प्रमाणे आहे.

| डांबरी रस्ते | कॉंक्रीट रस्ते | खडीचे रस्ते | पक्की गटार | कच्ची गटार |
|---|---|---|---|---|
| 328.40 कि.मी. | 66.15 कि.मी. | 90.48 कि.मी. | 281.87 कि.मी. | 350 कि.मी. |

शासन परिपत्रक क्र. जीईएन-1089 / 744 / सीआर. 235/89/नवि.14 दि.14 ऑगष्ट 1990 अन्वये रस्ते सफाई करीता 3000 चौ. मि. / प्रति कामगार व गटार सफाई करीता 300 मी. लांबीला / प्रति कामगार शासन मार्गदर्शक सुचनेनुसार अपेक्षीत आहे. जळगांव शहरातील खडीचे रस्ते वगळून उर्वरित 395 कि.मी. चे रस्ते सफाई करीता सरासरी 7.0 मिटर रस्त्यांची रुंदीनुसार 395 कि.मी. x 7 मी. = 2765 स्के. कि.मी. क्षेत्रफळा करीता किमान 3000 चौ. मी. / प्रति कामगार या प्रमाणे 921 झाडू कामगार अपेक्षीत असून शहरातील कच्च्या गटारी वगळून उर्वरित 282 कि.मी. गटार सफाई करीता किमान 300 मी. लांबीला / प्रति कामगार या प्रमाणे 940 गटार कामगार असे एकूण 1861 कामगार उक्त शासन परिपत्रकानुसार संपुर्ण शहरातील दैनंदिन रस्ते व गटार सफाई करीता अपेक्षीत आहेत.,

म.न.पा. सार्वत्रिक निवडणूक -2013 वार्ड रचनेनुसार जळगांव शहरातील प्रभाग क्र. 1 ते 4 मधील एकुण 37 वार्डापैकी 20 वार्डातील दैनंदिन साफ सफाई एकमुस्त पध्दतीने रु.3,10,000/- प्रतीमहा ठोक वेतन प्रमाणे मक्तेदारामार्फत करण्यात येत असून म.न.पा. आरोग्य विभागातर्फे उर्वरित 17 वार्डातील घराघरातून निघणारा कचरा संकलन, वाहतूक तसेच दैनंदिन रस्ते व गटार साफ सफाई म.न.पा. वाहनाद्वारे आस्थापना सुचीवरील 463 कायम कामगार व 83 वाहन चालकांतर्फे करण्यात येत आहे.

महापालिकेच्या उक्त 83 वाहनांना दरमहा सरसरी 20 हजार लिटर पर्यंत इंधन लागत असल्याची वाहनतळावरील नोंद रजिष्टर वरुन माहिती प्राप्त झालेली आहे. त्या अनुषंगाने दरमहा कचरा संकलन व वाहतूक करणाऱ्या वाहनांकरीता 20000 लिटर डिझेल x रु.70 प्रती लिटर दराप्रमाणे एकूण रक्कम रु.14 लक्ष इंधनावर दरमहा सरासरी खर्च येत असून 83 वाहनांच्या वाहन व्यवस्था दुरुस्तीवर वाहन विभागाकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार दरमहा सरासरी रु.3.50 लक्ष खर्च येत आहे. तसेच वाहनांवरील कायम वाहन चालक यांचे मासिक वेतन प्रती वाहन चालक सरासरी रु.25,000/- x 83 रु.20.75 लक्ष दरमहा खर्च वाहन चालकांवर येत आहे. आरोग्य विभागामार्फत 17 वार्डातील दैनंदिन साफ सफाईच्या कामासाठी कायम 463 कामगारांचे वेतन वगळून दरमहा एकूण सरासरी रक्कम रु.38.25 लक्ष खर्च येत आहे.

तसेच उर्वरित 20 वार्डातील दैनंदिन रस्ते, गटार साफ सफाई करणे व घराघरातील कचरा संकलन व वाहतूक करणे कामी एकमुस्त पध्दतीने प्रत्येक वार्डासाठी रु.3,10,000/- प्रतीमहा प्रमाणे मक्ता देण्यात आलेला असून दरमहा अंदाजीत सरासरी रु.62 लक्ष खर्च येत आहे. आस्थापना सुचीवरील कामय 463 सफाई कामगारांचा मासिक वेतन खर्च वगळून संपुर्ण शहरातील साफ सफाई करीता असा एकूण रक्कम रु.38.25 लक्ष + रु.62.00 लक्ष = रु.1 कोटी 25 लक्ष प्रतीमहा सरासरी खर्च सध्यस्थितीत येत आहे.

शहरातील अत्यंत वर्दळीचे व बाजारपेठेतील मोठया प्रमाणावर कचरा निर्माण होणारी ठिकाणे या व्यतिरिक्त शहरातील म.न.पा. 17 मजली प्रशासकिय इमारत, म.न.पा. व्यापारी संकुले, उद्याने, दवाखाने, शाळा, ग्रंथालय, मटन मार्केट, कत्तलखाना, स्मशानभुमी, कोंडवाडा, वाहनतळ, घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पावर देखरेख तसेच सार्व. शौचालय व मुताऱ्या इ. ठिकाणी देखील स्वतंत्र कामगारांचे मनुष्यबळ अपेक्षीत आहे. परंतू आस्थापना सुचीवरील अत्यंत कमी मनुष्यबळ, वाहन व्यवस्था व दुरुस्तीच्या अभावामुळे शहरातील कचरा संकलन व वाहतूकीच्या दैनंदिन कामकाजाबाबत नागरीकांमध्ये नाराजीचा सुर आहे.

करीता ई-निविदा प्रक्रिया करणेपुर्वी महापालिकेतर्फे स्वच्छ महाराष्ट्र अभियाना अंतर्गत शासनमान्य सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) च्या अनुषंगाने GeM पोर्टलवरुन खरेदी केलेली वाहने व म.न.पा.ची पुर्वश्रमीची कार्यरत वाहने मक्तेदारास पुरविण्याचे निविदा प्रक्रियेत समावेश करुन त्या अनुषंगाने सुधारीत अंदाजपत्रकासह ई-निविदा प्रपत्राचा मसूदा म.न.पा. प्रशासनाने गठीत केलेल्या निविदा समिती सखोल व सविस्तर चर्चेअंती मान्यतेने म.न.पा. विधीतज्ञ यांचे मार्फत निविदा मसूदेतील अटी शर्ती प्रमाणीत केल्यानंतर ई-निविदा सुचना क्रं. 1239 सन-2018-19 शासन निर्णय दि.27/09/2018 नुसार राष्ट्रीय, राज्य व जिल्हास्तरावरील दैनिक वृत्तपत्रात तसेच म.न.पा. संकेतस्थळावर www.maharashtra.etenders.in तसेच Sub portal : https://jmc.maharashtra.etenders.in वर प्रसिध्द करण्यात आली होती. मा. आयुक्त यांचे दालनात दि.05/02/2019 रोजी झालेल्या निविदापुर्व बैठकीत (Pri bid meeting) ईच्छुक निविदाकारानी उपस्थित केलेल्या मुद्दयांवर म.न.पा. हिताचा विचार करता स्पर्धात्मक निविदा प्राप्त होणेसाठी निविदेतील काही जाचक अटी शितील व दुरुस्त्या करुन मा. आयुक्त यांचे मान्यतेने Bid preparation करीता दि.20/02/2019 पर्यंत मुदतवाढ देवून शुध्दीपत्रक (Corrigendum) वरील प्रमाणे नमुद केलेल्या वृत्तपत्रांमध्ये तसेच संकेस्थळावर देखील प्रसिध्द करण्यात आले होते.

विहित केलेल्या मुदतीत संकेतस्थळावर 5 ई-निविदा प्राप्त झालेल्या असून निविदाकारांचा तांत्रिक लिफाफा क्रं. 1 दि.25/02/2019 रोजी निविदा समिती समोर उघडून उक्त कामांच्या प्राप्त 5 ई-निविदा मधील कागदपत्रांची निविदा समितीने छाननी केली असता 1. Amrut Enterprises, Thane 2. Watergrace Product, Nashik 3.R And B Infra Project private Ltd, Mumbai 4. AG Enviro Infra Projects Pvt.Ltd. Mumbai 5. BVG INDIA LTD. Talegaon Pune यांनी सादर केलेल्या दस्तऐवजाच्या आधारे निविदा समितीच्या अहवालनुसार व म.न.पा. प्रमुख विधीतज्ञ यांचे अभिप्रायाअंती पाचही निविदा पात्र ठरविण्यात आल्या होत्या.

त्या अनुषंगाने प्राप्त पाचही निविदाकार यांचे आर्थिक दरांचा लिफाफा क्रं. 2 निविदा समितीच्या शिफारशीने व मा. आयुक्त यांचे मान्यतेने दि.01/04/2019 रोजी उघडून प्राप्त निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता पहाता ई-निविदा क्रं. 1239 मधील L1 निविदाकार मे. वॉटर ग्रेस प्रॉडक्टस नाशिक यांचे प्राप्त स्पर्धात्मक सर्वात कमीचे / न्युनतम दर प्राप्त झालेले आहेत. तथापी प्रशासनास सदरचे दर जास्तीचे वाटत असल्याने दराचे विश्लेषण / वाटाघाटी करणे कामी दि.08/05/2019 रोजी मा. आयुक्त यांचे दालनात समक्ष झालेल्या चर्चेनुसार वाटाघाटीअंती L1 निविदाकार मे. वॉटर ग्रेस प्रॉडक्टस नाशिक यांनी 1. घराघरातून निघणारा ओला व सुका विलगीकृत कचरा संकलन व वाहतूक करणे कामी टिपींग फी दर रु.963.26 प्रती मे. टन ऐवजी रु.949.50/- प्रती मे. टन तसेच 2. शहरातील दैनंदिन रस्ते, गटार साफ सफाई करणे कामी सफाई कामगारांना अदा करावयाच्या वेतना पोटी म.न.पा. तर्फे मक्तेदारास दयावयाचे किमान वेतन दर रु.543/- प्रती कामगार प्रती दिन यावर निविदाकार यांचे सेवाशुल्क रु.58.00/- प्रती कामगार प्रती दिन ऐवजी रु.54.00/- दर कमी करुन काम करणेस सहमती दर्शविलेली असून दि.08/05/2019 अन्वये लेखी स्वरुपात पत्र सादर केलेले आहे.

म.न.पा. सार्वत्रिक निवडणूक सन-2018 वार्ड रचनेनुसार शहरातील 19 (अ/ब/क/ड) वार्डातील 100% दैनंदिन साफ सफाईचे उद्दिष्ट असून शास्त्रोक्त पध्दतीने घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम 2016 नुसार प्रस्तावीत निविदेतील अटी शर्तीनुसार अंमलबजावणी करणे कामी येणाऱ्या खर्चास मा. महासभा ठराव क्रं. 18 दि.10/11/2018 अन्वये प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात आलेली असून त्या अनुषंगाने सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रु.75.21 कोटी (अ रु.43.53 कोटी **ब** रु.31.68 कोटी) खर्च प्रस्तावीत करणेत आलेला असून L1 निविदाकार मे. वॉटर ग्रेस प्रॉडक्टस नाशिक यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती त्यांनी सादर केलेल्या दरानुसार खालील प्रमाणे येणाऱ्या खर्चास मा. महासभेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

| **कामाचे नांव** | **दर** | **प्रतीमहा खर्च** | **प्रती वर्ष खर्च** | **5 वर्ष कालावधीचा खर्च** |
|---|---|---|---|---|
| **अ)** घराघरातून निघणारा ओला व सुका विलगीकृत घनकचरा संकलन व वाहतूक करणे. (220 मे. टन प्रती दिन) | रु.949.50/- प्रती टन | रु.62.67 लक्ष | रु.7.52 कोटी | रु.37.60 कोटी |
| **ब)** शहरातील दैनंदिन रस्ते व गटारी साफ सफाई करणे करीता 400 कामगार पुरवठा करणे. (रु.489/- + रु.54/- = रु.543/- प्रती कामगार प्रतिदिन) | रु.543/- प्रती कामगार प्रती दिन | रु.56.47 लक्ष | रु.6.77 कोटी | रु.33.88 कोटी |
| **एकूण-** | | **रु.1.19 कोटी** | **रु.14.30 कोटी** | **रु.71.48 कोटी** |

**अ)** घंटागाडीद्वारे शहरातील वार्ड निहाय दैनंदिन घराघरातून निर्माण होणारा कचरा, रस्त्यावरील कचरा संकलन व प्रकल्पापर्यंत वाहतूक करणे कामी 5 वर्ष कालावधी करीता L1 निविदाकार मे. वॉटर ग्रेस प्रॉडक्टस नाशिक यांचे वाटाघाटीअंती टिपींग फी दर

रक्कम रु.949.50 प्रती टन प्रमाणे रक्कम रु.37 कोटी 60 लक्ष खर्च अपेक्षीत आहे. सदर खर्चाची तुलना अंदाजपत्रकिय खर्च रक्कम रु.43.53 कोटीशी केली असता रक्कम रु.5.93 कोटी (प्रतीमहा रु.9.88 लक्ष) कमीचा खर्च अपेक्षीत आहे.

**ब)** मक्तेदारामार्फत कंत्राटी पध्दतीने शहरातील वार्ड निहाय दैनंदिन रस्ते, गटार, व्यापारी संकुले इ. साफ सफाई करणे करीता मे. वॉटर ग्रेस प्रॉडक्टस नाशिक L1 निविदाकारातर्फे कंत्राटी पध्दतीने 400 कामगार पुरवठा करणे कामी म.न.पा. तर्फे दयावयाचे किमान वेतन दर रु.489/- प्रती कामगार प्रती दिन दरावर वाटाघाटीअंती निविदाकाराचे प्राप्त सेवाशुल्क निविदा दर रु.54/- असे एकूण रु.543/- प्रती कामगार प्रती दिन प्रमाणे 5 वर्ष कालावधी करीता रक्कम रु.33.88 कोटी खर्च अपेक्षीत आहे. सदर खर्चाची तुलना अंदाजपत्रकिय रक्कम रु.31 कोटी 68 लक्ष मात्रशी केली असता रक्कम रु.2.2 कोटी पेक्षा जास्तीचा वाढीव खर्च अपेक्षीत असून खालील अ.क्र. 1 ते 6 बाबींना महासभा मान्यता प्रदान करीत आहे.

1. वरील प्रमाणे 5 वर्ष कालावधी करीता अंदाजपत्रकिय खर्च अ) रु.43.53 कोटी + ब) रु.31.68 कोटी असा एकूण रक्कम **रु.75.21 कोटी** खर्च प्रस्तावीत होता. तथापी L1 निविदाकार मे. वॉटर ग्रेस प्रॉडक्टस नाशिक यांचेशी वाटाघाटीअंती प्राप्त झालेल्या निविदा दरांशी तुलना केली असता अ) रु.37.60 कोटी + ब) रु.33.88 कोटी असा एकूण रक्कम **रु.71.48 कोटी** खर्च अपेक्षित असून सन २०१९-२० या आर्थिक वर्षात येणाऱ्या अपेक्षित खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

2. L1 निविदाकार यांचेशी करारनामा करुन कार्यादेश देणेपुर्वी शहरातील दैनंदिन साफ सफाई व कचरा संकलन व वाहतूक करणाऱ्या सार्वत्रिक निवडणूक -2013 चे वार्ड रचेने नुसार वार्ड निहाय देण्यात आलेले 20 वार्डातील सध्यस्थितीत कार्यरत असलेले मक्तेदारांचे एकमुस्त पध्दतीने प्रती वार्ड रु.3.10 लक्ष प्रमाणे दिलेले मक्ते दहा दिवसांच्या मुदतीची नोटीस देवून रद्द करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

3. अ) शहर हद्दीतील घराघरातून घनकचरा संकलन व वाहतूक करीता L1 निविदाकार यांचे प्राप्त झालेले टिपींग फी दर रक्कम रु.949.50/- प्रती टन तसेच ब) शहरातील दैनंदिन रस्ते, गटारी साफ सफाई करणे करीता 400 कामगार पुरवठा करणे कामी L1 निविदाकार यांना म.न.पा.तर्फे दयावयाचे किमान वेतन दर रु.489/- प्रती कामगार प्रती दिन या दरावर निविदाकाराचे प्राप्त सेवाशुल्क निविदा दर रु.54/- असे एकूण रु.543/- मात्र. मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

4. निविदेतील अटी शर्तीनुसार एक वर्षाचा कालावधी संपल्यानंतर दुसऱ्या वर्षापासून 5 % नैसर्गिक वाढ विचारात घेवून मे. L1 निविदाकार यांचे प्राप्त दरातील रक्कमेवर कामगारांचे वेतन वगळून उर्वरित रक्कमेवर 5% दरवाढ दरवर्षी महापालिकेतर्फे देणे क्रमप्राप्त असल्याने त्या अनुषंगाने येणाऱ्या वाढीव खर्चास. मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

5. निविदेतील अटी शर्ती नुसार शासनाच्या किमान वेतन अधिनियम 1948 प्रमाणे कामगारांचे किमान वेतन दरात वेळोवेळी होणारे बदल L1 निविदाकार यांना अनुज्ञेय असून त्या अनुषंगाने येणाऱ्या वाढीव खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

6. L1 निविदाकार यांचेमार्फत निविदेतील मंजूर दरात प्रसंगी आवश्यकता भासल्यास साफ सफाई करीता वेळोवेळी कामगार पुरवठा करणेस व त्या अनुषंगाने येणाऱ्या वाढीव खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रस्तावीत केलेनुसार वरील प्रमाणे अ.क्र. 1 ते 6 बाबींकरीता 5 वर्ष कालावधीसाठी येणारा खर्च 14 व्या वित्त आयोगाचे प्राप्त निधीतून मुदत दि.३१/०३/२०२० संपुष्टात येईपावेतो करणेस तसेच भविष्यात याकामी निधीची तरतूद १५ वित्त आयोगाचे प्राप्त होणाऱ्या रक्कमेतून चिन्हांकित करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

उक्त कामी मे.वॉटर ग्रेस प्रॉडक्टस नाशिक यांचेशी करारनामा करुन कार्यादेश देणेस याव्दारे मान्यता प्रदान करण्यात येत असून प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**बहुमताने मंजुर**

**अनुकूल मते :- ५५ प्रतिकुल मते :- १२**

**सूचक :- अड.शुचिता अतुलसिंह हाडा**

**अनुमोदक :- ललित विजयराव कोल्हे**

**नगरसचिव विषय क्र.३)** GeM पोर्टलवरुन म.न.पा.ने १० सिट्सचे फिरते शौचालय (मोबाईल टॉयलेट व्हॅन) २ नग फिरते शौचालय शहरामध्ये अथवा शहरा बाहेर सार्वजनिक, वैयक्तीक व धार्मिक कार्यक्रमासाठी भाडे तत्वावर देणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

श्री.सदाशिव ढेकळे :- दोन नग च्या ऐवजी फिरते शौचालय प्रत्येक प्रभाग समिती मध्ये प्रत्येक कार्यक्रमाच्या खर्चास मान्यता देण्यात यावी व प्रत्येक सरकारी कामांसाठी ५० टक्के आकारण्यात यावी .

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १५० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, GeM पोर्टलवरुन म.न.पा.ने १० सिट्सचे मोबाईल टॉयलेट व्हॅन प्रती नग रु.५,६५,०००/- या प्रमाणे २ नग रु.११,३०,०००/- मध्ये खरेदी करण्यात आलेले आहेत. सदरचे फिरते शौचालय

शहरामध्ये अथवा शहरा बाहेर सार्वजनिक, वैयक्तीक व धार्मिक कार्यक्रमासाठी भाडे तत्वावर दयावयाचे झाल्यास खालील प्रमाणे खर्च वसूल होणे अपेक्षीत आहे.

टॉयलेट व्हॅन ने-आण करणे करीता लागणारे वाहन, वाहन चालक, इंधन, वाहनावरील मजूर व देखभाल दुरुस्तीसह प्रती दिन रु.२२७०/- प्रती दिवस खर्च अपेक्षीत आहे. सदर मोबाईल टॉयलेट व्हॅन म.न.पा.चे आयोजीत कार्यक्रम वगळून इतरत्र भाडे तत्वावर दयावयाचे झाल्यास खालील प्रमाणे खर्च वसूल करणे अपेक्षीत आहे.

१. जळगांव शहरासाठी रु.२५००/- प्रती मोबाईल टॉयलेट व्हॅन प्रतीदिन भाडे आकारणी करणे योग्य होईल. तसेच मोबाईल टॉयलेट व्हॅनचे काही नुकसान झाल्यास त्याची देखभाल दुरुस्ती करीता रु.५०००/- अनामत रक्कम (डिपॉझिट) म.न.पा.कडे भरण्याच्या अटीवर देणे योग्य होईल.

२. जळगांव शहराच्या बाहेर जिल्हयातील इतरत्र ठिकाणी पाठविणेसाठी रु.५०००/- प्रती मोबाईल टॉयलेट व्हॅन प्रती दिन भाडे आकारणी करणे योग्य होईल. तसेच मोबाईल टॉयलेट व्हॅन बाहेरगांवी ने-आण करीता येणारा खर्च अर्जदाराने स्वखर्चाने करावयाच्या अटीवर देणे योग्य होईल. (उदा.ट्रॅक्टरचे धुड, इंधन, वाहन चालकासह) तसेच मोबाईल टॉयलेट व्हॅनचे काही नुकसान झाल्यास त्याची देखभाल दुरुस्ती करीता रु.१०,०००/- अनामत रक्कम (डिपॉझिट) म.न.पा.कडे भरण्याच्या अटीवर देणे योग्य होईल.

प्रशासनाने प्रस्तावित केलेप्रमाणे मोबाईल टॉयलेट व्हॅन भाडे आकारणी करणेस मान्यता देण्यात येत आहे. परंतू शहरातील क्रिडास्पर्धा, धार्मिक व सामाजिक कामासाठी भाडे ५० टक्के आकारण्यास ही मान्यता देण्यात येत आहे.

तसेच म.न.पा.ने खरेदी केलेले १० सिट्सचे फिरते शौचालय (मोबाईल टॉयलेट व्हॅन) २ नग व्यतिरिक्त नविन २ नग १० सिट्सचे फिरते शौचालय (मोबाईल टॉयलेट व्हॅन) खरेदी करणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत असुन नविन १० सिट्सचे फिरते शौचालय (मोबाईल टॉयलेट व्हॅन) खरेदी झाल्यावर प्रत्येक प्रभाग समितीला एक नग याप्रमाणे फिरते शौचालय देण्यात यावे.

सदर प्रकरणी प्रशासनाने नियमानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- सदाशिव गणपतराव ढेकळे**
**अनुमोदक :- राजेंद्र झिपरु पाटील**

**नगरसचिव विषय क्र.४)** एम.जे.कॉलेज चौकाला भगवान एकलव्य चौक नांव देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

श्री.कैलास सोनवणे :- महिला व बाल सुधार गृहाजवळील भास्कर मार्केट साईड चौकाला संत रोहीदास चौक नामकरण करणे कारण हे बारी समाजाचे आराध्य दैवत आहे हे नाव देण्यात यावे किंवा त्या चौकास यापुर्वी नामकरण झालेले असल्यास हे रद्द करण्यात यावे म्हणजे याची चाचणी करून घ्यावी.

श्री.बबनराव पोकळे :- मनपाच्या अटी व शर्तीनुसार ठराव करणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १५१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, सन्मा.नगरसेविका सौ.पार्वताबाई दामु भिल यांनी दि.०२/०१/२०१९ रोजी महानगरपालिकेस पत्र देऊन एम.जे. कॉलेज चौकाला भगवान एकलव्य चौक असे नामकरण करुन अदिवासी समाजाला न्याय दयाव अशी मागणी केलेली आहे. सदर चौकाला यापुर्वी नांव दिलेले असल्याबाबतची नोंद आढळ होत नसल्याचे प्रशासनाने प्रस्तावात नमूद केलेनूसार सदर चौकास **" भगवान एकलव्य चौक "** असे नांव देणेस तसेच सन्मा.सदस्या नेरकर सरीता अनंत यांचे पत्रान्वये महावीर नगर येथिल मनपा मालकीची खुली जागा सर्वे.नं.३०१/१ व ३०२/२ या खुल्या जागेवरील प्रस्तावित उदयानास **" क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले "** नामकरण करणेस तसेच सन्मा.सदस्य श्री.कैलास नारायण सोनवणे यांना श्री.सुनिल अशोक बारी, जळगांव जिल्हाध्यक्ष, बारी युवा प्रकोष्ट महाराष्ट्र यांनी दिलेल्या पत्रानुसार सन्मा.सदस्य श्री.कैलास नारायण सोनवणे यांनी सभागृहात सूचित केलेनूसार जळगांव शहरातील महिला बाल सुधार गृह जवळील चौकाला **" श्री संत रुपलाल महाराज चौक "** असे नामकरण करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

उपरोक्त चौकाला यापुर्वी कोणाचेही नांव दिले गेले नसल्याबाबत प्रशासनाने खात्री करुन सदर प्रकरणी नियमानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- पार्वताबाई दामु भिल**
**अनुमोदक :- ललित विजयराव कोल्हे**

**नगरसचिव विषय क्र.५)** नगररचना विभागासंबंधित मा.महासभा ठराव क्र.९०३ दि.०५/०५/२०१८ व महासभा ठराव क्र.९०५ दि.०५/०५/२०१८ नुसार प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे कामी महासभा ठराव क्र.९४ दि.२१/०२/२०१९ अन्वये सदरचा विषय तहकुब ठेवण्यात आलेला होता. त्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.(सोबत मुळ डॉकेट)

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १५२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहराच्या मंजुर विकास योजना (वाढीव हद्द) मध्ये (आरक्षण क्र.१०६,व्हीजीटेबल मार्केट व शॉपिंग) मौजे पिंप्राळा गट नं.१०८ या जमिनीपैकी बाधीत जमिनीचे भुसंपादना बाबत तसेच मौजे आव्हाणे गट नं.७६०/१ या जमिनीतुन विकास योजना आरक्षण क्रं.२८ बगीचा या जमिनीचे भुसंपादना बाबतचा प्रस्ताव महासभा ठराव क्र.९०३ दि.०५/०५/२०१८ व महासभा ठराव क्र.९०५ दि.०५/०५/२०१८ नुसार सदरच्या प्रस्तावांचा विचार करणे कामी तहकुब ठेवण्यात आला होता. सदर प्रस्तावांचा विचार करता व महानगरपालिकेची आर्थिक स्थिती पाहता या जमिनीचे भुसंपादना कामी जमिन मालक यांना टि.डी.आर.देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच महानगरपालिकेने भुसंपादनासाठी मान्यता देऊन किती प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी सो.यांचेकडेस सादर केलेले आहे. व त्यासाठी एकुण किती रक्कम लागणार आहे, या प्रस्तावाची सदयस्थिती काय आहे या बाबतचा प्रशासनाने सादर केलेल्या सविस्तर प्रस्ताव यादीची महासभेने माहीती घेतली.

सदर प्रकरणी प्रशासनाने नियमानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- दिलीप बबनराव पोकळे**
**अनुमोदक :- राजेंद्र झिपरु पाटील**

**नगरसचिव विषय क्र.६)** महासभा ठराव क्र.९९ दि.२१/०२/२०१९ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका, अधिनियमातील कलम १०७ (अ) नुसार सन २०१३-१४ या आर्थिक वित्तीय वर्षाचा लेखापरिक्षण अहवाल सर्व म.न.पा. सन्मा.गटनेते यांना देण्यात आलेला असल्यामुळे सन २०१३-१४ चे लेखापरिक्षण अहवालाची माहिती घेणे.

श्री.चेतन सनकत :- माहिती घेण्यात येवुन कार्यवाही करावी .

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १५३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगाव शहर महानगरपालिकेची सन २०१३-१४ या आर्थिक वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षण म.उपसंचालक, मनपालेप, स्थानिक निधी लेखापरिक्षण, उपविभाग औरंगाबाद - ३ यांचे कडून करण्यात आलेले असून त्यांचेकडील पत्र क्र.स्था-१८/ब/लेप नोटीस/मनपा-जळ/२०१४-१५, दि.१६/१०/२०१७ नुसार दि.२७/१२/२०१७ रोजी प्राप्त झाला त्या अनुषंगाने सदर अहवालात नमूद आक्षेपांची अनुपालने संबंधीत विभागातून प्राप्त झाली, तथापि सदरची अनुपालने सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षण करणेकामी नियुक्त झालेल्या लेखापरिक्षण पथकाकडून तपासणी करणेबाबत संबंधीत विभागाचे पत्र प्राप्त झालेने संबंधीत विभागाकडून प्राप्त झालेले अनुपालने परत संबंधीत विभागांना पाठवून सदर आक्षेपांची अनुपालने नियुक्त पथकाकडून तपासणी करणेत आली. दरम्यान नाशिक विभाग नाशिक मतदार संघाची निवडणूक आचारसंहीता तसेच जळगाव शहर महानगरपालिका,जळगाव २०१८ ची निवडणूक आचारसंहिता लागल्याने सदरची अनुपालने मा.महासभेच्या पटलावर ठेवण्यात आलेली नाही. महा.अधिनियम १९४९ चे कलम १०७ अ नुसार सदरची अनुपालने महासभेच्या सर्वसाधारण सभेपूढे ठेवण्यात आली. सन २०१३-१४ या आर्थिक वित्तीय वर्षाचा लेखापरिक्षण अहवालाची माहिती सभागृहाने घेतली.

सदर प्रकरणी प्रशासनाने नियमानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- विश्वनाथ सुरेश खडके**
**अनुमोदक :- चेतन गणेश सनकत**

**नगरसचिव विषय क्र.७**) महासभा ठराव क्र.१०० दि.२१/०२/२०१९ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका, अधिनियमातील कलम १०७ (अ) नुसार सन २०१४-१५ या आर्थिक वित्तीय वर्षाचा लेखापरिक्षण अहवाल सर्व म.न.पा. सन्मा.गटनेते यांना देण्यात आलेला असल्यामुळे सन २०१४-१५ चे लेखापरिक्षण अहवालाची माहिती घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १५४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगाव शहर महानगरपालिकेची सन २०१४-१५ या आर्थिक वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षण म.उपसंचालक, मनपालेप, स्थानिक निधी लेखापरिक्षण, उपविभाग औरंगाबाद - ३ यांचे कडून करण्यात आलेले असून त्यांचेकडील पत्र क्र.स्था-१८/ब/लेप नोटीस/मनपा-जळ/२०१४-१५/५८४ दि.१०/१०/२०१८ चा दि.१०/१२/२०१८ रोजी प्राप्त झालेला आहे. महा.अधि.कलम १०७ अ नुसार संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षण यांचेकडून लेखापरिक्षा अहवाल आवश्यक करण्याचा राज्य शासनाचा अधिकार आहे. राज्य शासन, संचालक, स्थानिक निधीलेखापरिक्षण यांचे कडून परिवहन उपक्रम असल्यास त्याच्या लेंख्यासह महानगरपालिकेच्या वार्षिक लेंखाची लेखापरिक्षा करण्याची व्यवस्था करील. संचालक स्थानिक निधी लेखापरिक्षा यांचेकडून अहवाल मिळाल्यानंतर राज्य शासन तो आयुक्तांकडे पाठविल आयुक्त सदरचा अहवाल मिळाल्यानंतर महानगरपालिकेच्या सर्व साधारण सभेपूढे ठेवण्याची व्यवस्था करेल त्यानंतर आयुक्त महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षण अधिनियमातील तरतुदी नुसार आवश्यक ती पुढील कार्यवाही करेल अशी तरतूद आहे.

त्यानुसार सदरचा लेखापरिक्षण अहवाल महासभेपूढे ठेवण्यात आला. सन २०१४-१५ या आर्थिक वित्तीय वर्षाचा लेखापरिक्षण अहवालाची माहिती सभागृहाने घेतली.

सदर प्रकरणी प्रशासनाने नियमानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- विश्वनाथ सुरेश खडके**
**अनुमोदक :- चेतन गणेश सनकत**

**नगरसचिव विषय क्र.८**) शिक्षकांच्या आंतरजिल्हा एकतर्फी बदलीस मा.महासभेच्या परवानगीने नाहरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत प्रशासन अधिकारी, म.न.पा.शिक्षण मंडळ यांचे मार्फत आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे कामी महासभा ठराव क्र.१११ दि.२१/०२/२०१९ अन्वये सदरचा विषय तहकुब ठेवण्यात आलेला होता. त्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

सौ.ज्योती चव्हाण :- हा विषय मंजुर करण्यापुर्वी मला आयुक्त साहेबांना सुचना करायची आहे मनपा शिक्षण मंडळाकडे आपले दुर्लक्ष होत आहे तरी प्रशासनाने त्याकडे लक्ष द्यावे कारण आपला जो निम्मा कर्मचारी वर्ग आहे तो कमी आहे आपल्या महापालिकेचा जो दर्जा आहे तो अतिशय खालावलेला आहे तो वाढविण्यासाठी प्रशासनाने काम करावे आता आपण ६ शिक्षकांच्या बदल्या करतोय तर आपल्याला येथे शिक्षक कमी पडणार आहेत त्यासाठी दुसरा वर्ग आहे त्याची माहिती द्यावी

मा.आयुक्त :- त्यासंदर्भात आपण त्यांना ज्या ठिकाणी आपण पाठवित आहोत त्या साठी जास्त पदसंख्या जर असेल तर आपण ६ नविन नियुक्त्या करू

सौ.ज्योती चव्हाण :- यानंतर आपण पटसंख्या वाढविण्यासाठी करावे.

मा.आयुक्त :- माझ्या माहिती प्रमाणे उर्दु आणि सिंधी समाजाच्या शाळा आहेत आणि जोपावेतो शहरामध्ये सक्षम शैक्षणिक संस्था आहेत त्यावेळेला प्रत्येक महानगरपालिकेला जे उपवाद आहेत मी अमरावती डिव्हिजन मध्ये अकोट की कोणतीतरी नगरपरिषद होती तर त्या ठिकाणी नगरपालिकेच्या शाळा सन्मा सदस्यांना चालविणेसाठी दिलेल्या होत्या तसेच आपल्या भागातील एक शाळा घ्यावी याला आपला पुर्ण सपोर्ट राहील आणि आपण ते करून दाखवु

सौ.ज्योती चव्हाण :- त्यासाठी काही उपाययोजना असतील तर त्या आपण कराव्या

मा.आयुक्त :- आपण जर एखादी जवळची शाळा दत्तक घेतली तर त्याठीकाणी आपण प्रयत्न करूया पुढच्या वर्षी बघुकाय बदल करायचे ते

श्री.ईब्राहीम पटेल :- महानगरपालिकेच्या ज्या शाळा होत्या तर आपण दत्तक योजना राबिविली होती ज्या सामाजिक संस्था आहेत यांनी जर शाळा दत्तक घेतली तर आपण तसे नियोजन करावे

सौ.ज्योती चव्हाण :- बदल्या करावयाचा विषय मान्य आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १५५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की,जळगाव शहर महानगरपालिका शिक्षण मंडळ जळगावचे अंतर्गत असलेल्या उर्दू व मराठी माध्यमाच्या शाळेतील शिक्षकांच्या आंतर जिल्हा बदलीने एकतर्फी बदलून जाणे करीता खालील प्रमाणे प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत.

| अ.क्र. | शिक्षकाचे नाव | सदया कार्यरत शाळा | माध्यम | बदलीने जाण्याचे ठिकाण | बदली प्रकार | बदलीचे कारण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सबीया यास्मिन कमरोद्दीन अन्सारी | ३६ | उर्दू | म.न.पा.अकोला | पती पत्नी एकत्रिकरण | पती जिल्हा परिषद अकोला येथे शाळेत कार्यरत असल्याने |
| २ | शेख सलीम शे.चाँद | ११ | उर्दू | महेकर ता.महेकर जि.बुलढाणा | एकतर्फी | पत्नीचे अचानक निधन व आई वडील वयोवृध्द असल्याने दोन मुलांची जबाबदारी |
| ३ | असगर हुसेन शे.इब्राहीम | ११ | उर्दू | नगरपरिषद चिखली जि.बुलढाणा | एकतर्फी | आईवडील वृध्द असल्याने नेहमी आजारी असतात त्यांची देखभाल करण्यासाठी |
| ४ | समाधान सिताराम सोनवणे | सें.०१ | मराठी | जि.प.जळगांव | एकतर्फी | आईवडील गावी असतात व आजारी असतात त्यांची देखभाल करणेसाठी |
| ५ | अकील अहेमद गुलाम अहेमद | ४२ | उर्दू | नगरपरिषद शेगाव,जि.बुलढाणा | एकतर्फी | आईवडील आजारी असतात व १५० कि.मी.उपचारासाठी घेऊन जावे लागते. |
| ६ | सनोबर आयेशा मो.शरीफ | १५ | उर्दू | नगरपरिषद चिखली जि.बुलढाणा | एकतर्फी | वडील आजारी असतात त्यांची देखभाल व औषधोपचार करणेसाठी गावी जावे लागते. |

यापूर्वी म.न.पा.शिक्षण मंडळ जळगावचे कक्षेतून मा.महासभेच्या मान्यतेने मराठी माध्यमचे ०८ व उर्दू माध्यमचे ०८ शिक्षक कार्यमुक्त होवून गेलेले आहे. वरील क्रमांक ०१ च्या शिक्षीका सबिया यास्मिन कमरोद्दीन अन्सारी पतीपत्नी एकत्रीकरण ने बदलून जाणे करीता मा.आयुक्त म.न.पा.जळगांव यांचे दि.११/०२/२०१९ चे मान्य टिपणीनुसार सदरचा प्रस्ताव महासभेच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आलेला आहे.

सदय स्थितीत म.न.पा.शिक्षण मंडळ जळगावचे कक्षेत सन २०१८-१९ च्या संच मान्यतेनुसार मराठी माध्यम ०५ शिक्षक व उर्दू माध्यम २० शिक्षक कमी आहेत. तसेच नजिकच्या काळात शासना मार्फत सी.ई.टी. परीक्षा घेऊन भरती करण्याचे कामकाज शासन स्तरावरुन पवित्र पोर्टल मार्फत कामकाज सुरु आहे. शिक्षण मंडळाकडे कमी असलेल्या पदांची माहिती पवित्र पोर्टल मध्ये भरण्यात आलेली असून सोबत विहित नमुन्यात सादर केलेली आहे. त्यानुसार नविन भरती मार्फत रु.६०००/- मानधनाने शिक्षण सेवक भरती होऊ शकते त्या मुळे महापालिकेचा आर्थिक बोजा बऱ्याच प्रमाणात कमी होणार असल्याने प्रशासनाने पवित्र पोर्टल मार्फत मानधनाने शिक्षण सेवक भरती त्वरित करावी.

तरी उपरोक्त नमूद केलेप्रमाणे सदर सहा शिक्षकांना न.पा./न.प/जि.प.व म.न.पा. या ठिकाणी त्यांनी मागणी केल्या प्रमाणे संबंधित त्यांना घेण्यास तयार असल्याच्या अटीवर नाहरकत प्रमाणपत्र देणेस मान्यता प्रदान करणेत येत आहे.

सदर प्रकरणी प्रशासनाने नियमानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- ज्योतीताई बाळासाहेब चव्हाण**
**अनुमोदक :- चंद्रशेखर शिवाजी पाटील**

**नगरसचिव विषय क्र.९)** जळगांव महानगरपालिका क्षेत्रात सेप्टीक टँक मधुन दैनंदिन जमा होणारा मैल्यावर प्रक्रिया करणेसाठी मलप्रक्रिया केंद्राचे बांधकाम १०० कोटी विशेष निधीतुन करणेस व येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

ॲड . शुचिता हाडा :- माझ्या माहिती प्रमाणे महानगरपालिकेने २५० कोटी रू खर्च करून भुयारी गटारीसाठी केलेल्या आहेत तर अशा परिस्थितीत हा निधी कितपत योग्य ठरणार आहे.

मा.आयुक्त :- हे नविन जी प्रक्रिया आहे. It is self management आत्ता आपण जो शहरामधुन सेप्टीक टँक मधुन मैला उचलतो आणि त्याचे पुढे काय होते आपल्याला माहिती नाही याबाबत पुढे काय आहे हे सांगणे उचित नाही त्यामुळे मोठया प्रमाणावर प्रदुषण होत आहे ही सुध्दा Critical बाब आहे. त्यामुळे आपण पुढचा जर विचार केला. अंडरग्राऊंडचा तर पुर्ण ३-४ वर्ष लागेल. आणि पुर्ण शहराचा आम्ही काही भाग घेतलेला तर या मध्ये अशी प्रतिक्रिया आहे. छत्तीसगड मध्ये राहुन संपुर्ण छत्तीसगड त्यामध्ये जागा कमी लागते. कॅास्ट कमी आहे. पण त्याचे जे out come आहे .

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १५६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगाव महानगरपालिका क्षेत्रात सदयस्थितीत मलनि:स्सारण योजना अस्तित्वात नाही. महानगरपालिका क्षेत्रात सेप्टीक टँकचा वापर आहे. सेप्टीक टँक मधून गटारींमध्ये वाहणारे घाण पाणी हे नाल्यांमध्ये प्रवाही होवून पुढे नदीत किंवा शेतीधारकांकडून शेती वापरासाठी वापर सध्या करण्यात येत आहे.

अमृत योजने अंतर्गत शहरात मलनि:स्सारण प्रकल्प उभारणीस शासनाने मान्यता दिलेली असुन या प्रकल्पात शहराच्या हददीचे 5 प्रमुख भागात विभाजन करण्यात आलेले आहे. यापैकी पहील्या टप्प्याच्या कामास मान्यता दिलेली असुन यात 2 (गावठाण हदद, शिवाजीनगर) भागांचा समावेश आहे. सदरच्या योजनेच्या बांधकामाचा कालावधी 30 महीने असुन सदय?स्थितीत या कामाची निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. इतर टप्प्यांमध्ये प्रस्तावित भागांच्या मलशुध्दीकरण केंद्रांसाठी जागा उपलब्ध नसल्याने पुढील टप्प्यातील प्रकल्पांना अदयाप मान्यता मिळालेली नाही.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने जळगाव शहराच्या हददीत मलप्रक्रिया केंद्र बांधकाम न केल्यामुळे व मैल्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावली जात नसल्याने महानगरपालिकेची खाती गोठविण्याची कार्यवाही यापूर्वीच केली आहे. तसेच उल्लंघन करणाऱ्या महानगरपालिकेवर भारतीय दंड संहीतेनुसार कारवाई करणेच्या सुचना यापूर्वी दिलेल्या आहेत. National Policy on Fecal sludge and septage Management मध्ये नमूद केल्यानुसार सेप्टीक टँक मधून निघणारा मैलावर प्रक्रिया करण्याठी मलप्रक्रीया केंद्र उभारणी करण्याचे धोरण (3.3.3) ठरविण्यात आलेले आहे.

भारतीय मानकांनुसार सरासरी 5 सदस्य संख्या असलेल्या एका घरातून 120 लिटर्स **प्रति दिन ऐवजी** महासभेतील चर्चेअंती **प्रतिवर्ष** दरडोई या दरानुसार 600 लिटर्स मैला तयार होतो. जळगाव महानगरपालिका हददीत सेप्टीक टँक मध्ये जमा होणारा मैला जमा करणेसाठी व्हॅक्युम एम्प्टीयर वाहने आहेत त्याव्दारे जमा करण्यात येत असलेला मैला हा हददीबाहेर टाकण्यात येतो. महानगरपालिका हददीत सरासरी दररोज 8 घरांतून मैला जमा करण्याची कार्यवाही आरोग्य विभागाकडून करण्यात येते यातून अदमासे 28,000 लिटर्स इतका मैला जमा केला जातो. सदर मैल्यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करण्याची कार्यवाही करण्यासाठी National Policy on Fecal sludge and septage Management मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांना निर्देश दिलेले आहेत.

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून वारंवार प्रक्रिया केंद्राची उभारणी करण्यासाठी आराखडयाची मागणी करण्यात येत आहे. जळगाव महानगरपालिकेस मंजूर करण्यात आलेल्या टप्पा - 1 च्या कामास पुर्ण होण्यास 30 महीने कालावधी लागेल तसेच या कामात प्रस्तावित प्रकल्प 2 (गावठाण हदद, शिवाजीनगर) भागांसाठी वापरात येणार आहे. यात 48 दश लक्ष लिटर्स प्रतिदीन क्षमतेचे मलप्रक्रिया केंद्र प्रस्तावित आहे. त्यामुळे उर्वरीत भागातून जमा होणा-या मैल्यावर प्रक्रिया करणेसाठी National Policy

on Fecal sludge and septage Management मधील सुचनांनुसार Fecal Sludge Treatment Plant बांधकाम करणे आवश्यक आहे.

त्यामुळे तात्काळ कार्यवाही करून व्हॅक्युम एम्प्टीयर वाहनांव्दारे जमा होणारा मैल्यावर मलप्रक्रिया केंद्र (Fecal Sludge Treatment Plant ) FSTP उभारणी करून प्रक्रिया करता येणार आहे. यासाठी अंदाजे (16X 10) मीटर जागेची आवश्यकता असुन यासाठी रू.70,00,000/- अंदाजित खर्च येणार आहे. भविष्यातील वाढीव गरजेचा विचार करता जळगाव स नं 396 सायप्रस ठिकाणी प्रथम टप्प्यात व आव्हाणे शिवार गट नं. 864 जुना हंजीर खत कारखाना या ठिकाणी दुसऱ्या टप्प्यात (प्रथम टप्याचे काम पुर्ण होवून चाचणी झाल्यानंतर) या दोनही ठिकाणी हा प्रकल्प उभारणी करणेस येणारा खर्च रू.1,40,00,000/- ला 100 कोटी विशेष निधीतून खर्च करणेस व काम हाती घेण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सदर प्रकरणी प्रशासनाने नियमानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- अड.शुचिता अतुलसिंह हाडा**
**अनुमोदक :- चेतन गणेश सनकत**

**नगरसचिव विषय क्र.१०)** सेवा समाप्ती आदेश रद्द करुन कामावर हजर करुन घेणेबाबत श्री.गोपी राजु हंसकर, बडतर्फ सफाई कामगार,म.न.पा.जळगांव यांनी दिलेल्या अर्जावर विचार करुन निर्णय घेणे.

श्री.कुलभुषण पाटील :- मा.महापौर साहेबा आणि आदरणीय, विषय क्र.११ आणि १२ आणि त्याचे नंतरचे विषय ॲज इट ईज आहे. त्यावर तत्कालीन आयुक्त साहेबांनी कार्यवाही करुन जे निर्णय घेतला होता त्याच प्रमाणे प्रशासनाने जे कारणं असेल ते करण्यात यावे.

श्री. नवनाथ दारकुंडे :- बडतर्फ ५४ कर्मचाऱ्यांचा विषय झालेला होता स्थायी समिती मध्ये. आणि मध्ये झालेले निर्णय झाला होता. नंतर एक एक दोन दोन आणु नये. त्यानंतर ५४ चा जो विषय झाला त्याच्यात ३७ लोकं कामावर घेण्यात आले. १३ लोकं का थांबले त्याचा उत्तर मागितलेले आहे. माझ्या माहितीनुसार स्थायी ला जे पावर्स आहे.पटलावर आणुन ते विषय सादर करावा. त्याशिवाय निर्णय लागणार नाही या १४ लोकांचा.

मा.आयुक्त :- सभागृहाला नम्र विनंती आहे की, महानगरपालिकेच्या कायद्यामध्ये कलम जर आपण पाहिले. तर Assit.Commissioner च्या खालचे जे पद आहे. तर त्यासाठी पुर्ण अधिकार हे आयुक्तचे आहेत. आपल्याकडे जे अधिकार आहे. जर त्यांच्यावर जर खरंच अन्याय झालेला आहे. जर आयुक्तांनी काही शिक्षा केली तर आपण आक्षेप घेऊ शकतात. म्हणजे आपल्याला जे आदरणीय स्वरुपाचे अधिकार दिलेले आहे त्यांचा आपण एकत्रीत जर आपण विचार केला माझी विनंती अशी आहे की, Individual प्रकरणाचा जर आपण विचार केला तर तो व्यवस्थीतपणे कोर्टात घेऊन येईल. आणि कुठलेही प्रशासकीय अधिकारी त्याला हे करणार नाही. आज या ठिकाणी असे सिध्द होत आहे की आयुक्तांनी कार्यवाही केली. आणि कर्मचाऱ्या मध्ये असा एक मॅसेज जात आहे की, आमचे आयुक्त काही नाही . आमची स्थायी समिती आहे आणि आमची जनरल बॉडी आहे. प्रशासनाच्या दृष्टीने हे अतिशय धोकादायक आहे. मा.स्थायी समितीला मा.महासभेला पुर्ण अधिकार आहे. परंतु याचे जे Procedure आहे Prescribed असे प्रकारे करावे. कुठल्याही कोर्टात असं होतं का आपण आज गेलो की मान्य. त्यासाठी माझी विनंती आहे. Individual विषयाचा विचार करावा. त्याच्या मध्ये जी कारणे दिलेली आहे. त्याचा विचार करावा. With reasoning. की या या कारणासाठी आपण आक्षेप करत आहोत. असे झाले तर खरोखर ज्याच्यावर अन्याय झाला आहे दिसेल आणि त्याला ही न्याय मिळेल. आणि प्रशासनही अडचणीत येत नाही. आपल्या ठरावामुळे आपली ही अडचणी सुरु होत आहे. तो सरळ कोर्टासमोर उभा राहतो आणि स्थायी समितीने त्याचा निर्णय घेतलेला आहे आणि प्रशासन त्याचा काम नाही करत . आणि त्याचा आर्थिक बोझा सरळ आपल्याला घ्यावा लागतो. त्याचा बोझा सहन करण्याची ताकद आपल्या सर्वांमध्ये आहे का ? त्याचे आपण परिक्षण करणे गरजेचे आहे.

श्री. नवनाथ दारकुंडे :- हो साहेब पण दुसऱ्या टाईमाला स्थायी समितीमध्ये जे निर्णय घेतला होता की चौकशी करुन कामावर घेण्यात यावा.

मा.आयुक्त :- म्हणुन वैयक्तीक पाहिजे. त्याप्रमाणे होईल. जर काही मोठा केलेला आहे तर छोटी शिक्षा नको ना. आता कस होत आहे. आता जर तुम्ही स्थायी समितीच्या जनरल बोर्डचा ठराव केला. तर आपल्याकडे जर १० कर्मचारी बडतर्फ वाले असतील. मला निश्चित माहिती नाही पण मला खात्री आहे त्यापैकी ९ जणांना कामावर निश्चित घेण्यात यावे. असे स्वरुपाचे असतील. आयुक्त हे कर्मचाऱ्याच्या कोणत्याही प्रकारे कार्यवाही करणार नाही असे चित्र होत आहे. आपले

सगळयांचे एक Set up आहे तर त्या Set up प्रमाणेच प्रत्येकाने आपआपले काम करणे अपेक्षित आहे. आणि प्रशासकीय कामकाजामध्ये सहाय्यक आयुक्ताचे खाली आयुक्तच आहे. बाकी ईथले तिथे करता येत नाही.

श्री.कैलास सोनवणे :- मा.महापौर साहेबा आता आयुक्त सोहबांनी जे शब्द वापरला सरसकट आम्हाला याची मान्यता आहे आम्हाला मान्य आहे हे परंतु आपण येथे २-३ महिने झाले. हे जे ५७ कर्मचारी आहे. एकाच वेळेस बडतर्फ झाले. जे आता नवनाथ दारकुंडे बोलले की पाकीट माराला सुध्दा फांसी. तर कोणीही एक घंटा उशीरा आला बडतर्फ, कोणीही दोन दिवस गैरहजर राहिला बडतर्फ, एक गुडमॉर्निंग पथक होतं. सकाळी जे संडाशी करणारे लोकं होते त्यांना उचलण्यासाठी आमचा एक कर्मचारी होता राजेंद्र सपकाळे. तो फेसबुकचा एकदम हौशी होता. तो त्यांच्यावरती कार्यवाही करायचा आणि फेसबुकवर टाकायचा. त्या संडास करणाऱ्यांना उभा करुन. त्याच्यावर गुन्हा दाखल झाला. त्या संडास करणाऱ्यानी केस दाखल केली त्याच्यावर त्याला काही जामिनपण द्यावा लागला. पण ते त्याच्या कर्तव्याचा भाग होता. पण त्याची सजा त्यालापण मिळाली. तो काही तरी उशीरा गेला असेल. तर तोपण बडतर्फ असे ना ना करता बडतर्फ झालेले आहे. म्हणजे सरसकट बडतर्फ झालेले आहे सरसकट. फक्त चुका काय होत आहे. जे आपण अर्ज फिरवता हा डायरेक्ट आता मिटींग मध्ये येत आहे. याच्यात तुम्ही जे बोलले की प्रशासनाचे मत यायला पाहिजे. त्याच्या मध्ये तुम्हाला त्याची चुकी समजेल. हे तर मान्य आहे साहेब. कारण की याच्या आधीही दोन विषयांवर चर्चा झालेली आहे. एक कर्मचारी आहे आपला काय नांव त्याचा. भोसले तो मर्डरकेस मध्ये अटकला. त्याचे नाव आता खरं का खोटं ते आपल्याला माहित नाही. पण तो निर्दोष होता. तो निर्दोष झाल्यानंतर कमीतकमी ४-५ महिने होऊन गेले आज येऊन. तर तो बडतर्फ कशासाठी झाला. त्याच्यावर गुन्हा दाखल झाला. त्याच्यानंतर तो निर्दोष सुटला. आता सेशन कोर्टाने जर तुम्हाला सोडला असेल आणि आपण जर इकडे त्याला ठराव करुन घ्यावयाचा म्हणत आहोत रितसर. आपण ते शासनाकडे पाठविलेला आहे.आपला शासन कोर्टापेक्षा काही मोठा नाही हा कोर्टाचापण अपमान होत आहे. आणि तुम्हाला त्या बद्दल तिन चारदा सांगितलेल पण आहे. त्याच ठिकाणी तुम्ही आम्हाला बोलले की तुम्ही ते भोसले चा असा असा तसा तसा सर्वच लोकांचा तुम्ही असा ठराव करत आहेत. आता भोसलेचा ही ठराव असाच आला होता. तसेच हे चार ठराव या ठिकाणी आलेले आहे. आमच्या पार्टी मिटींगमध्ये जेव्हा हा विषय आला होता भोसलेचा तेव्हा ही मी हेच बोललो होतो. की अश्या प्रकारे करु नका. प्रशासनाचे मत घ्यायला पाहिजे. आणि प्रशासन टेकनिकल बाबी आहे. ते तपासुन घेतील आणि त्याचं शिस्तीने गुन्हा काय आहे. त्याचे एक इन्क्रीमेंट बंद कराव की दोन इन्क्रीमेंट बंद कराव, याला रु.५०/- दंड कराव की याला रु.१०० दंड कराव की याची बदली करावी.या या जे शिक्षा आहे हे प्रशासन ठरवेल. आणि त्यानुसार ते यांनी मिटींग मध्ये मान्य करावा. असाच त्यावेळी ही बोललो होतो पण त्यावेळी भोसलेंनी काय प्रयत्न केले त्यांनी ऐकले नाही. ते परत तुमच्याकडे आले. आणि त्याच प्रकारे ठराव झाले. तर आमचा एक हेच म्हणणं आहे प्रशासनामार्फत सर्व टेकनिकल बाबी तपासुन घ्यावी. कारण की या ठिकाणी आम्ही अनुमोदन दिल तर तुम्ही घेणारच नाही. ते बरोबर ही आहे. आम्ही या कर्मचाऱ्यांना हे सांगितलं असतं. तुम्ही डायरेक्ट जा आणि खरं तर जे महापौरांचे पी.ए. आहे. जेव्हा ह्या ठिकाणी महापौर सही करतात ना त्या ठिकाणी त्यांनी सांगायला पाहिजे की मॅडम असा घ्या. ते बोलत नाही. तुम्ही तुमच्या कर्मचाऱ्यांना सुचना करा साहेब. तर त्यांनी नगरसचिवांकडे प्रस्ताव महापौरांच्या सहीने पाठवायला पाहिजे आणि नगरसचिवांनी डिपार्टमेंटला पाठवायला पाहिजे. आणि डपार्टमेंद्वारे हे प्रस्ताव यायला पाहिजे.

श्री.नितीन लढढा :- तुम्ही लक्ष घालत नाही का ?

श्री.कैलास सोनवणे :- दुसरा कोण आहे ? साहेब हे तुम्हाला मान्य आहे ना.

मा.आयुक्त :- आता दुसरी गोष्ट हे लक्षात यायला पाहिजे की एखादा निवेदन इकडे येण्यापुर्वीच त्याची मुक्तता व्हायला पाहिजे. त्यात त्याची सर्व्हीस खोटी आहे अशी नाही. आणि जर तो निर्दोश आहे तर आपणच त्याला Accept करुन जे काही कृत्य आहे आपण ते समजून घ्यायला पाहिजे असे ही काही नाही. आणि दुसरी गोष्ट आपल्या सर्वसाधारणपणे आपल्याला बोलायला उचित वाटतं. शासनाकडुन जर प्रकरणं विखंडनासाठी जातात त्यात महाराष्ट्र मधली ही एक नंबरची महानगरपालिका असेल. आणि नगरविकास मध्ये अस झालेल आहे की प्रशासन आणि पदाधिकाऱ्यांमध्ये समन्वय नाही. त्यामुळे हा अपवाद झाला. तर आपल्याकडे हा नियम आहे. त्यासाठी तुम्ही आणि आम्ही सोबत विचार करायला पाहिजे. आणि कायद्यामध्ये ज्या कार्यकक्षा आहे त्याच्या मध्ये आपण काम केल तर सुरळीत होईल.

श्री.नितीन लढढा :- साहेब हा संपुर्ण विषय जे असतो ना हा समन्वय लोकप्रियतेच्या अनुषंगाने हा ठराव होत आहे. Fact आहे हे.

श्री.कैलास सोनवणे :- नितीन भाऊ हे बरोबर नाही. आम्ही जे मांडत आहोत ते बरोबर मांडलेले आहे. समन्वय लोकप्रियतेसाठी करत असते. तर ठराव करुन मोकळे झाले असते. तुम्ही हे आक्षेप घेत आहे हे चालणार नाही. मला माहित आहे तीन महिन्यातुन एक वेळा ही मिटींग झालेली आहे. तुम्ही आज बोलणार आहे भरपुर दिवस झाले तुमच तोंड बंद होतं. आज तुम्हाला वाट मोकळी झालेली आहे. बोलणारच आहे तुम्ही परंतु थोडं व्यवस्थीत बोला. आयुक्त साहेब

तुम्ही जे मांडला ना तुम्ही पुस्तक वाचुन घ्या परत एकदा मी सांगतो तुम्हाला एक वेळा बाकी तो रितसर यायला पाहिजे. एक वेळा ठराव झाल्यानंतर तो तुमच्यावर निर्णयाक आहे. हे तुम्ही कायद्यामध्ये वाचुन घ्या. निर्णयाक आहे. जे बडतर्फ कर्मचारी आहेत. त्यांचा प्रस्ताव आयुक्त साहेबांनी स्टँडींग मध्ये पाठवायचा.

मा.आयुक्त :- नाही मी मघाशीपण सांगितले. क्रिमीनल लाईफ आणि ऑदर लाईफ हे दोघांमध्ये फरक आहे.

श्री.कैलास सोनवणे :- तसा पुस्तकात नाही हे.

मा.आयुक्त :- मी तुम्हाला दाखवतो.

श्री. कैलास सोनवणे :- दाखवुन द्या. आणि मी जे सांगितले त्यावर ही Prompt रहा.

मा.आयुक्त :- हो Prompt आहे. पुण्यामध्ये मध्ये १८००० कर्मचारी होते ते आस्थापनावर. पुणे महानगरपालिकेचे दक्षता विभाग होता. मी तुम्हाला केस शॉर्ट करुन सांगतो.

श्री.नितीन लढढा :- सत्ताधारी १० महिन्यापुर्वी हे सत्तेत आले. त्यापुर्वी आम्ही सत्तेत होतो.२०-२० व ३०-३० वर्षे सत्तेत होतो. समन्वय म्हणजे शब्द घेणं हे उचित नाही. ओपन स्पेस बद्दल प्रत्येक ओपन स्पेस बद्दल ठराव असतात. कुठल्याही संस्थेला कुठल्याही पध्दतीने अश्या ओपनस्पेस अलॅट करता येत नाही. आणि प्रत्येक वेळेला काय होतं.हे त्या भागातील नगरसेवक आहे. त्या भागातील नगरसेवकांकडे त्या भागातील नागरीक येतात. भाऊ आमची संस्था असे शैक्षणिक कार्य करत आहे.आमची संस्था अशी जीम चालवत आहे. मला ही ओपनस्पेस मिळावी. तर त्यांनी ते दिले कारण तो त्यांचा मतदार आहे. आणि तो मतदार नाराज होऊ नये त्या अनुषंगाने आपण ते प्रस्ताव या सभागृहापुढे मांडतो. त्याची तुम्हालाही अमंलबजावणी करायची आहे कायदेशीर अडचणीत न येता. आणि त्या रितीने ठराव प्रशासनाने करायची आहे.

मा.आयुक्त :-अश्या प्रकरणांना माझी विनंती आहे की नागरीक तुमच्याकडे येत असतात ना तर तुम्ही काय करा असे प्रकरण तुम्ही प्रशासनाला पाठवा. आणि आम्ही रितसर ठराव करुन तुम्हाला पाठवु तर हे चांगल होईल.

श्री.कैलास सोनवणे :- हे असे चारही विषय प्रशासनामार्फत प्रस्तावीत करा. अर्ज कोणी केलेले आहे. स्टँडींगकडे केलेले आहे की नाही केलेले आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १५७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, सेवा समाप्ती आदेश रद्द करुन कामावर हजर करुन घेणेबाबत श्री.गोपी राजु हंसकर, बडतर्फ सफाई कामगार,म.न.पा.जळगांव यांनी दिलेल्या अर्जाचा विचार करता सदर प्रस्ताव हा प्रशासना मार्फत येणे अपेक्षित असल्याने प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार कार्यवाही करुन पुढील सभेत (डॉकेट) प्रस्ताव सादर करावा.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- नवनाथ विश्वनाथ दारकुंडे**

**अनुमोदक :- कुलभूषण विरभान पाटील**

**नगरसचिव विषय क्र.११)** सेवा समाप्ती आदेश रद्द करणे बाबत श्री.गंगाधर श्रावण गायकवाड, बडतर्फ फिटर, पाणी पुरवठा विभाग, कर्मचारी ,म.न.पा.जळगांव यांनी केलेल्या अपिल अर्जावर विचार करुन निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १५८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, सेवा समाप्ती आदेश रद्द करणे बाबत श्री.गंगाधर श्रावण गायकवाड, बडतर्फ फिटर, पाणी पुरवठा विभाग, कर्मचारी ,म.न.पा.जळगांव यांनी केलेल्या अपिल अर्जाचा विचार करता सदर प्रस्ताव हा प्रशासना मार्फत येणे अपेक्षित असल्याने प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार कार्यवाही करुन पुढील सभेत (डॉकेट) प्रस्ताव सादर करावा.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- सदाशिव गणपतराव ढेकळे**

**अनुमोदक :- कुलभूषण विरभान पाटील**

**नगरसचिव विषय क्र.१२)** सेवा समाप्ती आदेश रद्द करणे बाबत श्री.अनिल आत्मचरण ढंढोरे, बडतर्फ लिपिक,म.न.पा.जळगांव यांनी केलेल्या अर्जावर विचार करुन निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १५९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, सेवा समाप्ती आदेश रद्द करणे बाबत श्री.अनिल आत्मचरण ढंढोरे, बडतर्फ लिपिक,म.न.पा.जळगांव यांनी केलेल्या अर्जाचा विचार करता सदर प्रस्ताव हा प्रशासना मार्फत येणे अपेक्षित असल्याने प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार कार्यवाही करुन पुढील सभेत (डॉकेट) प्रस्ताव सादर करावा.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- सदाशिव गणपतराव ढेकळे**
**अनुमोदक :- कुलभूषण विरभान पाटील**

**नगरसचिव विषय क्र.१३)** जळगांव शहर महानगरपालिका शिक्षण मंडळ जळगांव आस्थापने वरील असलेली सेवा जिल्हा परिषद जळगांव यांच्याकडे एकतर्फी बदली करणेबाबत श्री.समाधान सिताराम सोनवणे, प्राथ. शिक्षक म.न.पा.सेंट्रल स्कुल क्र.१ जळगांव यांचे आलेल्या अर्जावर निर्णय घेणे कामी महासभा ठराव क्र.१०७ दि.२१/०२/२०१९ अन्वये सदरचा विषय तहकुब ठेवण्यात आलेला होता. तरी श्री.सोनवणे यांचे कडील आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १६० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, श्री.समाधान सिताराम सोनवणे, प्राथ. शिक्षक म.न.पा.सेंट्रल स्कुल क्र.१ जळगांव येथे कार्यरत असून आईवडिल वृध्द असल्यामुळे त्यांना सांभाळण्यासाठी कुणीही नसल्याने व कौटुंबिक परिस्थितीच्या दृष्टीने श्री.सोनवणे यांची जळगांव शहर महानगरपालिका शिक्षण मंडळ जळगांव आस्थापने वरील असलेली सेवा जिल्हा परिषद जळगांव यांच्याकडे एकतर्फी बदली करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सदर प्रकरणी प्रशासनाने श्री.समाधान सिताराम सोनवणे यांना नाहरकत प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करावी. तसेच रिक्त जागेवर पवित्र पोर्टल मार्फत मानधनाने शिक्षण सेवक भरती त्वरित करावी.

सदर प्रकरणी प्रशासनाने नियमानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- दत्तात्रय देवराम कोळी**
**अनुमोदक :- किशोर रमेश बाविस्कर**

**नगरसचिव विषय क्र.१४)** प्रभाग क्र.१५ म.न.पा. जळगांव यामध्ये सन २०१९-२० मधील दलीत्तेतर योजना अंतर्गत मध्ये कामाला मान्यता मिळणेबाबत सन्मा.नगरसेवक श्री.प्रशांत सुरेश नाईक यांचे आलेल्या पत्रावर निर्णय घेणे.

सौ.शुचिता हाडा :- मा.आयुक्त साहेब सदरच्या जागेवर लवकरच प्रधानमंत्री आवास योजनेचा काम सुरु होणार आहे. तसा डी.पी.आर. सुध्दा मंजुर झालेला आहे. आणि तस जे कामं Mention केलेले आहे ते Automatically होणार आहे. तर त्या ऐवजी सर्वच प्रभागांचे दलितोत्तर योजनेचे एकत्रीत प्रस्ताव सादर करुन घ्यावे. आणि ते कामं इतर कोणत्याही योजनेत येत नाही हे सुध्दा बघुन घ्यावे .मग कामाची सुरुवात करावी.

श्री.नितीन लढढा :- आलेल्या या एका प्रस्तावास मान्यता देणेस काय हरकत आहे ?

सौ.शुचिता हाडा :- मी सांगितल की हे कामे जेव्हा प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत जर होणारच आहे तर यासाठी हा निधी खर्च का करायचा. प्रधानमंत्री योजने अंतर्गत जर ते काम होणारच आहे तर आज हे निधी खर्च करणे योग्य होणार नाही.

श्री.नितीन लढढा :- हे त्यात समाविष्ट करणे व संरक्षण भिंत बांधणे हे संयुक्तीक आहे का ? पंतप्रधान आवास योजना केव्हा पर्यंत होण्याची शक्यता आहे. तीचा जर उल्लेख झाला नसेल किंवा त्याची सुरुवातच झालेली नसेल. दोन वर्ष लागतील जसे तुम्ही सांगीतले. तर या २० लाख रू .त निधीने नाल्याची संरक्षण भिंत बांधुन महाराष्ट्र शासनाची योजना आहे.

श्री.नितीन लढढा :- नका निधी देऊ पण कमीत कमी सदस्याला समाधानकारक उत्तर तर द्या. या सभागृहात प्रस्तावाची दोन पध्दती निश्चित झालेल्या आहे. एक कुठला प्रस्ताव प्रशासन देत असतो. दोन दुसरा प्रस्ताव सभागृह यादी प्रस्ताव म्हणुन पाठवत असतो. यादी प्रस्ताव पाठविल्या नंतर जर तो कायद्याच्या चौकटीत बसत असेल तरच त्याची अंमलबजावणी आपण करावी. बेकायदेशीर मांडत असेल, अयोग्य मांडत असेल नियमात बसत नसेल तर निश्चितपणे हा ठराव तुम्ही विखंडनाला पाठवु शकतात. परंतु सभागृहाच्या सदस्यांचा अधिकार अश्या पध्दतीने हिरावुन घेण्याचा आहे. निधी नाही द्यायचा आहे नका द्या. आम्ही विरोधी पक्षाच्या लोकांना निधी देणार नाही.

सौ.शुचिता हाडा :- महापौरताई या ठिकाणी मी असा प्रस्ताव मांडत आहे की सर्व प्रकाराची दलितोत्तर योजना अंतर्गत एकत्रीत प्रस्ताव मागविण्यात यावे. आणि सदर प्रस्ताव इतर दुसऱ्या कोणत्याही निधीत तर येत नाही ना हे सर्व टॅली करुन प्रस्तावांना मान्यता देण्यात यावी.
श्री.अनंत जोशी :- भोळे साहेबांना बोलु द्या. भोळे साहेबांना बोलु द्या ना. भोळे साहेबांना उत्तर विचारल आम्ही.
श्री.सुनिल भोळे :- महापौरताई जे काही प्रस्तावांची माहिती यांनी मागीतलेली आहे व या प्रकारचे सर्व प्रस्ताव एकत्रीत करुन पुढच्या वेळेस सादर करण्यात यावा. नाही प्रधानमंत्री योजना यात नाही आहे.
श्री.सुरेश सोनवणे :- भाऊ ते सगळ ना दुरुस्त होतं खराब होतं. सेप्टीक टँक खराब आहे. २० वर्ष झाले रस्ते नाही आहे. त्यांना संडाशी बनवुन दिले तर बरं होईल. १३५० घरांचा विषय आहे हा सभेतपण झालेला आहे. ते १३५० घर आसोद्याला जातात संडाशीला.
श्री.नितीन लढढा :- मेहरुण तलाव, शिवाजी उद्यान याचा सौंदर्यकरण करणे व सुशोभिकरण करणे याचा असा ३३ कोटीचा प्रस्ताव विकासकाला द्यायचा होता. DPDC मधुन त्याला मान्यता ही मिळालेली होती. एका दिवशी हे प्रभाग समितीची सभा असुन जिल्हाधिकारी श्री.किशोर राजे निंबाळकर सुध्दा येथे आलेले होते आणि असा प्रस्ताव आम्ही ३३ कोटीचा पाठविलेला आहे. निधी येतो आणि परत जातो. पैसा असुन ही खर्च करु शकत नाही हे दुर्दैव आहे महापालिकेचा की येथे निधी आहे परंतु खर्च करु शकत नाही. संकुचित वृत्ती घेऊन काम करत आहे.
श्री. कैलास सोनवणे :- कोणता निधी आहे आणि खर्च होत नाही. असा काय बोलत आहात तुम्ही.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १६१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्रभाग क्र.१५ मधिल कामाचा सदर प्रस्ताव दलित्तेतर योजने अंतर्गत होणाऱ्या कामांमध्ये समाविष्ट करावा व ज्या ज्या सन्मा.सदस्यांचे प्रभागांमध्ये दलीत्तेतर योजना अंतर्गत कामांचे प्रस्ताव असतील अशा सर्व सन्मा.सदस्यांचे प्रभागांतील सर्व प्रस्ताव एकत्रीत करुन बांधकाम विभागाने नियमाप्रमाणे डॉकेटसह प्रस्ताव महासभेत सादर करण्याची कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- अड.शुचिता अतुलसिंह हाडा**
**अनुमोदक :- कुलभूषण विरभान पाटील**

**नगरसचिव :- जादा विषय क्र.१)** नागरी दलित वस्ती सुधारणा योजना अंतर्गत कामे प्रस्तावित करणेस व कामांच्या अंदाजपत्रकीय रक्कम रु.७७,२३,७३१/- मात्र चे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.
श्री.चेतन सनकत :- सर्व अनुसुचित जाती च्या प्रभागातील एकत्रीत प्रस्ताव सादर करण्यात यावा.
श्री.कैलास सोनवणे :- ऐकुन घ्या अश्विन भाऊ आणि प्रशांत तुम्ही पण ऐकुन घ्या.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १६२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, नागरी दलित वस्ती सुधारणा योजना अंतर्गत महानगरपालिका क्षेत्रात प्रती वर्षी नागरी दलित वस्ती योजने अंतर्गत १०० लक्ष पर्यंत कमाल अनुदान अनुज्ञेय आहे. त्यानुसार जळगांव शहर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र. १३ हा अनुसुचीत जाती करीता आरक्षित आहे. त्यामुळे दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत खालील प्रमाणे कामे अनुज्ञेय आहेत. त्यानुसार खालील प्रमाणे कामे सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षात दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रस्तावित करण्यात आलेली आहेत.

| अ.क्र. | कामाचे नांव | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | वार्ड क्र.१३ समता नगर मध्ये कॉंक्रिटचे पाथवे तयार करणे | ४३,१४,५८२ |
| २ | वार्ड क्र. १३ मधील मेहरुण स.नं.४६२/१/२ ओपनस्पेस मधील समता नगर येथील जलकुंभास संरक्षण भिंत बांधाणे | ३४,०९,१४९ |
| | **एकूण रक्कम रुपये** | **७७,२३,७३१** |

तथापी सदर बाबतीत महासभेने चर्चा केली त्यानुसार जळगांव शहरातील सर्व अनुसूचित जाती प्रभागातील एकत्रित प्रस्ताव तयार करुन बांधकाम विभागाने नियमाप्रमाणे डॉकेटसह पुढील महासभेत सादर करावे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- सुरेश माणिक सोनवणे**
**अनुमोदक :- चेतन गणेश सनकत**

**नगरसचिव :- जादा विषय क्र.२)** स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत सार्व.शौचालय बांधणे कामी विभागाने प्रस्तावीत केलेल्या कामांचा एकुण रक्कम रु.१,७०,९०,६७८/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

श्री.नितीन लढढा :- मा.महापौरताई याच्यात एकुण ०६ कामे प्रस्तावीत केलेली आहे आणि प्रभाग क्रमांक अंतर्गत जवळपास महिलांचा शाहुनगर येथील १८ सिट्सचा एक प्रस्ताव आहे आणि उर्वरीत बाकी प्रस्ताव जे आहे.२०-२० सिट्सचे आहे परंतु २०-२० सिट्सच्या वार्ड क्र.१४ तांबापुरा खदानी जवळ २०-२० सिट्सच्या आहे.

श्री.नितीन लढढा :- प्रभाग क्र.१५ मधील सार्वजनिक शौचालय बांधणेबाबत ३४,८३,१७३/- या प्रभाग शौचालयाची दुरावस्था झालेली आहे. तर त्याची ही यात समावेश करण्याची आपण परवानगी देत असाल तर याचा समावेश करावा ही आमची विनंती आहे. नाही कराल तरी ही आम्हाला दुख नाही. आणि करत असाल तर आनंद आहे.

श्री. सदाशिव ढेकळे :- हा विषय आरोग्याधिकारीने सर्व सर्व्हे करुन बांधकामाला दिलेला आहे. अधिक माहिती घ्यायची असेल तर आरोग्याधिकारी उदय पाटलांना विचारावा.

आरोग्याधिकारी :- व्यक्तीगत शौचालय बांधण्यासाठी अनुदानाचा प्रस्ताव होता.आपण जळगांव शहराच्या सर्व एस.आय.मार्फत हागणदारी मुक्त शहराचा आणि व्यक्तीगत शौचालयाचा जे उद्दिष्ट होतं. आज आपल्या जळगांव शहरात २१६६ व्यक्तीगत सिट्स आहे. व्यक्तीगत आणि सार्वजनिक शौचालय वापरण्याची संख्या फारच कमी झालेली आहे. कारण २१६६ संडाशी बांधण्यासाठी शासनाने जे अनुदान दिल होतं. त्या अनुदानापोटी आज आपल्या शहरात ९४२२ व्यक्तीगत शौचालय बांधण्यासाठी जे अनुदान दिलेले होते त्यासाठी आज आपल शहर ९०% पुर्तता करत आहे. उघडयावर शौचाला जाणे किंवा सार्वजनिक शौचालय वापरणारे लोकांची संख्या कमी झालेली आहे आणि शासनाचा पुन्हा अनुदान देण्याचा जेव्हा प्रस्ताव आला त्यावेळेस एस.आय.च्या माध्यमातुन संपुर्ण नगरसेवकांकडे प्रस्ताव दिले होते. किंवा ज्या नगरसेवकांना अजुन शौचालयाची आवश्यकता असेल तर आपण या शौचालयाचे प्रस्ताव तयार करुन आपण शासनाकडे पाठवु की इतके इतके शौचालय आपण बांधत आहोत. त्यावेळेस जितके नगरसेवकांची प्रस्ताव प्राप्त झालेली होती. त्या अनुषंगाने आपण प्रस्ताव पाठविलेला आहे. आता जरी तुम्ही प्रस्ताव देत असतील आणि त्या भागात आवश्यकता असेल तर समावेश करायला काही हरकत नाही.

श्री.सुरेश सोनवणे :- १३५० घरं आहे आज ते १३५० घरं जेव्हा त्यांना दाखले दिले होते तेव्हा त्यांची सेप्टीक टँक ना दुरुस्त होती. आऊटलेट नादुरुस्त होता खराब होतं. शौचालय आणि आऊटलेट फायनल करतांना ते कमप्लीटच झाले नाही. मागच्या महासभेमध्ये ही मी मान्य केल आणि आता बाहेर २० वर्ष झाले जे आपण त्यांना संडाशी बनवुन दिले त्याच्या ते जात नाही. त्यांना ही मंजुर केला तर बरं होईल. १३५० घरांचा विषय आहे हा.सर्व्हे पण झालेला आहे. ते १३५० घरं उघडयावर जाता संडास करण्यासाठी.

श्री.नितीन लढढा :- ३७ लाख २८० इतकच अनुदान प्राप्त झालेले आहे. आणि कामे प्रस्तावीत केलेले आहे एकुण ६९ लाख रुपयांचे तर अनुदान याच्या व्यतिरिक्त येणार आहे का ? की एवढ्याच अनुदानामध्ये कामे भागवायची आहे. आणि एवढ्याच अनुदानामध्ये कामे भागवायची असेल तर १,५०,२४,८००/- कारण १ कोटी ७० लाख रुपयाचे कामे या ठिकाणी प्रस्तावीत होत आहे. २० लाख रुपयाचा निधी हा कोणता. आणि तो कश्या प्रकारे विभागला जाईन.

श्री.सुनिल भोळे :- जवळपास आपले ३ कोटी रुपये मंजुर झालेले आहे. हा पहीला हप्ता १ कोटी ५० लक्षचा आला म्हणुन असा प्रस्ताव सादर केलेला आहे. आरोग्य विभागाने जर सर्व्हे केला तर पुढच्या अनुदानात बाकीच्या कामांचा समावेश करु.

श्री.कैलास सोनवणे :- हे शासनाचे अनुदान आहे ना .

श्री.सुनिल भोळे :- यामध्ये आपल्याला शेअर करावयाचा आहे त्यामध्ये जवळपास आपल्याला एक सिट मागे ८ हजार मिळणार आहे.

मा.आयुक्त :- अनुदान आहे हे विषय झाला. ते आता Maximum वापरणे अपेक्षित आहे. Community Toilet ही Minimum असली पाहिजे. खरी गरज जिथे आहे त्या ठिकाणाचाच आपण विचार करु.

श्री.नितीन लढढा :- हे दोन कामे प्रशासनाने त्यात समावेश करावा. जर खरोखर गरज असेल तर याची पडताळणी प्रशासनाने करावी.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १६३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत सार्व.शौचालय करीता शासनाने पत्र क्र.राअस/अनुदान/७१/२०१८-१९ दि.२४/०१/२०१९ अन्वये जळगांव महानगरपालिकेस एकुण रक्कम रु.१,७०,२६,८२०/- इतके अनुदान मंजुर केलेले आहेत. सदर अनुदानातुन कामे करण्याकरीता आरोग्य विभागा मार्फत कामे प्रस्तावित करण्यात आलेली आहेत.

| अ.नं. | कामाचे नांव | रक्कम रु. |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.६ अंतर्गत इंदिरानगर, शाहुनगर रोड जवळ महीलांकरीता सार्व.शौचालय बांधणे (१८सिटस्) | २४,९४,६४८/- |
| २ | गणेश नगर जेलच्या पाठीमागे २० सिटस् सार्व.शौचालय बांधणे. | २३,२२,११५/- |
| ३ | प्रभाग क्र.११ अंतर्गत म्युनिसिपल कॉलनी जवळ २० सिटस् सार्व.शौचालय बांधणे. | २३,२२,११५/- |
| ४ | वार्ड क्र.१४ तांबापुरा ख्दानिजवळ ६० सिटस् सार्व.शौचालय बांधणे. | ५३,०७,५७०/- |
| ५ | शिवाजी नगर हमाल वाडा येथे २० सिटस् सार्व.शौचालय बांधणे. | २३,२२,११५/- |
| ६ | शिवाजी नगर मधील श्री.परदेशी यांचे घराजवळ २० सिटस् सार्व.शौचालय बांधणे. | २३,२२,११५/- |
| | **एकुण -** | **१,७०,९०,६७८/-** |

अ.क्रं.४ मध्ये बांधकाम विभागाने प्रस्तावात २० सिटस् दर्शविले आहे परंतू प्रत्यक्षात ६० सिटस् आहेत अशी महासभेत चर्चा झाली त्यानुसार ६० सिटसला मान्यता देण्यात येत आहे.

एक सिटस् करीता केंद्र हिस्सा ३९२००/- व राज्य हिस्सा रु.२६१३४/- एवढा असेल उर्वरीत अनुदान व्यतिरिक्तचा खर्च हा वित्त विभाग / प्रोत्साहन अनुदान / मनपा निधी अंतर्गत करण्यात येणार आहे.

नगररचना विभागाकडील शा.नि.१५ मे २०१५ नुसार केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियान (नागरि) च्या मार्गदर्शक सुचनांनुसार या अभियानाची अंमलबजावणी राज्यामध्ये करण्यात व या अभियानाचा कालावधी २ ऑक्टोबर २०१९ पर्यंत असल्याने राज्य अभियान यांचे पत्र २४/०१/२०१९ नुसार अनुदानाचा विनियोग नमुद केलेल्या अटीस अधिन राहुन विभागाने प्रस्तावीत केलेल्या कामांचा एकुण रक्कम रु.१,७०,९०,६७८/- मात्रचे प्रस्तावास स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) यांनी उपलब्ध करुन दिलेल्या निधी मर्यादेतच कामांचे नियोजन करण्याची काळजी कार्यन्वयन विभागाने घ्यावी या अटीवर मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सन्मा.सदस्य श्री.प्रशांत सुरेश नाईक व श्री.कैलास नारायण सोनवणे यांनी खालील प्रमाणे कामे सूचविलेले आहेत.

| अ.नं. | कामाचे नांव | रक्कम रु. |
|---|---|---|
| १ | प्र.क्र.१५ मध्ये ३० सिटस् सार्व.शौचालय बांधणे. | ३४,८३,१७३/- |
| २ | प्र.क्र.०४ अंतर्गत बालाजी मंदीर मागे ४० सिटस्च्या नविन सार्व.शौचालय बांधणे. | ४६,४४,२३०/- |
| | **एकुण -** | **८१,२७,४०३/-** |

सन्मा.सदस्य श्री.प्रशांत सुरेश नाईक व श्री.कैलास नारायण सोनवणे यांनी उपरोक्त प्रमाणे सूचविलेल्या एकूण दोन कामांचे एकुण रक्कम रु. ८१,२७,४०३/- मात्रचे प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे

सदर प्रकरणी प्रशासनाने नियमानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- सदाशिव गणपतराव ढेकळे**

**अनुमोदक :- राजेंद्र झिपरु पाटील**

**नगरसचिव :- जादा विषय क्र.३)** जळगांव शहर महानगरपालिकेस शासना मार्फत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियांना अंतर्गत मान्यता प्रकल्पा करिता रु.१००.०० कोटी किमतीच्या प्रस्तावापैकी दोन कामे रद्द करुन नविन कामांना मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

श्री.कुलभुषण पाटील :- मागील आदेश रदद करून त्यामध्ये चित्रा चौक ते नेरी नाका चौक, नेरी नाका चौक ते कायम वाडी चौक, हुडको पासुन ते नविन हुडको पर्यंत , मेहरूण शिव रोड ते व्यंकटेश मंदिर ते स्वाध्याय भवन , वाघुर पंपींग स्टेशनवर ५०० एचपी चे दोन पंप पुरवि णे , गिरणा टाकी येथे ५०० एच .पी ची मोटर गसविणे महाबळ चौक ते रविंद्र

नगर पर्यंत नेहरू नगरमधील रोड बनविणे, शास्त्री टॉवर ते ही कामे रदद करून आलेल्या विषयानुसार कामे प्रस्तावित करण्यात यावी ही विनंती.

श्री.कैलास सोनवणे :- नितीन भाऊ प्रत्येक विषयामध्ये बोलायलाच पाहीजे का ?

श्री.नितीन लढढा :- अप्पा मी फक्त कार्यपध्दती सुधारायला पाहीजे त्या अनुषगांनेच बोलतोय.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १६४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिकेस मा.कक्ष अधिकारी महाराष्ट्र शासन यांचे कडील पत्र क्र.नगरो-2018/प्र.क्र.432/न.वि.33, नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई-32 दि.16/08/2018 अन्वये महानगरपालिकेस शासना मार्फत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियांना अंतर्गत अंदाजे रक्कम रु.100.00 कोटी किमतीच्या प्रस्तावास शासना कडून तत्वत: मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. त्यानुसार सोबत परिष्टात नमुद केलेले कामे निवड व निश्चितीकरीता महासभेकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आली होती. त्यानुसार महासभा ठराव क्र.72 दि.19/01/2019 अन्वये एकूण 01 ते 159 कामांना मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार उक्त कामांना शहर अभियंता यांनी तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे. त्या अनुषंगाने पत्र क्र.जशमनपा/सा.बां./जा.क्र./2522/2019 दि.04/02/2019 अन्वये रक्कम रु.100 कोटी मात्रचा प्रस्ताव संचालक नगर परिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई येथे सादर करण्यात आला. परंतु सदर प्रस्तावास सार्वजनिक बांधकाम विभाग व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे या कार्यालयाकडील तांत्रिक मान्यता घेवून फेर सादर करण्या संदर्भात उप संचालक, नगर परिषद, प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांचे कडील पत्र क्र.नपप्रसं/नगरोत्थान/जळगांव मनपा/प्र.क्र.326/2019/का.-7/506/ दि.11/02/2019 अन्वये सुचित केलेले आहे. त्यानुसार सार्व. बांधकाम व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे कडून रक्कम रु.495492600/- मात्रचे एकूण 150 कामांच्या अंदाज पत्रकांना तांत्रिक मान्यता घेवून पत्र क्र.जशमनपा/सा.बां./जा.क्र./209/2019 दि.16/05/2019 नुसार संचालक नगर परिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांचे कडेस प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. उर्वरीत रकमेसाठी रक्कम रु.100 कोटी रकमे पैकी खाली नमुद दोन कामे रद्द करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे .

| अ. क्र. | कामाचे नांव (रद्द करावयाचे कामे) | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| 1 | प्रभाग क्र.08 सुरत रेल्वे गेट निमखेडी पर्यंत रस्ता डांबरी करणे,डिव्हायडर बांधणे | 57198972 |
| 2 | मुख्य पाच रस्ते - शास्त्री टॉवर चौक ते महाबळ चौक, नेरी नाका चौक ते स्वातंत्र चौक ते प्रभात कॉलनी चौक, पिंप्राळा रेल्वे गेट ते सिंधी कॉलनी चौक, पिंप्राळा रेल्वे गेट ते सोमाणी मार्केट पर्यंतचा रस्ता डांबरी करण करणे, गटर बांधणे, फुटपात, दुभाजक तयार करणे | 333525961 |
| | **एकूण रक्कम रु.** | 390724933 |

प्रशासनाने खालील परिशिष्ट अ मध्ये नमुद केलेली कामे प्रस्तावित केलेले होते.

परिशिष्ठ -अ

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| 1. | प्र.क्र.5 अंतर्गत शास्त्री टॉवर चौक ते जिल्हा न्यालयलयापर्यंत नुतनीकरण करणे | 21634437 |
| 2. | प्र.क्र.5 अंतर्गत हॉटेल मोराको ते पोलीस मुख्यालयापर्यंत रस्त्याचे नुतनीकरण करणे | 21634437 |
| 3. | प्र.क्र.6 अंतर्गत देशपांडे मार्केट ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत रस्त्याचे नुतनीकरण करणे | 21634437 |
| 4. | प्र.क्र.12 अंतर्गत सार्वजनीक बांधकाम विभाग मुख्यालय ते सिटी एन्क्लीव्ह बिल्डींग पर्यंत रस्त्याचे नुतनीकरण करणे | 21634437 |
| 5. | प्र.क्र.12 अंतर्गत हॉटेल रॉयल पॅलेस ते हतनुर प्रकल्प विभाग कार्यालापर्यंत रस्त्याचे नुतनीकरण करणे | 21634437 |
| 6. | प्र.क्र.12 अंतर्गत बी.एस.एन.एल. कार्यालय ते महाबळ चौकापर्यंत रस्त्याचे नुतनीकरण करणे | 21634437 |
| 7. | प्र.क्र.6 अंतर्गत नेरी नाका चौक ते पांडे डेअरी चौकापर्यंत रस्त्याचे नुतनीकरण करणे | 11909283 |
| 8. | प्र.क्र.6 अंतर्गत बी.एस.एन.एल कार्यालय ते स्वातंत्र चौकापर्यंत रस्त्याचे नुतनीकरण करणे. | 18293568 |
| 9. | प्र.क्र.6 अंतर्गत स्वातंत्र चौक ते प्रभाग चौकापर्यंत रस्त्याचे नुतनीकरण करणे | 11909283 |
| 10. | प्र.क्र.7अंतर्गत रिंगरोड पिंप्राळा रेल्वे गेट ते ख्वॉजामिया चौकापर्यंत रस्त्याचे नुतनीकरण करणे | 22250385 |
| 11. | प्र.क्र.7 अंतर्गत गोकूळ स्वीट मार्ट ते जे.डी.सी.सी. बँकेपर्यंत रस्त्याचे नुतनीकरण करणे | 20551257 |

| | | |
|---|---|---|
| 12. | प्र.क्र.7अंतर्गत अंतर्गत हरिष स्वीट मार्ट ते प्रभाग चौकापर्यंत रस्त्याचे नुतनीकरण करणे | 24991805 |
| 13. | प्र.क्र.6 अंतर्गत महाराज महाराणा प्रताप पुतळा ते पतंजली मेगा स्टोअर पर्यंत रस्त्याचे नुतनीकरण करणे | 13686325 |
| 14. | प्र.क्र.6 अंतर्गत आकाशवाणी चौक ते सिंधी कॉलनी चौकापर्यंत रस्त्याचे नुतनीकरण करणे | 21020953 |
| 15. | प्र.क्र.8 अंतर्गत पिंप्राळा रेल्वे गेट ते गुड्डू राजा नगर पर्यंत रस्त्याचे नुतनीकरण करणे | 18526840 |
| 16. | प्र.क्र.8 अंतर्गत किरण टेन्ट हाऊस ते रेल्वे पुलापर्यंत रस्त्याचे नुतनीकरण करणे | 18526840 |
| 17. | प्र.क्र.8 अंतर्गत जुनी सिल्क मील ते सोमाणी मार्केट पर्यंत रस्त्याचे नुतनीकरण करणे | 1526840 |
| 18. | प्र.क्र.8 अंतर्गत सुरत रेल्वे गेट ते देवराम नगर पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे | 24809162 |
| 19. | प्र.क्र.8 अंतर्गत मधील कृषी शाळे पासून ते निमखेडी कडे जाणारा रस्ता डांबरीकरण करणे | 24903796 |
| 20. | प्र.क्र.8 अंतर्गत मधील सरत रेल्वे गेट पासून निमखेडी रस्त्यावर आर.सी.सी. डिव्हायडर बांधणे | 7485830 |
| | **एकुण :-** | 370198789 |

**महासभेत झालेल्या चर्चेनुसार उपरोक्त प्रशासनाने दिलेल्या कामापैकी १ ते ६ कामे रद्द करुन त्याऐवजी खालील प्रमाणे कामे समाविष्ठ करणेस व त्यापोटी येणाऱ्या खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

| | | |
|---|---|---|
| 1. | प्र.क्र.6 अंतर्गत नेरी नाका चौक ते पांडे डेअरी चौकापर्यंत रस्त्याचे नुतनीकरण करणे | 11909283 |
| 2. | प्र.क्र.6 अंतर्गत बी.एस.एन.एल कार्यालय ते स्वातंत्र चौकापर्यंत रस्त्याचे नुतनीकरण करणे | 18293568 |
| 3. | प्र.क्र.6 अंतर्गत स्वातंत्र चौक ते प्रभाग चौकापर्यंत रस्त्याचे नुतनीकरण करणे | 11909283 |
| 4. | प्र.क्र.7अंतर्गत रिंगरोड पिंप्राळा रेल्वे गेट ते ख्वॉजामिया चौकापर्यंत रस्त्याचे नुतनीकरण करणे | 22250385 |
| 5. | प्र.क्र.7 अंतर्गत गोकूळ स्वीट मार्ट ते जे.डी.सी.सी. बँकेपर्यंत रस्त्याचे नुतनीकरण करणे | 20551257 |
| 6. | प्र.क्र.7अंतर्गत अंतर्गत हरिष स्वीट मार्ट ते प्रभाग चौकापर्यंत रस्त्याचे नुतनीकरण करणे | 24991805 |
| 7. | प्र.क्र.6 अंतर्गत महाराज महाराणा प्रताप पुतळा ते पतंजली मेगा स्टोअर पर्यंत रस्त्याचे नुतनीकरण करणे | 13686325 |
| 8. | प्र.क्र.6 अंतर्गत आकाशवाणी चौक ते सिंधी कॉलनी चौकापर्यंत रस्त्याचे नुतनीकरण करणे | 21020953 |
| 9. | प्र.क्र.8 अंतर्गत पिंप्राळा रेल्वे गेट ते गुड्डू राजा नगर पर्यंत रस्त्याचे नुतनीकरण करणे | 18526840 |
| 10. | प्र.क्र.8 अंतर्गत किरण टेन्ट हाऊस ते रेल्वे पुलापर्यंत रस्त्याचे नुतनीकरण करणे | 18526840 |
| 11. | प्र.क्र.8 अंतर्गत जुनी सिल्क मील ते सोमाणी मार्केट पर्यंत रस्त्याचे नुतनीकरण करणे | 1526840 |
| 12. | प्र.क्र.8 अंतर्गत सुरत रेल्वे गेट ते देवराम नगर पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे | 24809162 |
| 13. | प्र.क्र.8 अंतर्गत मधील कृषी शाळे पासून ते निमखेडी कडे जाणारा रस्ता डांबरीकरण करणे | 24903796 |
| 14. | प्र.क्र.8 अंतर्गत मधील सरत रेल्वे गेट पासून निमखेडी रस्त्यावर आर.सी.सी. डिव्हायडर बांधणे | 7485830 |
| 15. | प्रभाग क्र.04 मधील दधीची चौक ते रथ चौक, जगताप मंगल कार्यालय ते नेरी नाका पर्यंत रोड डांबरीकरण करणे | 5267480 |
| 16. | प्रभाग क्र.06 व 16 मधील नेरी नाका ते कब्रस्तान व कासमवाडी ते नॅशनल हायवे पर्यंत रोड डांबरीकरण करणे | 20138732 |
| 17. | प्रभाग क्र.10 अंतर्गत खंडेरावनगर रोड वरील दर्गा ते पिंप्राळा हुडको पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे | 9159180 |
| 18. | प्रभाग क्र.07 अंतर्गत शासकीय औद्योगीक प्रशिक्षण संस्थेच्या पुर्वेकडील रस्त्याचे डांबरीकरण करणे | 3688621 |
| 19. | प्रभाग क्र.11-12 अंतर्गत गर्व्हमेंट पॉलीटेक्नीक ते रामानंदनगर पर्यंतचा शिवरोड कॉक्रीटचा करणे | 6856321 |
| 20. | प्रभाग क्र.12 व 14 मधील व्यंकटेशमंदीर ते स्वाध्याय भवन पर्यंत सर्व्हीस रोड ते गणपतीमंदीर पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | 9619147 |
| 21. | प्रभाग क्र.13 मधिल महाबळ चौक ते झाकीर हुसेन कॉलनी 100 फुटी रोड पर्यंत रस्ताडांबरीकरण करणे | 9341551 |
| 22. | प्रभाग क्र.13 झाकीर हुसेन कॉलनी ते 100 फुटी रोड ते रायसोनी नगर पर्यंतचा 9.00 मीटरचा रस्ता डांबरीकरण करणे | 7795746 |

| | | |
|---|---|---|
| 23. | प्रभाग क्र.13 मोहाडी रोड ते शिरसोली रोड पर्यंतचा नेहरु नगर मधिल रस्ते डांबरीकरण करणे | 4656545 |
| 24. | वाघुर धरण ते वाघुर रॉ वॉटर पंपीग पर्यत 600 ते 2150 मि.मि.व्यासाचे पाईपलाईन लिक्वीड Epoxy Paint करणे | 1734572 |
| 25. | वाधुर रॉ वॉटर पंपीग येथे 500HP चे 2 पंप पुरविणे व बसविणे व 500 HP मोटार बसविणे | 4075000 |
| 26. | गिरणा टाकी येथे 75 व 80 HP विदयुत मोटार बसविणे व पंपसेट पुरविणे व बसविणे व इतर अनुषंगीक कामे करणे | 2000000 |
| 27. | उमाळा जलशुध्दिकरण केंद्र येथे संरक्षण भिंत बांधणे | 925000 |
| 28. | जलशुध्दिकरण केंद्र मधिल ऐअर ब्लोअर मोटार सहित नवीन बसविणे | 1000000 |
| 29. | उमाळा जलशुध्दिकरण केंद्र येथे मुख्य बसक्या टाकीच्या मुख्य बाहेरील 1500 मी.मी. पाईपलाइन जवळील 1200 मी.मी. व्यासाचा D.I.Sluice Valve चे चेंबर त्यावरील शेडसह पुरविणे व बसविणे व व्हाल Electrically Operated करणे | 2500000 |
| 30. | उमाळा जलशुध्दिकरण येथील क्लोरीन प्लॉन्ट संपुर्ण सुरक्षीततेसहचे उपकरणासह नविन बसविणे | 5000000 |
| 31. | उमाळा जलशुध्दिकरण केंद्र Flash Mixer संपुर्ण सेट पुरविणे व बसविणे | 1200000 |
| 32. | प्रभाग क्र.08 मध्ये निमखेडी रोड पासुन नॅशनल हायवे 6 पर्यंत ग.नं.118 मधून जाणारा रस्ता डांबरी करणे | 8049147 |
| 33. | प्रभाग क्र.11 मधील गिरणा पंपीग रोड ते धांडेनगर व पंपीग रोड ते जाधव यांचे घरापर्यंतचा 30 मि.रुंद डि.पी.रस्ता डांबरी करणे | 15564321 |
| 34. | प्रभाग क्र.16 स.नं. 508/2 खुल्या जागेत कुंपण भिंत बांधणे | 1500000 |
| 35. | प्रभाग क्र.05 मधील नॅशनल हायवे पासून खेडी तलाठी कार्यालया पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे | 3319283 |
| 36. | प्रभाग क्र.09 पिंप्राळा शिवार ग.क्र.40 द्रोपदी नगर ओपनस्पेसला वॉल कंपाऊंड करणे | 1200000 |
| 37. | प्रभाग क्र.17 मधील अयोध्या नगर गट नं.136 मधील ओपनस्पेसला विकसित करणे | 1200000 |
| 38. | प्रभाग क्र.01 निमखेडी शिवार ग.क्र.65/3 खुल्या जागेस चेनलिंग फेन्सींग करणे | 1100000 |
| 39. | प्रभाग क्र.14 रामेश्वर कॉलनी गट नं.251/1/3 येथील जागेत बैठक व्यवस्था करणे | 1500000 |
| 40. | प्रभाग क्र.15 मेहरुण अंतर्गत इक्बाल कॉलनी स.नं.6 मध्ये खुल्या जागेस चेनलिंग फेन्सींग करणे | 1500000 |
| 41. | प्रभाग क्र.07 डॉ बाबासाहेब उद्यान विकसीत करणे | 2500000 |
| 42. | प्रभाग क्र.10 त्रिमुर्ती हौ.सोसायटी ग.क्र.194/1/1 येथिल खुल्या जागेस चेनलिंग फेन्सींग करणे | 1000000 |
| 43. | प्रभाग क्र.02 जळगांव शिवार ग.क्र.14/1 मधील खुल्या जागेस चेनलिंग फेन्सींग करणे व गेट बसविणे | 1500000 |
| 44. | प्रभाग क्र.07 ग.क्र.54/1 रेल्वे लाईन लागुन मनपा हद्दीतील मोठा नाला व परीसरात आर.सी.सी.गटारी कॉक्रीट करणे | 1500000 |
| | **एकुण अंदाजीत रक्कम रु. :-** | 37,67,28,813 |

महासभेत झालेल्या चर्चेनुसार उपरोक्त १ ते ४४ कामे करणे कामी येणाऱ्या खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. सदर कामी अनुदाना व्यतिरिक्त होणारा खर्च म.न.पा.फंडातुन करण्यात यावा.

सदर प्रकरणी प्रशासनाने नियमानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- कुलभूषण विरभान पाटील**

**अनुमोदक :- सुरेश माणिक सोनवणे**

**नगरसचिव :- जादा विषय क्र.४)** केमीस्ट या पदावर पुनश्च: रुजु करुन घेणे बाबत श्री.विजय सुकदेवराव यादव, सेवा निवृत्त केमीस्ट मनपा,जळगांव यांनी दिलेल्या अर्जावर विचार करुन निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १६५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, केमीस्ट या पदावर पुनश्च: रुजु करुन घेणे बाबत श्री.विजय सुकदेवराव यादव, सेवा निवृत्त केमीस्ट मनपा,जळगांव यांनी दिलेल्या अर्जाचा विचार करता सदर प्रस्ताव हा प्रशासना मार्फत येणे अपेक्षित असल्याने प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार कार्यवाही करुन पुढील सभेत (डॉकेट) प्रस्ताव सादर करावा.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- सदाशिव गणपतराव ढेकळे**
**अनुमोदक :- कुलभूषण विरभान पाटील**

**नगरसचिव :- जादा विषय क्र.५)** मनपाच्या कामकाजात सुसूत्रता आणणे कामी विभागनिहाय समित्या स्थापन करणे बाबत मा.महापौर म.न.पा.जळगांव यांचे जा.क्र./जशमनपा/म.का./४०४/२०१९ दि.०३/०६/२०१९ नुसार त्यांनी दिलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

श्री.नितीन लढढा :- हा जो प्रस्ताव मांडला आहे ना त्यामध्ये काही कॉस्ट चा ही समावेश करावा.

श्री.कैलास सोनवणे :- हा शेवटचा विषय आहे त्यामध्ये तुमच्या गटातील सदस्यांना सुध्दा संधी दिली जाईल तसेच तुम्ही नावे सुचवावे तसेच एमआयएम या पक्षातील सदस्यांना संधी देणार होतो परंतू त्यांचा कोटा बसत नाही .

श्री.ईब्राहीम पटेल :- १० महिन्यापुर्वी महापालिकेच्या निवडणुका झालेल्या आहेत ,प्रत्येक नगरसेवकाला क्षेत्रसभा घेणे बंधनकारक आहे .

श्री.कैलास सोनवणे :- सदर बाबीला कोर्टाचा स्टे आहे.

श्री.नितीन लढढा:- सन्मा.सदस्य सुनिल वामनराव खडके यांचा वाढदिवस होता आणि त्यांच्या वाढदिवसाच्या निमीत्ताने आकाशवाणी चौकामध्ये एक फलक लावलेले होते , कोणी त्याची तक्रार केली नाही आणि त्या शहर विद्रुपिकरण कायद्याखाली त्यावर कारवाई करण्यात आली मी असे म्हणत नाही की त्यांनी कायदा मोडला असेल म्हणून त्यांना सुचना करा परंतु त्यादिवशी विविध भागात अनेक ठिकाणी बरेच फलक लागलेले होते मग ही कारवाई का हुकुमदस्त होती की फक्त तक्रार येईल त्यांनाच आपण कारवाई करू असा काही नियमामध्ये बदल करण्यात आलेला आहे का आजही शहरामध्ये तुम्ही फीराल तर १०० ते २०० फलक अनधिकृत रित्या मिळुन येतील तर त्या कारवाई मागची नेमकी भुमिका प्रशासनाची काय होती की त्यांनाच एकटेच सन्मा.सदस्य होते म्हणून त्यांच्यावरतील कारवाई करण्यात आली आणि बाकी लोकांकडे दुर्लक्ष करावे अशी त्यामागे काही भुमिका होती का .

मा.आयुक्त :- जी काही कारवाई झालेली असेल पण एक सभागृह म्हणुन त्याचे तंतोतंत पालन करणे आपली जबाबदारी आहे जर आपण एक वेगळा विषय घेवुन एक धोरण ठरविले तर काही शहरामध्ये टोटल बॅनर ला बॅन केलेले आहे आणि आपण असा निर्णय घेवुया आणि माझ्या माहितीप्रमाणे बऱ्याच पक्षांनी निर्देश दिलेले आहेकी अशा प्रकारचे बॅनर लावु नयेत जर कोणी लावले तर त्यांचेवर ॲक्शन / कारवाई करण्यात येईल .

श्री.नितीन लढढा:- एक महत्वाचा मुद्दा मांडतो ज्या गाळेधारकांची मुदत संपुष्टात आलेली आहे त्यांचे हस्तांतरण बंद आहेत परंतु त्याच्या व्यतिरीक्त काही मार्केट आहेत जसे की गोलाणी मार्केट आहे नविन बी.जे.मार्केट आहे आज रोजी जवळपास ७ ते ८ वर्षांपासुन यांची हस्तांतरण प्रक्रीया ही बंद आहे यापुर्वी महानगरपालिकेच्या माध्यमातुन हस्तांतरणाची प्रक्रीया राबविली जायची त्या माध्यामातुन महापालिकेला बऱ्याच प्रमाणात उत्पन्न मिळत होते मध्यतरीच्या काळात प्रशासनाकडुन प्रस्ताव देण्यात आलेला होता प्रशासनाचा प्रस्ताव अवास्तव होता अवास्तव असल्या कारणाने सभागृहाने व्यापारांना दिलासा देण्याच्या दृष्टीकोनातुन प्रशासन आणि सभागृह हया दोन दुवा आहे कारण की हस्तांतरण फी अवास्तव झालेली आहे आणि तो आपल्या पर्यंत कायदेशीर रित्या आपल्या पर्यंत पोहोचत नाही आणि म्युचुअल अंडरस्टँडींग मध्ये ते हस्तांतरण करून घेतात आपसांत ट्रान्सफर करून घेतात आणि हे झाल्यानंतर त ी दुकाने अनेक वेळा ट्रान्सफर होतात आणि तितक्या वेळा महानगपालिका त्या उत्पन्नाला मुकते आहे. या भुमिकेचा विचार करून त्यावेळावेस प्रशासनाने प्रस्तावित केलेली हस्तांतरण फी होती ती कुठेतरी जाचक वाटत होती त्यानुसार त्यामध्ये सुधारणा करून आम्ही बॉडीने ती कमी करण्याचा निर्णय घेतला होता. परंतु तत्कालीन प्रशासनाने तो प्रस्ताव शासनाकडे विखंडनासाठी पाठविला होता त्याबददल काही नाही तो नियमानुसार असेल किंवा काही असेल परंतू त्या दिवसानंतर हाच प्रश्न कमीत कमी १० वेळा बोललो होतो की हे महापालिकेच्या उत्पन्नाचे स्त्रोत आहे त्यामध्ये गाळेधारक हे चिंतीत आहेत कारण त्यामध्ये म्युचुअल अंडरस्टँडींग चा करारनामा आहे त्यांनाही सुरक्षा नाही त्या दृष्टीकोनातुन त्यांचेही नुकसान होवु शकते तर अशा पध्दतीचा प्रस्ताव प्रशासनाने तयार करून ज्या मार्केटच्या मुदती अजुन शिल्लक आहेत गोलाणी मार्केट , बि.जे मार्केट किंवा अजुनही काही असतील ते त्याचा एक योग्य प्रस्ताव तयार करावा कारण त्यावेळेला सर्वांची हस्तांतरण फी एकच होती , ग्राऊंड फ्लोअर ची हस्तांतरण फी आणि ३ ऱ्या माजल्यावरील हस्तातरण फी ही एकच होती परंतु त्याच्या किंमतीमध्ये

खुप मोठया प्रमाणात फरक होता आणि त्याच्या मध्ये त्यावेळेला आम्ही कमी करण्याचा निर्णय घेतला होता तर यामध्ये ४ ते ५ कोटी रू उत्पन्न वाढले पाहीजे होते तर हा विषय हाताळणे गरजेचे आहे गाळेधारकांचा विषय आहे दुसरी १ ट्रान्सपोर्ट नगरची जागा होती ती जवळपास पौनेचार एकरची जागा १९८३ साली तत्कालीन प्रशासनाने त्यावेळी प्रशासकीय बाब होती प्रशासनाने तीन वर्षाच्या मुदतीने संबंधीत ट्रान्सपोर्ट नगरच्या असोसिएशनला दिलेली होती आज ती जागा शहराच्या मध्यवर्ती जागा आहे त्या जागेसंदर्भात १९८३ ते १९८६ पावेतो कायदेशीर मुदत होती १९८६ पासुन ते आजतागायत त्याचा कोणताही निकाल झालेला नाहीये तसेच त्याचा कोणताही अतिरीक्त मोबदला महानगरपालिकेला प्राप्त होत नाही त्याअनुषगांने आम्ही बऱ्याच वेळेस पाठपुरावा केला प्रकरण न्यायालयापर्यंत नेला न्यायालयाचा निकाल महानगरपालिकेच्या बाजुने लागला महानगरपालिका प्रशासनाने त्यावेळेला आयुक्त डांगेसाहेब होते डांगेसाहेब दुसऱ्या कामानिमीत्त औरंगाबाद हायकोर्टात गेले होते त्यावेळी त्यांना सांगीतले की ट्रान्सपोर्ट नगरचा निकाल अशा प्रकारचा आपल्या बाजुने लागलेला आहे याच्यामध्ये कॅवेंट दाखल करणे अतिशय गरजेचे आहे आणि त्यावेळी प्रशासनाने याबाबतीत दुलक्षित केलेले आहे आणि ३ ते ४ महिन्याच्या कालावधी नंतर ट्रान्सपोर्ट नगर मधील गाळेधारक उच्च न्यायालया गेले आहेत आणि त्याना याबाबतीत स्टे मिळाला आणि आज रोजी तसेच पडलेले आहे तर आता प्रशासनाकडुन एवढेच अपेक्षित आहे आपल्या महापालिकेच्या हितासाठी एक्सप्लेन करून लवकर त्याचा पाठपुरावा करून ती जागा लवकरच महानगरपालिकेच्या हातात येईल आणि योग्य परिस्थितीने आर्थिक नियोजन भविष्याच्या दृष्टीने करणे साईस्कर राहील . एक महत्वाचा विषय असा अग्निशमन विभागाची जवळपास ४ चेसीस मागील जुन २०१८ पासुन ४ चेसीस या बॉडी बिल्डींग करणेसाठी निविदा प्रसिध्द केल्या निविदा ३ वेळा प्रसिध्द झाल्या साधारणत: ६ वेळा निविदा प्रसिध्द झालेल्या आहेत १ वर्षापासुन चेसीस आहे त्या अवस्थेत पडलेल्या आहेत परंतू त्याबाबतची माहिती सभागृहामध्ये का मिळत नाही.

मा.आयुक्त :- फंड कोणता आहे.

श्री.नितीन लढढा :- मनपा फंड आहे पण फंड कोणताही असेल तर त्याला निश्चितच प्रतिसाद मिळेल परंतु साधारणत: एक चेसीस ची किंमत १६२२६०६ आहे जवळपास ६४ ते ६५ लाख रू.ची वस्तु आपल्याकडे पडुन आहे आता उदय पाटील यांनी सांगीतले की ३ गाडया भंगार झाल्या तश्या पध्दतीने या चेसीस ची अवस्था होता कामा नये . आज संपुर्ण इतक्या मोठया शहरामध्ये ४ अग्निशमन ची वाहने आहेत त्यातील एक वाहन फक्त शौचालयांना पाणी पुरविण्यासाठी जाते स्टँडबाय वाहन उभे ठेवावे लागते प्रत्येक फायर स्टेशनला १ वाहन असणे गरजेचे आहे आणि १ वर्षापासुन पाडलेल्या हया वाहनाच्या चेसीस निव्वळ मनपा फंड आहे म्हणून आपण आश्वाशित करू शकत नाही की तुम्ही काम करा आम्ही तुम्हाला पैसा देवु उद्या यासभागृहामधील कोणीही सांगु शकेल मक्तेदाराला की काम कर मी आहे काम कर मी पैसे देईल परंतु काम होता होता टेकाळे साहेब निवृत्त होतील नविन आयुक्त येतील त्यांची काम करण्याची पध्दत वेगळी असेल अशाप्रकारे आयुक्त या शब्दावर मक्तेदार विश्वास ठेवत नाही मग यासाठी कुठल्यातरी निधीतुन नियोजन करून तातडीने शहराच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातुन पाहा महापालिकेची आर्थिक परिस्थिती पाहता हे काम करणे अत्यंत गरजेचे आहे त्याच प्रमाणे २ चेसीस लाईट विभागाचे दोन वाहने हे लाईट बदलविण्याचे कामे करतात जेमतेम आपण अशापध्दतीने काम करण्यासाठी वापर करीत आहोत या दोन चेसीस या वाहनांसोबतच तेथे पडलेले आहेत त्यांचे सुध्दा काम मनपा निधीतुन करावयाचे आहे तर अश्या प्रकारे आपली लाखो रूपयांची वाहने या शहराला गरज असतांना कामे पुर्णत्वास आणु शकत नाही. या १०० कोटी निधीमध्ये मेहरूण तलाव जवळ जॉगींग ट्रॅक बांधण्याचा प्रस्ताव आपण मान्य केलेला आहे ०५/०५/२०१८ म्हणजे तब्बल एक वर्षापुर्वी हा प्रस्ताव मान्य झाला त्यावेळी जिल्हाधिकारी किंशोर राजेनिंबाळकर होते त्यावेळी महापौर ललीतभाऊ होते आणि या विषयाचा पाठपुरावा मी करीत होतो जिल्हाधिकारी साहेबांनी तो प्रस्ताव विभागीय आयुक्तांकडे पाठविण्यासाठी माझ्या हाताने थैलीमध्ये तो प्रस्ताव टाकला तेथुन मंजूर झाला राज्य शासनाकडे पाठविला निव्वळ अशापध्दतीने की ज्याला ५ कोटी रू ग्रँड आहे त्याकरीता मेहरूण तलावाचा परिसर सुशोभिकरणाचा साधारण ४५३१८२५ रूपयांचा हा सुंदर असा प्रकल्प मार्गी लागु शकतो परंतु त्याचा पाठपुरावा प्रशासना कडुन करण्यास पदधिकाऱ्यांनी पुढाकार घ्यावा तशाच पध्दतीने सागर पार्क म्हणून जळगांव शहरात मध्यवर्ती मोक्याची जागा आहे खुले मैदान आहे भविष्यात त्याचा मैदान म्हणूनच उपयोग व्हावा हाच त्याचा मागचा हेतू आहे आणि त्यासोबत निव्वळ मैदान म्हणून न वापरता त्याला सुरक्षिततरित्या चैजिंग फेंसिंगचे कंपाऊंड करायचे चैजिंग फेंसिंगचे कंपाउंड केल्यानंतर आपले मैदान सुरक्षित होईल चैजिंग फेंसिंगच्या बाहेरून वृक्षारोपण करायचे म्हणजे तेथे झाडी निर्माण होईल यामध्ये जॉगींग ट्रॅक घेतलेला आहे जो साईडमध्येच घेतलेला आहे म्हणजे भविष्यात काही प्रकल्प असेल ६ मीटरचे जे साईड मार्जीन असले त्यामध्ये लाईटसुध्दा घेतलेले आहेत त्याला २३/०४/२०१८ रोजी उटी ची मंजुरी घ्यावी लागेल शासनाकडुन ५ कोटी जे अनुदान प्रस्तावित केलेले होते परंतु ५ कोटी चे प्रस्ताव आणि २५ कोटी अनुदानाचे प्रस्ताव असे प्रस्ताव मंजुरीसाठी होते परंतु शासन निर्णयामध्ये ५ कोटी ऐवजी २५ कोटीमध्ये दर्शविण्यात आले ती काही चुक घडली ती चुक सुधारण्यासाठी

प्रशासनाने आपल्या स्तरावर पाठपुरावा करावा परंतु तो प्रस्ताव जवळपास १ वर्ष झालेले आहे तरी बाकी आहे .या विषया प्रमाणे महानगरपालिका आमच्या ताब्यात होती आणि आमदार महोदय यांचा आग्रह होता की ५ कोटी रू ची कामे PWD च्या माध्यमातून व्हावे असे म्हणाले आणि आम्हाला त्याच्याशी काही घेणे नाही आम्हाला काय PWD च्या माध्यमातून करावे किंवा कसेही आम्ही त्यांना तसे कंन्सल्टही केले कंन्सल्ट केल्यानंतर आज तब्बल १ वर्षाचा कालावधी झालेला आहे कि ५ कोटीची रक्कम मनपाला मिळालेली होती निव्वळ आग्रहाखातर ती रक्कम PWD कडे वर्ग झालेली आहे त्या कामाचे नियोजन कुठेतरी केलेले आहे कारण ज्या ९५ कोटींची कामे प्रस्तावीत केलेली आहेत त्याच्या व्यतिरीक्त काही कामे टाकायची असतील तर ५ कोटी मिळालेल्या अनुदानामधुन ती कामे व्हायला पाहीजे परंतू काय झालेले आहे की वेगवेगळे आहेत कोणाचेही समन्वय नाही भोळे साहेब यांचेकडुन माहिती मिळत नाही त्याचे आराखडे मिळत नाहीत वास्तविक पाहीले तर महानगरपालिका मध्ये अधिकार क्षेत्र आपल्यामधला आहे हा ५ कोटी रूचा निधी वेडयावाकडया रितीने खचे होईल म्हणजे पैसातर पाण्यातच जाईल परंतु आपण जे उध्दीष्ट घेवुन चालतो ते उध्दीष्ट पुर्ती सुध्दा होणार नाही या सर्व गोष्टींचा खुलासा करणेगरजेचे होते कारण अश्या पध्दतीचे निधी इकडेतिकडे फिरतो आहे आणि उपयोग होत नाही आणि आपण आपल्या काहींना आपण परिचय देतो की आमच्या महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती बरोबर नाही त्यामुळे आम्ही खर्चामध्ये काटकसर करतो परंतू निधी पडलेला आहे त्याचा उपयोग व्हावा एवढीच माझी सभागृहाला विनंती आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १६६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मा.महापौर म.न.पा.जळगांव यांचे जा.क्र./जशमनपा/ म.का./४०४/२०१९ दि.०३/०६/२०१९ यांचे पत्रात नमूद केल्या प्रमाणे खालील प्रमाणे महापालिकेच्या विशेष समित्या गठन करणेस मान्यता देण्यात येत आहे. १) बांधकाम समिती, २) अतिक्रमण समिती, ३) स्वच्छता समिती, ४) पाणी पुवठा समिती, ५) दवाखाना समिती, ६) नियोजन समिती, ७) आस्थापना समिती, ८) विधी समिती, ९) वाहन व्यवस्था समिती, १०) शिक्षण समिती, ११) विद्युत समिती, प्रत्येक समितीमध्ये ७ सदस्य असतील. सदर प्रत्येक समिती मध्ये भारतीय जनता पार्टीचे ०५ सदस्य, शिवसेना ०२ सदस्य असे पक्षीय बलाबल महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३१ अ (१) व (२) मधील तरतुदीनुसार ठेवणेस सहमती दर्शविण्यात येत आहे.

तसेच उपरोक्त सर्व विशेष समितींचे कामकाज हे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३० व ३१ मधिल तरतूदीनुसार चालेल. सदर समितीचे सचिव हे संबंधित विभागाचे विभाग प्रमुख हे असतील उपरोक्त कलमातील तरतूदीनुसार समितींच्या बैठकीचे सर्व अभिलेखे संबंधित विभागाचे विभागप्रमुख (सचिव) यांनी ठेवून त्याचे जतन करणे आवश्यक राहील.व प्रत्येक विशेष समितीचे सर्व कामकाज महानगरपालिकेकडुन कायम केले जाण्याच्या अधिन असेल.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- ललित विजयराव कोल्हे**
**अनुमोदक :- जितेंद्र भगवानराव मराठे**

आयत्यावेळेचे विषय क्र.०१ :- महानगरपालिका सतरा मजली इमारतीचा सोळावा मजला भाडेतत्वावर मिळणेबाबत श्री.योगेश रमेश पाटील, सचिव, जीवन विकास सामाजिक संस्था,जळगांव यांनी दि.२३ मे २०१९ रोजी दिलेल्या अर्जाचे वाचन केले.

नगरसचिव :- मा.महापौर यांचेकडुन आयतेवेळेचा विषय घेणेबाबत निर्देश झालेला आहे तो प्रस्ताव पुढील प्रमाणे जिवन विकास सामाजिक संस्था , जळगांव संचलित संस्थेस कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय सुरू करावयाचे आहे या साठी जळगांव महानगरपालिका १७ मजली मधील १६ मजला अ व ब विंग सह संस्थेस भाडेतत्वावर देणेबाबत .

श्री.कैलास सोनवणे :- कोणते कॉलेज आहे.

नगरसचिव :- जिवन विकास सामाजिक संस्था , जळगांव.

श्री.कैलास सोनवणे :- आर्टचे आहे , कॉमर्स आहे का सायन्स आहे त्यांचा नेमका उददेश काय आहे हे सांगा

श्री.सुरेश सोनवणे :- प्रस्ताव मांडला आहे मी.

श्री.कैलास सोनवणे :- महापौर सो। हया विषयाचा आपल्याला काहीच बोध होत नाहीये कुणाचे कॉलेज आहे काय कॉलेज आहे तेथे काही प्रकार घडतील कॉलेज करीता एवढी जागा पुरेशी आहे का याचे डिटेल मध्ये डॉकेट घ्या त्या नंतर ठरवु आपण काय करायचे आणि सदर ठराव पुढील महासभेपुढे ठेवण्यात यावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १६७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महानगरपालिका सतरा मजली इमारतीचा सोळावा मजला भाडेतत्वावर मिळणेबाबत श्री.योगेश रमेश पाटील, सचिव, जीवन विकास सामाजिक संस्था,जळगांव यांनी दिलेला प्रस्ताव तहकूब करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ६७ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- ललित विजयराव कोल्हे**

**अनुमोदक :- जितेंद्र भगवानराव मराठे**

येणे प्रमाणे राष्ट्रगीतानंतर सभेचे कामकाज संपन्न झाले.

**सही/-**

**(भोळे सिमा सुरेश)**

**महापौर**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**